२१ एप्रिल १९७३
पन्नास पैसे

# माणूस



संपादक
श्री. ग. माजगावकर

२१ एप्रिल १९७३

# माणूस

साह्याय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : बारा — अंक : सेहेचाळीस



## सप्रेम नमस्कार

१२ एप्रिल, ७२

□ ७ एप्रिलचा 'माणूस' अंक वाचला. या अंकात डॉ. भरत करमरकर त्याचप्रमाणे अरुणा अंतरकर (मीना-कुमारी) यांचे लेख आवडले. स्वातंत्र्य हवे आम्हा प्रेक्षकांना! हा वि. भा. देशपांडे यांचा लेखही वाचला. एकंदर ७ एप्रिलचा 'माणूस' वाचनीय होता.

**प्रभाकर राऊत**
(खराळे) वसई

१७ एप्रिल, ७३

□ आपल्या अंकातील मीनाकुमारी-वरील अरुणा अंतरकर यांचा लेख वाचला. मीनाकुमारीच्या निधनानंतर तिच्यासंबंधी बहुतेक लेख मी वाचले. परंतु आमच्यासारख्या सामान्य वाचकांच्या [ज्यांना अशा व्यक्तींबद्दल नेहमीच नवीन नवीन वाचायची उत्सुकता असते] विचारांशी समरस होऊन लिहिलेला हा लेख फारच आवडला. लेख वाचून जणू काही तो आपण लिहिला आहे असे समाधान उगाचच वाटायला लागले. पत्र पूर्ण करताना पुन्हा एकदा सांगावसं वाटतं की लेखाचे श्रेय लेखातील मजकुरापेक्षा लिहिण्याच्या शैलीला व सोप्या भाषेला द्यावे लागेल. लेखिकेचे मन:पूर्वक आभार.

**सौ. अलका गोडे, मुंबई**

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# महर्षी विठ्ठल रामजी शिंदे एक अमृत वृक्ष !

प्रा. जे. एम्. वाघमारे

भारतीय समाज सुधारणेच्या इतिहासात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कार्याला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. सामाजिक स्वातंत्र्य व समतेच्या प्रस्थापनेसाठी क्रांतिकारक पावले उचललेल्या समाज सुधारकात त्यांचा अग्रक्रम लागतो. दीन-दलितांच्या स्वातंत्र्याचे ते एक फार मोठे प्रवक्ते होते. त्यांनी आपल्या जीवनाला एक धगधगते यज्ञकुंडच बनवले होते. त्या यज्ञकुंडात त्यांनी आपल्या ज्ञानाची, श्रद्धेची व कृतीची समिधा अर्पण केली. आर्थिक व सामाजिक विषमतेविरुद्ध आयुष्यभर त्यांनी झुंज दिली. महात्मा फुल्यांनी ह्या बहुजन व पददलित समाजाला मानवी अधिकारांची तीव्र जाणीव करून दिली. त्या समाजाला कर्मवीर शिंदे यांनी समता व अस्मिता प्राप्त करून देण्याचा आटोकाट प्रयत्न केला. विषमतेच्या आळयावर कौशल्याने उभी केलेली व चातुर्याने टिकवलेली जातीभेदाची प्रचंड उतरंड पाडण्याच्या ऐतिहासिक कार्याला त्यांनी आपल्या जीवनातील एक अपरिहार्य ध्येय मानले. हे कार्य करीत असताना रूढीग्रस्त प्रतिगामी हिंदू समाजाच्या विरोधाला त्यांना तोंड द्यावे लागले. पण समाज सुधारकांच्या जीवनात संघर्ष ही एक अटळ बाब असल्यामुळे त्याकडे त्यांनी आपली पाठ फिरवली नाही. त्या विरोधाला तोंड देताना त्यांनी आपल्या मनाची ऋजुता मात्र जाऊ दिली नाही.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा पिंडच मुळी धर्म व समाज सुधारकांचा होता. त्यांच्या मनावर लहानपणापासून झालेल्या संस्कारात त्यांच्या जीवनकार्यामागील प्रेरणा सापडतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सबंध आधिकारच त्या प्रेरणांमधून झालेला होता. त्यांच्या आईवडिलांनी त्यांच्या मनावर धर्मश्रद्धेचे सखोल संस्कार केले होते. त्यांचे घर म्हणजे एक आदर्श संस्कारशाळाच होती. धर्मश्रद्धा ही त्यांच्या आईवडिलांची जीवननौकाच ! जामखिंडीतील इतर जातीधर्मांच्या लोकांशी त्यांच्या वडिलांनी अगदी बंधुभावाचे नाते जोडले होते. त्यांचे घर सामाजिक समतेचे व धार्मिक सहिष्णुतेचे पीठच बनले होते. आई-वडिलांच्या स्वभावातच कर्मवीर शिंदे यांना त्यांच्या भावी सामाजिक व धार्मिक सुधारणेची बीजे आढळली. आपल्या आई-वडिलांचे ऋण फेडण्यासाठी त्यांनी जन्मभर सातत्याने

पृष्ठ ६२ वर

# गरिबांना [ओबेरॉयमधल्या] मी विसरू शकत नाही !!

## —ना. चव्हाण

निळू दामले

शनिवार : ७ एप्रिल.

हॉटेल ओबेरॉय शेरटनचे उद्घाटन.

मुंबईतले सर्वात महागडे हॉटेल, सर्वात जास्त किमत देऊन जागा घेऊन बांधलेले. स्क्वेअर फुटाला ६–७ हजार रुपये ! नरीमन पॉईंटवरील भरावाच्या जागेत बांधलेले.

आसपासच्या मध्यमवर्गीय वस्त्यांतून मोकळी हवा खायला लोक इथे येत असत. आता ह्या हॉटेलसारख्या प्रचंड इमारतींनी जागा अडवून टाकली. मोकळ्या हवेवरही आता मक्तेदारी आली. ह्या हवा खायला येणाऱ्या लोकांसाठी चणेवाले ह्या नरीमन पॉईंट-वर येऊन बसत, हॉटेलात येणाऱ्या मोठ्या लोकांना ह्या फाटक्या-मळक्या भैय्यांचे दर्शन नको म्हणून पोलीस हॉटेलच्या आसपासही त्यांना फिरकू द्यायला तयार नाहीत.

३५ मजली इमारत. ५०० सुसज्य खोल्या. २४० दुकाने, उद्घाटनाची कात्रीही हिरेमाणकांची, सर्व खोल्या वातानुकूलित. त्यातून २४ तास संगी-ताची सोय. २४ तास 'बीयर'चे बार उघडे. पहिल्या मजल्यावर 'स्विमींग पूल' वगैरे वगैरे असंख्य सोयी. खर्च १६ कोटी रुपये.

मुंबईतच सुमारे ७–८ लाख लोक बेघर आहेत. झोपडपट्ट्यातून रहाणा-ऱ्यांचीही संख्या २–३ लाखाच्या घरात.

उद्घाटक यशवंतराव चव्हाण. (आणि केक कापायची सुरी वसंत-रावांच्या हातात ! )

उद्घाटनाची वेळ आहे १०:३० ची.

गेल्या आठवड्यात मुंबईच्या काही भागात पाणीच आले नव्हते. लोकांची २ दिवस फार तारांबळ झाली होती. लोकांनी स्नानाच्या गोळ्या घेतल्या होत्या. मे महिन्यात काय होणार ? पाऊस उशीरा आला तर काय होणार ही चिंता !'

९:४५ होऊन गेले आहेत. इंपाला, फ्यूगॉट, शेवरलेट, डार्ट, इत्यादी अनेक परदेशी गाड्या आधीच उभ्या राहिल्या आहेत. अंग चोरून एखादी फियाटही आहे. बिड्या फुंकत ड्रायव्हरांचा घोळका झाला आहे. मालक मालकीण्या केव्हाच आत जाऊन पोचल्या आहेत. परदेशी वकील, ××× कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर आपल्याकडे पाहतील की नाही व आपल्या साडीचे, प्रयासाने राखलेल्या 'फिगर'चे कौतुक करतील की नाही ? चिंता, हीच काळजी.

पहिल्या मजल्यावरच्या पोहण्याच्या तलावाच्या काठावर अर्ध नैसर्गिक अव-

स्थेतल्या काही महिला येऊन बसल्या आहेत. 'किती सुरेख मुंबई दिसते नाही ?' खालून लोक आपल्या अवयवाकडे आधाशीपणे बघताहेत ह्या जाणीवेने सुखावलेल्या.

समोरच्याच फूटपाथवर बांधकामासाठी ठेवलेल्या टाकीला छिद्रे पाडलेली आहेत. त्यातून उसळणाऱ्या पाण्याच्या धारेखाली काही कामगार स्त्रिया स्नान करताहेत. उन्हाने रापलेल्या, त्यांच्यावर आणि डबक्यात नाचणाऱ्या त्यांच्या पोरांवर पोलीस उखडला आहे. तो त्यांना घालवून देण्याच्या प्रयत्नात आहे. ह्या घाणीचे दर्शन कशाला परदेशी आणि दिल्लीहून आलेल्या 'पाहुण्यांना' घडवायचे !

ह्या स्त्रिया ओबेराय हॉटेलच्या बांधकामावरल्याच. सीमेंटची घमेली वाहून नेणाऱ्या. ही पोरेही त्यांचीच

१०–०० वाजले आहेत.

यशवंतराव पलीकडे त्यांच्या रिव्हियेरावर आहेत. भाऊसाहेब वर्तकांनी कसा पचका केला, कसे उर्मटपणे वागले, आमच्यासारखे मूग गिळून गप्पही बसता आले नाही, अशा तक्रारी बहुदा त्यांना ऐकवल्या जात असाव्यात.

इथे अमेरिकेचे वकील मॉयनिहान आले. भराभर सूट पुढे सरकले. मोजून २॥ इंच लांबीची फेकलेली स्मितहास्ये. स्वागत. कॅमेऱ्यांनी डोळे मिचकावले. पुन्हा एखादी गाडी, पुन्हा उतरलेल्या माणसाभोवती घोळका, टूथ पेस्टच्या जाहीरातीसारखी दात दाखवणारी हास्ये. समुद्राकडे तोंड करून असलेल्या तळमजल्यातल्या हॉटेलाच्या काचेपलीकडे सर्व मंडळी जात होती. आलिशान झुंबराखाली सरबताचे ट्रे सरकत होते.

–आता म्हणे सर्वांनाच पॉलिथिन पिशव्यातून दूध देणार. पदार्थांवर परिणाम होतो म्हणून पॉलिथिन पिशव्या वापरायला मुंबईच्या आरोग्याधिकाऱ्यांनी बंदी घातली होती. तरीही त्या पिशव्यांतून दूध देण्याचा हा प्रयोग झालाच. टाईम्सने अग्रलेख लिहिला. तरीही प्रयोग झाला. पण पेडर रोड, लिकींग रोड, पालीहिल, मलबार हिलवर नव्हे. कामगार वस्तीत, मध्यमवर्गीयांच्या वस्तीत.

पहाऱ्यावर सकाळपासून ताटकळत असलेला पोलीस चवताळला होता. साले दूधही चांगले द्यायला तयार नाहीत.

लगबगीने मंडळी येत होती. आवर्जून बेंबीखाली नेसलेल्या साड्या. तारेवर कसरत करणारी डोंबारीण जशी मोजून पावले टाकते तशी नखरेल पावले टाकत; यू. डी. कोलनचे रुमाल चेहऱ्यावर फिरवत मंडळी येत होती. आवश्यक ते अवयव दिसतील अशी काळजी घेत कपड्यांच्या सोयीस्कर हालचाली.

सत्यनारायणाची पूजा आटोपून शालीग्राम शास्त्री बाहेर आला. त्याच्या हातात पूजेत मिळालेल्या फळांची, विड्यांची पाने, तांदूळ ह्यांनी भरलेली पिशवी. त्याची दक्षणा ठरलेली नव्हती. किती देणार ? पाच दहा रुपयांपलीकडे जास्त नाही. पूजा भरभर आटपा म्हणून

त्याच्या पाठी लागले होते. 'ये नंगी औरते, ये अमीर लोक, ऐसी बेशरम जगह–' बिचारा आत मधल्या वातावरणात उबून गेला होता. आत जाताना आदराने आत घेऊन गेले. पूजा संपली. घालवून दिले. दाराबाहेर आल्यावर एक पोलीस अधिकारी दरडावत आला, 'ए महाराज, वहां मत खडा रहो. निकल जाव. मिनिस्टरोंका थोबडा देखते मत खडा रहो, नही तो साब आनेके बाद हमारा थोबडा खतम हो जायगा' शालीग्राम शास्त्री धोतर सावरीत गर्दीत दिसेनासा झाला.

मेयरची गाडी आली. सुधीर जोशी उतरले. एकटेच. बिचाऱ्याला ह्या भपक्यांची सवय नव्हती. बुजल्यासारखा वाटला.

सावंत आले. ते रुळलेले. पद्धतशीरपणे हस्तांदोलन करत कॅमेऱ्याकडे एक हसू फेकून आत गेले.

१०–२० झाले.

चव्हाण अजून आलेले नाहीत.

प्रवेशद्वारावरच्या गच्चीवर काही महिला हातात फुलांच्या टोपल्या घेऊन उभ्या राहिल्या होत्या. चव्हाण–नाईकांवर वृष्टी करण्यासाठी.

–'पाडवा होऊन गेला. रामनवमी आली. हे फुलवाले वाटच पहात असतात. देवांसाठी साधा हार आणि फुलपुडी घ्यायची तरी रुपया पुरत नाही. फुलेही महाग झाली आहेत. ही महागाई जगू देणार आहे की नाही कुणाला माहीत.'

बँडवर पाश्चात्य संगीताचे सूर ऐकू यायला लागलेत.

मुंबईतल्या नवनवीन फॅशन्सचे प्रदर्शनच भरून राहिले आहे. १५–२० वारांचे कापड गुंडाळण्यापासून तर जेमतेम ४–५ इंचाचा एखादा तुकडा नेमक्या जागी 'चिकटवून' ठेवण्यापर्यंतच्या सर्व फॅशन्स 'काळजी'पूर्वक केलेल्या. श्रीमंतीचे एक प्रदर्शन. चव्हाण यांनाच पहायला येणार होते!

ह्या महिलांबरोबरच त्यांचे मिस्टरलोकही आहेत.

'कामगार फार माजले आहेत. त्यांना काही देता कामा नये.' 'ह्यावेळी टाळेबंदीच करून टाकली पाहिजे.' 'ह्या दुष्काळाने हैराण केले आहे. मुलाच्या मुंजीला XXX हजारांपेक्षा जास्त खर्चही करता आला नाही.' 'इकडे मंत्री सतावतात, तिकडे वर्तमानपत्रे सतावतात, मरू देत सर्वांना' अशा चिंता, काळज्या.

हॉटेलसमोरची गर्दी वाढते आहे. उभ्या केलेल्या गाड्यांच्या पाठीमागे असलेल्या ओंगळ, अर्धनग्न पोरांची आणि मजूरांची गर्दीही वाढते आहे. १०–३० झाले.

चव्हाण अगदी वेळेवर आले. खरं तर तसा प्रघात नाही. मंत्र्यांनी किमान अर्धा तास उशीरा यावेच लागते. लोक ताटकळतच बसलेले असतात, पण 'ह्या' मंडळींना ताटकळत ठेवून कसे चालेल?

सगळे फोटोग्राफर्स, दर्शनीय वस्तू पुढे सरसावल्या. तोंड फाटेस्तोवर हसणारे चेहरे. चव्हाण एकदम पुढेच

गेले. पुष्पवृष्टी राहून गेली. मग त्यांना पुन्हा पाठी बोलावण्यात आले. वृष्टी करणाऱ्या महिला रागावल्या असत्या, त्यांनी घेतलेल्या पोझेस फुकट गेल्या असत्या. पुष्पवृष्टी झाली. फुलांचा खच पडला. मोठ्या मजेत हसत हसत चव्हाणांनी फीत कापली. उद्घाटन झाले. टाळ्या कडाडल्या. सगळा घोळका आत.

आतमधे नाईकांनी केक कापला. त्यांना घोषणा करायची संधीच मिळाली नसावी. नाहीतर 'ह्या महाराष्ट्रातल्या उपाशीपोटी मजुराला, गरीब कामगाराला ह्या ओबेराय हॉटेलात राहता येईल ही वेळ आम्ही पुढल्या (काही) वर्षात निश्चितपणे आणू' अशी दणदणीत घोषणा वसंतरावांना सहज करता आली असती. त्यांना घोषणांची सवय नाहीतरी आहेच.

नंतर चव्हाणांनी 'औपचारिक' शुभारंभाचे भाषण केले. 'मी कोट्यावधी गरीब भारतीयांना विसरू शकत नाही.' अननसाचा रस आणि माफक फलाहार केल्यावर घोषणा मोठ्या चवदार होतात.

१९७१ च्या मध्यावधी निवडणुकीत लातूरला झालेल्या एका प्रचंड सभेत चव्हाण बोलले 'समोर हजारो माणसे उपाशी असताना एका माणसाला पक्वान्नांच्या ताटावर ताव मारायला ह्यापुढे मिळणार नाही.'

ओबेरॉय शेरटनमधे चव्हाणांच्या साक्षीने पक्वान्नाची ताटे चालू शकतात. आता बिन बियांची द्राक्षे, फळांचे रस, सफरचंदे, केक्स, ही पक्वान्ने नसतील तर भाग वेगळा

'देशाच्या विकासासाठी जास्तीत जास्त साधनसामग्री उपलब्ध करण्याचे काम मला करावयाचे आहे' चव्हाणांनी असे राष्ट्रीय बाण्याचे उद्गार काढले.

सोळा कोटीच्या हॉटेलच्या उद्घाटनाला तरी त्यांनी साधनसामुग्री जमवण्याचे बोलायला नको होते.

अमेरिकेच्या भारतातील वकिलांना त्यांच्या ह्या मुक्कामी विचारले गेले की मुंबई कशी वाटली? मॉयनिहान म्हणाले, 'मलबार हील ते नरीमन पॉईंट यामधलीच मुंबई सुंदर आहे.'

चव्हाण व मॉयनिहान एकाच समारंभात हजर होते. एक माणूस बोलला, दुसरा गप्प बसला.

मुंबईत सामान्य माणसांच्या रहाण्याच्या जागेचा प्रश्न बिकट होत चालला आहे. पाणीही नाही.

आता सर्वांच्याच जागा हिसकावून घ्याव्यात. रस्त्यावर आलेले संसार फोटो काढण्यासारखे होतील. परदेशी प्रवासी त्यासाठी मोठ्या प्रमाणावर मुंबईत येतील. त्यांच्यासाठी (सामान्यांना मज्जाव झालेल्या जागेवर) आलिशान हॉटेल बांधूया. त्यामुळे आपल्याला खूप परकीय चलन मिळेल. बरोबरच मुंबईतल्या दारिद्र्याचे दर्शन झाल्यावर पी. एल. ४८० किंवा तत्सम कर्जाची रक्कमही आपल्याला वाढवून घेता येईल. चोहीकडे आनंदी आनंद होईल.

● ● ●

# अशांत पुणे शांत होऊ लागले पण मूळ प्रश्नांचे काय ?

धनुर्धारी

बंगालमध्ये नक्षलवाद सुरू झाला. महाराष्ट्रातही तसे अराजक येणार किंवा काय अशी भीती पूर्वी व्यक्तविली जात असे. परंतु तसे काही झाले नाही. मग अचानक एक बंगाली नाव पुणेकरांच्या जिभेच्या टोकावर नाचू लागले. रूपमय चतर्जी! त्यातच रंग भरला त्याच्या कम्युनिस्ट विचारप्रणालीने. त्याच्या पल्लेदार, धारदार विचारांनी अनेक कामगारांची हृदये काबीज केली. एकेक कारखाने एकामागोमाग बंद होऊ लागले आणि आजपर्यंत एकप्रकारचे चाकोरीतील जीवन जगणारे कामगार, पांढरपेशे, बुद्धिजीवी एकदम जागे होऊन विचार करू लागले की ही आगामी अराजकाची नांदी म्हणावी काय ? जर अराजक म्हणायचेच ठरले तर त्याचे यजमानपद चतर्जींना द्यावयाचे काय ?

वरील प्रश्नांचा विचार करण्यापूर्वी पुण्याच्या परिसरातील औद्योगिकरणाच्या वेगाकडे दृष्टिक्षेप टाकल्यास या प्रश्नाचे पैलू समजून येण्यास मदतच होईल. गेल्या २० वर्षांत पुण्याची चेहेरेपट्टी बदलू लागली. एकेक राजमार्ग नवीन कारखान्यांना आधार देऊ लागले. मुंबईरोड, नाशिकरोड, नगररोड, सोलापूर व सातारारोडवर छोटे मोठे ३०० ते ३५० कारखाने आज मूळ धरून आहेत. या कारखान्यात काम करणारे (कुशल-अकुशल) सुमारे १ लक्ष कामगार आहेत. त्यांपैकी फक्त ८००० ते ९००० कामगार या, ना त्या कारणाने गेल्या महिन्यापासून संपावर आहेत किंवा होते. त्यापैकी ३५०० स्वस्तिक रबर प्रॉडक्टस्, २२०० राजाबहादूर मोतीलाल मिल, ८०० प्रेस कामगार, ४०० सी. टी. आर, २५० महिंद्र ओवेन व सुमारे १००० कामगार कोकाकोला फॅक्टरी आणि इतर छोट्या कारखान्यातील संपावर होते किंवा यापैकी काही कारखान्यातील कामगार अजून संपावर आहेत.

गेली अनेक वर्षे या कामगारांच्यात सतत असंतोषाचा अग्नी धुमसत ठेवण्याचे कार्य पुढील ३-४ कामगार संघटनांनी केले आहे. १ : श्री. सोमनाथ नाईक यांची संघटना 'नॅशनल लेबर सेंटर' जी इंटकचे ध्येयधोरण अवलंबिते आणि पुण्यातील बऱ्याच कारखान्यां-

तील कामगारांचे नेतृत्व करते. त्यांकी किर्लोस्कर ग्रूप, रस्टन ग्रूप, सुदर्शन केमिकल, डाय-इची करकेरिया, सेंच्युरी-एन्का, राजाबहादूर मिल, सह्याद्री डायस्टफ् वगैरे कारखान्यातील कामगारांचे प्रश्न या संघटनेने यशस्वीरीतीने हाताळले आहे. २ : श्री. ए. डी. भोसले यांची 'सर्व श्रमिक संघटना' जी लालनिशाण गटाची समजली जाते आणि जिचे अस्तित्व मॅचवेल, प्युअर ड्रिंक्स, सी. टी. आर, आय. एन्. सी. वगैरे कारखान्यात आहे. पुण्यातील १२ प्रमुख ारखान्यांतील संप याच युनियनच्या प्रेरणेने चालू होता. ३ : श्री. चतर्जी यांची 'पुणे वर्कर्स फेडरेशन' जी मार्क्सवादी कम्युनिस्ट युनियन असून गेल्या दोन वर्षांत जोमाने कार्य करीत आहे. या फेडरेशनकडे बजाज ऑटो, महिंद्र ओवेन बकाऊ वुल्फ, स्वस्तिक रबर वगैरे मोठ्या कारखान्यातील कामगार आकृष्ट झाले आहेत, तसेच १०-१२ छोट्या कारखान्यातील कामगार संघटनांचे नेतृत्व श्री. चतर्जी करीत आहेत. या महत्त्वाच्या तीन संघटना सोडल्यास ज्यांचे नाव घ्यावे अशा संघटना पुण्यात नाहीत.

पुण्यात उन्हाळा सुरू झाला मार्चमध्ये आणि संपसत्राची लागण झाली. चतर्जींनी 'स्वस्तिक रबर'मध्ये अचानक संप घडवून आणला ५ मार्च रोजी. संपाला कारण पुरले दोन कामगारांना कामावरून सस्पेंड केले हे. वास्तविक स्वस्तिकमधील कामगारांची कमी पगाराबद्दल ओरड होती; परंतु त्या कारणावरून संप सुरू झाला नाही. तर ज्या दोन कामगारांनी अधिकाऱ्यांना मारहाण केली म्हणून ज्यांचेवर आरोप होता त्यांच्यासाठी एकाएकी संपाची हाक दिली गेली व अजून (दि. १४-४-७३) तो मिटला नाही. लेबर ऑफिसरांनी हा संप गैर असल्याचे मत दिले आणि चतर्जी यांची धाकधपटशाने मागण्या गळी उतरविण्याची संधी आणि कार्यपद्धती (Strategy) धुळीला मिळाली. त्यानंतर त्यांनी चिंचवड-पिंपरी भागातील कामगारांच्या गेट मिटिंग्ज घेऊन वरील संपाला पाठिंबा देण्यासाठी व त्या कारखान्यातील कामगार कार्यकर्त्यांविरुद्ध कारवाई केली म्हणून बकाऊ वुल्फ, जे. जी. ग्लास, महिंद्र आणि महिंद्र वगैरे कारखान्यात 'टोकन स्ट्राईक' घडवून आणले. अशा प्रकारे संपाचे लोण सुरू झाले आणि पुण्यातील कामगार जगतातील जीवन अधिकच तप्त आणि असह्य होऊ लागले. येथेच श्री. चतर्जींच्या कार्यपद्धतीची माहिती घेणे योग्य ठरेल. चतर्जी हे इतर कामगार नेत्यांपेक्षा थोडे वेगळे आहेत. त्यांचा आजकाल मान्यता पावलेल्या स्वार्थी जीवनाकडे कल नाही. ते कोणत्याही कामगाराच्या घरात राहतात. मिळेल ते खातात. त्यांच्यातच ऊठबस करतात त्यामुळे ते लवकर लोकप्रिय होऊ शकले. त्यांच्या कार्यामागे तळमळ आहे आणि मार्क्सवादी तत्त्वांचे अधिष्ठान आहे. कोठेही तडजोड करायची नाही, प्रश्नाचे स्वरूप

सतत ज्वलंत ठेवायचे हे त्यांचे धोरण आहे. कामगार त्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर लवकर भडकून उठतात हे त्यांना माहीत असल्याने त्यांना तशाच प्रश्नावर चेतवायचे आणि एकप्रकारे औद्योगिक वातावरण अशांततेने भारून टाकायचे. तसे पाहिले तर त्यांची स्वत:ची नोकरी ॲम्युनिशन फॅक्टरीत झाल्यामुळे त्यांना खाजगी क्षेत्रातील, उद्योगधंद्यातील फारसे ज्ञान नाही. परंतु संधिसाधू आणि 'चमचा युनियन'चा पाडाव त्यांनी आपल्या तोडक्या मोडक्या हिंदी-मराठी भाषणांनी करणे सुरू केले आहे असे म्हणावे लागेल.

अर्थात चतर्जीसारख्यांना संधी मिळण्यासारखीच आजची परिस्थिती आहे. कामगार भाववाढीच्या चरकात पिळला जात आहे. त्याच्या जीवनमानात वर्षानुवर्षात यत्किंचितही सुधारणा झाली नाही. याउलट कारखानदारमात्र गबर झाले आहेत. ही परिस्थिती पाहिली की माथी भडकवून देणारा नेता त्याचे योग्य भांडवल करतो. राजाबहादूर मिलमध्ये तेच घडले. या कापडगिरणीत इंटकची संघटना असून तिला मालकाने मान्यता दिलेली आहे. या संघटनेचे नाव 'गिरणी कामगार संघटना' असून तिचे जनरल सेक्रेटरी श्री. डिसूझा हे आहेत. पण कारखान्यात लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या या युनियनला काटशह ए. डी. भोसले यांच्या नेतृत्वाखालील युनियनने देणे चालू केले. त्यांना या गिरणीत कोणीकडूनतरी शिरकाव हवा होता. गेली दोन वर्षे त्यांचा प्रयत्न चालू होता पण जमले नाही. शेवटी वाढलेल्या भावांचे पाठबळ मिळताच डाव्या विचारांचे एक होऊन त्यांनी गिरणी कामगारांपुढे दोन मुद्दे ठेवून आंदोलन उभारले. १. 'विकली-ऑफ'न घेतल्यामुळे कामगारांना तिप्पट वेतन मिळावे. २. सध्या जे 'सोलापूर इंडेक्स'प्रमाणे पैसे मिळतात त्यात बदल व्हावा आणि पुणे इंडेक्सप्रमाणे पगारवाढ ठरवून द्यावी. अर्थात् कामगारांना हे फायद्याचे असल्यामुळे ते भोसल्यांकडे ओढले जाऊ लागले. त्यातून कामगारात दुफळी निर्माण होऊन मारामाऱ्या होऊ लागल्या. ३ मार्चला 'टोकन स्ट्राइक' झाला आणि आठ मार्चपासून कारखान्यात बैठा संप सुरू झाला. इंटकचे कामगार व त्यांची संघटना या संपाच्या विरोधी असल्यामुळे कारखान्याच्या आवारात दहशत धाकधपटशा, गुंडशाही सुरू झाली होती. तिच्याशी मुकाबला होऊ लागला. परिणामत: कारखान्यातील यंत्रसामुग्रीची मोडतोड झाल्यामुळे कारखान्याला टाळे ठोकण्यात आले. त्यानंतर डिसूझांच्या मान्य संघटनेने आपल्या कामगारांना कामावर हजर होण्याचा आदेश दिला व त्यांचे फॉर्म भरून घेतले. अशाप्रकारे संप संपण्याच्या मार्गावर असता भोसलेंच्या संघटनेने पुन्हा विरोध केला. त्यातून मोर्चे–प्रतिमोर्चे निघून दगडफेक झाली आणि संप मिटू शकला नाही. या बेकायदेशीर संपामुळे कामगारांचे व कारखान्याचे नुकसान होत होते.

त्याविरुद्ध मालकांनी कोर्टात दावा लावला. त्याचा निकाल श्री. भोसले यांचे विरुद्ध लागल्यामुळे कामगारात चलबिचल सुरू झाली. हातात पगार नसल्यामुळे ते बरेच हतबल झाले होते. अशावेळी पुण्यात महाराष्ट्र गृहराज्यमंत्री श्री शरद पवार यांचा मुक्काम होता. दोन्ही कामगार संघटनांनी आपले म्हणणे व गाऱ्हाणी त्यांचे कानावर घातली. त्यातून मार्ग काढण्याच्या उद्देशाने श्री. शरद पवार यांनी पावले उचलली. मालकांचे म्हणणे पडले, की सुमारे ६०-६२ कामगारांविरुद्ध मारामारी, मोडतोडीबाबत गुन्हे नोंदले गेले असल्यामुळे त्यांना कामावर घेता येणार नाही. त्यातून तडजोड होऊन प्रथम ३० जणांची नावे वगळली. नंतर २० जणांनी लेखी माफी मागितल्यामुळे त्यांना सोडण्यात आले व फक्त १०-१२ जणांना सजा म्हणून ३ महिने नोकरीबाहेर ठेवण्यास व त्यांचेविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यास श्री. शरद पवार यांनी सुचविले व भोसले यांनी मान्यता दिली, आणि ८ मार्च रोजी सुरू झालेला संप १० एप्रिल रोजी संपला.

या संपामुळे कामगारांचा काय फायदा झाला? काहीही नाही. कारण त्यांची एकही मागणी मंजूर झाली नाही. ३३ दिवसांचा पगार बुडाला. भोसले फुशारकी मारत आहेत की झुंडशाही केली तरी सरकारने आमचे काय वाकडे केले! परंतु जर शरद पवार मधे पडले नसते तर ६०-६२ कामगार गुन्हे केल्यामुळे बाहेर राहून त्यांनी भोसलेंना सळो की पळो करून सोडले असते. पण—... आपल्याकडील काही राजकारण्यांना काहीतरी करून कुठेतरी आपले नाक खुपसून आपले पुढारीपण गाजवायला संधी हवी असते. 'मी संप मिटविला' हे श्रेय हवे असते. परिणामत: आमदार श्री. मगर, कामगार खात्याचे मंत्री श्री. शंकरराव पाटील यांनी या तडजोडीला नापसंती दर्शविली. पण काय करतात! आपलेच दात आणि... वास्तविक श्री. शरद पवार यांचे काम कायदा व सुव्यवस्था पाहण्याचे होते त्याऐवजी त्यांनी आय. डी. अ‍ॅक्टची पायमल्ली करून कायदेभंग करणारांना सावरून त्यांच्या कृत्यावर पांघरुण घातले हे कितपत योग्य आहे? पोलीस अधिकाऱ्यांचा ताण वाढला होता. त्यांनी संप मिटवावा म्हणून जर काही असा बदसल्ला दिला असला तर तो मंत्रीमहाशयांनी मानावा काय? मंत्र्यांच्या अशाप्रकारच्या हस्तक्षेपामुळे जे कायद्याने वागणारे आहेत त्यांचेवर एकप्रकारे अन्यायच होत नाही काय? व जे धश्चोटपणाने वागतात त्यांच्या वागणूकीस खतपाणी घालण्यासारखे नव्हे काय? दहशतीपुढे कायदा वाकतो असा समज होऊ नये.

या संपाच्या सत्रामुळे जर कोणी त्यातून नक्षलवाद निर्माण होणार आहे असे सूत्र काढण्याचा प्रयत्न केला तर ते योग्य नाही. हे संप तात्कालिक आहेत. मात्र कामगारांना निवासस्थाने, योग्य वेतन दिले नाही आणि भाववाढ रोखली नाही तर मात्र चतर्जी महाशय महाराष्ट्राचे चारू मुजूमदार किंवा कनू सन्याल म्हणून मान्यता पावू शकतील!

● ● ●

# कोकण रेल्वे नव्हे पश्चिम किनारी रेल्वे

प्रा. रा. म. बिवलकर

पहिल्यापासून कोकणाचे नशीबच खडतर आहे.

सह्यगिरीच्या पश्चिम बाजूस सुमारे चाळीस मैल रुंदीची पाच-सहाशे मैल लांबीची ही पश्चिम किनारीपट्टी डोंगराळ, खडकाळ, अतएव मागासलेली आहे. इथे बुद्धीमत्ता पिकत आली पण तिचा इथून निचरा झाला. कोकणात नेहमीच चोथा उरत आला. परशुराम-निर्मित हा अपरांतप्रांत, वसिष्ठाला पृथ्वीचे दान देऊन कफल्लक झालेल्या त्या महापुरुषाचाच वारसा आजवर सांगत आला. या भागाचा विकास व्हावा यादृष्टीने १८८४ साली म्हणजे जवळजवळ नव्वद वर्षांपूर्वी, मुंबईच्या दक्षिणेस रेल्वे नेण्याची कल्पना प्रथम पुढे आली. त्यानंतर १९०३-१९०४ साली घेतलेल्या जमीन महसुली पाहणीच्या अहवालात तिची आवश्यकता प्रतिपादन केली गेली.

१९०४ साली कुलाबा जिल्ह्याचे त्यावेळचे कलेक्टर श्री. ए. आर. बोनस यांनीही कोकणरेल्वेची जोरदार शिफारस केली होती. 'टाईम्स् ऑफ इंडिया' 'इंदुप्रकाश' या सारख्या वर्तमानपत्रांनी ती उचलून धरली होती. १९१७ साली श्री. जी. ए. मीरकर नामक एका निवृत्त इंजीनियर महाशयानी कोकण रेल्वेचा संपूर्ण—संगतवार प्रकल्प निळ्या कागदावर आखला होता. खर्चाचे अंदाज, रेल्वेचे अलायनमेंट, मालवाहतुक, रेल्वे वाहातूक, नफा या सर्व गोष्टींचा साक्षेपाने विचार केला होता. कर्जत, अलिबाग, रेवदंडा आणि मग किनारपट्टीने रत्नागिरीपर्यंत ही रेल्वे धावणार होती. पण मीरकरांचा प्रकल्प सरकारच्या कबुतरी खुराड्यात धूळ खातच पडला.

जेव्हा जेव्हा आवाज उठावा तेव्हा सरकारने पाहणीचा पसारा मांडावा,

पुन्हा काही कारण पुढे करून रेल्वे प्रत्यक्षात उतरणे अशक्यच म्हणावे असे अनेकवार झाले. १८८४, १८९४, १९०४, १९१०, १९२३, १९२६–२७ अशी अनेकवार ही पहाणी झाली. त्यात एम्. एस्. एम्., जी. आय्. पी., साऊथ रेल्वे अशा अनेक रेल्वे कंपन्यांनी व टाटा उद्योगसमुहाच्या इंजीनियरांनीही भाग घेतला. पण या साऱ्या प्रयत्नांनी मूळ धरले नाही. कोकणच्या उंचसखल डोंगराळ प्रदेशामुळे, पहाणीतून खर्चाचा डोंगर पुढे उभा राही–आणि तो कोकण रेल्वेचा मार्ग अवरुद्ध करी! व्यापारी दृष्टया ती तोटयाची ठरत होती.

१९२६–२७ साली जी. आय्. पी. रेल्वेने, ठाणे जिल्ह्यातील मुंबई-कल्याण या मुख्य रेल्वेमार्गावरील दिवा या गावापासून, कुलाबा जिल्ह्यातील महाड या गावाजवळच्या दासगाव नामक खाडीवरील बंदरापर्यंतच्या रेल्वे-फाटयाची पहाणी केली. दिवा–दासगाव रेल्वे या नावाने तो प्रकल्प प्रसिद्ध आहे. या १५२ किलोमीटरी रेल्वे फाटयाचा खर्च सव्वाकोटी रुपयांच्या घरात होता. पण त्यावेळी ही लाईन ब्रॉडगेज असावी की मीटरगेज असावा यावर वाद माजला आणि भट्टी पुन्हा थंड पडली. त्याचवेळी इतरही अनेक मार्ग पुढे आले होते पण पुढल्या दहा-बारा वर्षांतील महामंदीमुळे आणि त्या-नंतर सुरू झालेल्या महायुद्धामुळे कोकण रेल्वेविषयक सारी कागदपत्रे, निळे नकाशे, अंदाज–धूळखात पडले.

स्वातंत्र्योत्तर काळात श्री. अ. ब. वालावलकर व मुंबईचे श्री. पी. आर्. गुप्ते यासारख्या रेल्वे इंजीनियरिंग क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळींनी मांडलेल्या मीटरगेजी रेल्वे मार्गाचा प्रकल्प– 'मुंबई-मंगळूर ब्रॉडगेज मार्गाची कल्पना शासनाच्या विचाराधीन आहे' अशी घोषणा करून उखडला गेला. श्री. वालावलकर यांची योजना तप-शीलवार होती. कोकणाचे तिन्ही जिल्हे सामावणारी होती. गोवा भारतात विलीन झाल्यावर काही भागापर्यंत पोचणारी होती. सावंतवाडी बेळगावला जोडून दक्षिण कोकणचा आंतरदेशीय प्रदेशाशी सुसंगत संबंध प्रस्थापित करणारी होती. पण मुंबई–मंगळूर ब्रॉडगेजची घोषणा प्रादेशिक न वाटणारी अतएव अधिक मोलाची वाटली. कोकणातील प्रातिनिधिक म्हणविणाऱ्या विस्कळीत संघटना कोकण रेल्वेचा आवाज उठवीत होत्या. पण त्या मागण्या प्रादेशिक आणि संकुचित वाटत होत्या.

## केळुसकरांची योजना

मुंबई–मगळूरची घोषणा झाली. पण सरकारी रेल्वेयंत्रणा थंड बसली होती. अशावेळी जगन्नाथराव केळुसकर नामक एका व्यापारी चित्रकाराने कोकणरेल्वेचे प्रत्यक्ष मॉडेल निर्माण केले. मुंबई–मंगळूर या पश्चिमकिनारी रेल्वेचा भाग म्हणून ही योजना होती. तो गाडी खोपोली, पेण, नागोठणे, माणगाव, दासगाव, महाड, पोलादपूर, कशेडी, खेड, चिपळूण, संगमेश्वर, रत्नागिरी, राजापूर अशा मार्गावरून धावत होती. कोकण म्हणजे डोंगराळ

प्रदेश, त्यामुळे ठिकठिकाणी बोगदे खणावे लागतील व म्हणूनच ही आवाढव्य खर्चात पाडणारी योजना आहे अशी जो भ्रामक कल्पना, कोकण न पाहिलेल्या अनेकांच्या मनात घर करून बसली होती ती किती चुकीची आहे हे श्री. केळुसकरांच्या मॉडेलने सिद्ध केले. कारण या सर्व रेल्वे मार्गात कशेडीच्या घाटात फक्त एकच बोगदा खणावा लागत होता. श्री. केळुसकरांची योजनाही तपशीलवार आखलेली होती. तिचे प्रात्यक्षिक त्यावेळचे मुंबई राज्याचे मुख्यमंत्री ना. मोरारजीभाई देसाई यांनीही पाहिले होते.

१९५३ साली नोव्हेंबरमध्ये रेल्वेबोर्डाने दिवा-दासगाव या मार्गाची पुन्हा यांत्रिकी व वहातुकी पहाणी केली. पण पुन्हा १९६९ पर्यंत सर्व थंड ! कोकणचा जोरदार मंत्री मुंबईच्या मंत्रिमंडळात नव्हता म्हणून म्हणा अगर कोकणरेल्वेचे नाव कुणी काढले की त्याच्यावर प्रादेशिकतेचे खापर फुटत होते म्हणून म्हणा, किंवा कोकण रेल्वेच्या अफाट खर्चाचा अंदाज पुढे आला की, रेल्वेबोर्ड व केंद्रीय मंत्रिमंडळ पान उलटीत असे आणि महाराष्ट्राच्या या अविकसित भागाची दाद दिल्लीत लागत नसे; असेही असेल कदाचित. अथवा भाषावार प्रांतरचना, मोठे नेत्रदीपक प्रकल्प, सत्तेचे विकेंद्रीकरण, योजनाबद्ध(!) आर्थिक विकास या मोठ्या समस्यांचा उकल चालू असता त्या भाऊगर्दीत कोकण रेल्वेची वर्णी दिल्लीदरबारी लागावी कशी ?

दुसऱ्या पंचवार्षिक योजनाकाळात १९५९–६० साली कोकणरेल्वेची सुरुवात म्हणून दिवा–पनवेल–उरण हा फाटा मंजूर झाला. पण पुरा व्हायला ६६ साल उजाडले. आणि त्याने ५।६ कोटी रुपये जिरवले. पण त्यात उरणप्रमाणेच पनवेल–आपटा हा ' रासायनी ' नामक सरकारी कारखान्याला जोडणारा फाटाही फुटला.

मुंबईच्या दक्षिणेला, कोकणात रेल्वे रूळ तर पडले. पण म्हणून कोकणरेल्वेची मागणी पुरी झाली असे म्हणता येत नव्हते. पुढले काम लवकरच सुरू होईल अशी आश्वासने मिळत होती. पण कधी पैसे नाहीत म्हणायचे. कधी पहाणीप्रीत्यर्थ लाखभर रुपये मंजूर करायचे पण पहाणीचे नाव घ्यायचे नाही ! प्रतिवर्षी अर्थसंकल्पात मंजूर झालेली ती रक्कम परत खजिन्यातच राहायची ! ' भिजत घोंगडे आणि परत घोडे पडावे ' हीच कोकणरेल्वेची नेहमीची रड ! तृतीय योजनेने फटका खाल्ला. नियोजनाला तीन वर्षे सुट्टी मिळाली कोकण रेल्वेचे कागद सरकार दरबारी उबत पडले होते.

चौथी पंचवार्षिक योजना घाटू लागली आणि अनेकांच्या प्रयत्नांमुळे कोकणरेल्वेचा नव्हे तर पश्चिम–किनारी रेल्वेचा प्रश्न पुन्हा घसास लागला. चौथ्या पंचवार्षिक योजनेत मुंबई–मंगळूर या साडेचारशे मैल लांबीच्या पश्चिम किनारी रेल्वेचा ' रेकनायझन्स ' आणि ट्रॅफिक सर्व्हे करण्याच्या आज्ञा सुटल्या. महाड,

रत्नागिरी व गोवा अशा तीन डिव्हिजन्स पाडून या पाहाण्याचे काम १९६९ साली धडाक्याने सुरू झाले. २६ लक्ष रुपये त्या कामार्थ मंजूर झाले होते आणि दीडवर्षात अहवाल सादर करायचा होता.

### मराठे, आजगावकर आणि मी

रेल्वेची सर्व्हेवाली मंडळी आणि इंजीनियर्स कोकणातून विविध अलायन्मेंट्सची पहाणी करू लागले. एक दिवस चीफ इंजीनियर श्री. मराठे व एक्झिक्युटिव्ह इंजीनियर श्री. आजगावकर यांचा मुक्काम महाडच्या रेस्ट हाऊसवर आहे अशी बातमी मिळाल्यावर मी या रेल्वेसंबंधात त्यांची मुलाखत घ्यायला रात्री ९ वाजता रेस्ट हाऊसवर हजर झालो. श्री. मराठे व श्री. आजगावकर इंग्लंडमध्ये चालू असलेल्या भारत-एम्. सी. सी. सामन्याची कॉमेंट्री ऐकत विश्रांती घेत होते. तरीही त्यांनी माझे छान स्वागत केले कॉमेण्ट्री बद करून ते माझ्याजवळ बोलू लागले.

'मराठेसाहेब, तुम्ही या रेल्वेमार्गाची पहाणी चालविली आहे. तुम्हाला ही रेल्वे विकासाचे एंजिन बनेल असे वाटते का?' मी.

'विकासाचे एंजीन बनणे न बनणे कमर्शिअल सर्व्हे ठरवील. आम्ही अलायन्मेंटची पहाणी करीत आहोत." –श्री. मराठे म्हणाले.

'कुठल्या अलायन्मेंट्स् तुमच्यासमोर आहेत?'

'एक–समुद्र किनारपट्टीपासून ५–१० मैलांवरून समांतर जाणारे आणि दुसरे मुंबई-गोवा रस्त्याला समांतर जाणारे. यात पुन्हा पर्यायी मार्ग आहेतच'–मराठे.

'तुमच्या मते कुठले अलायन्मेंट योग्य?'–मी.

'योग्यायोग्यता–अनेक गोष्टीवर अवलंबून असते. पण खर्चाच्या दृष्टीने पाहिले तर किनारपट्टीने जाणारा मार्ग अधिक खर्चाचा कारण अनेक खाड्या या रेल्वेला ओलांडाव्या लागतील–आणि तितके पूल भरमसाठ पैसा मागतील. गोव्याच्या पलीकडे म्हैसूर-केरळ भागात किनारपट्टीचे अलायन्मेंटस् नक्की केले आहे. पण तिथे कुलाबा-रत्नागिरी एवढ्या खाड्या, नद्या-नाले नाहीत आणि किनारपट्टीही तेवढी डोंगराळ नाही.'–मराठे

'म्हणजे मुंबई-गोवा रस्त्याला समांतर जाणाऱ्या मार्गाचीच तुम्ही प्रामुख्याने पहाणी करीत आहात'–मी

'आम्ही दोन्ही पहाण्या करीत आहोत. मघा सांगितला तो प्रत्यक्ष अनुभवाला आलेला भाग'–मराठे

'पण दोन्ही अलायन्मेंट्स् खूपच पैसा मागणाऱ्या आहेत. व्यापारी दृष्ट्या न परवडणाऱ्याच आहेत. तुम्हा मंडळींची मागणी–यांत्रिकी–व्यापारी व आर्थिक गोष्टी विचारात न घेता राजकीय दृष्टिकोणातून केली जात आहे असे माझे मत आहे'– श्री. आजगावकरांनी प्रथमच संभाषणात भाग घेतला. लेंगा, झब्बा घातलेला हा तरुण गृहस्थ मोठा स्मार्ट दिसत होता. अधिकाराचे तेजही त्याच्या मुखावर दिसत होते. मी त्यांच्याकडे वळून म्हटले,

'आपण कोकणातलेच ना ?'

'या. बट अवर फॅमिली हॅज् शिफ्टेड टु बॉम्बे फॉर लास्ट थ्री जनरेशन्स्.'

'पण म्हणून काही या मातीचे प्रेम अगदीच सुटू नये.' श्री. मराठे हसत होते.

'मला समजला नाही तुमचा प्रश्न.' श्री. आजगावकर.

'कोकणी माणसाला तरी आपल्या मातृभूमीचा अभिमान वाटावा! तुम्ही म्हणता तो गोष्ट खरीच आहे.कोकणात काऽही पिकत नाही. कोकण दरिद्री आहे. पण तो तसाच राहावा का ? विकासाची संधीच त्याला मिळू नये का ?'–मी

'पण विकासार्थ काही पोटेन्शॉलिटी हवी की नाही ?'–आजगावकर

'ती हवी आणि आहेही. .पण भारत.च्या किनारपट्टीतील रेल्वे-फाट्यांचा नकाशा आपण पाहिला तर आपल्याही सहज लक्षात येते की, मुंबई ते मंगळूर या एवढ्या पश्चिम किनार-पट्टीत रेल्वेमार्ग दिसत नाही. पश्चिम किनारपट्टीला, मांडवा, मुरुड (जजिरा), दाभोळ, रत्नागिरी, मार्मागोवा अशी बारमाही बंदरे आता उभारली जात आहेत. या बंदरांचे अंतर्देशाशी नाते जोडायला तर रेल्वे हवीच, पण उद्या युद्धाचा प्रसग आला तर या महत्त्वाच्या केंद्रांचे संरक्षण करण्याकरताही रेल्वेची संरक्षक फळी हवी.' मी

'प्रोफेसर विवलकर, अजून तुम्ही शिवाजी महाराजांच्या ढालतलवारीच्या युद्धाच्या जगात असल्यासारखे बोलता. जग अणुयुगातील वाटचाल करीत आहे. आता संरक्षणाच्या कल्पनाच बदलल्या आहेत. लंडनमधून अगर मास्कोमधून भारताच्या सर्व उद्योगनगरावर अचूकपणे बॉम्बफेक करता येईल. किनारपट्टीचे संरक्षण म्हणून रेल्वेची मागणी कसली करता ?'–आजगावकर

आता माझ्यातल्या प्राध्यापकाला आव्हानच मिळाले. मी म्हणालो,

'आजगावकरसाहेब, हे अणुयुग आहे हे मान्य. पण जगातली कमीतकमी सात-आठ राष्ट्रे आज अणुशस्त्रसुसज्जित आहेत ही तर गोष्ट खरी. याचा अर्थ आता महायुद्ध उद्भवले तर त्यात कुणाचाच जय अगर पराजय व्हायचा नाही! या साऱ्या पृथ्वी गोलाचाच उच्छेद त्यातून सभवेल! पण म्हणूनच कुणी कुणावर आय्. सी. बी. एम्., अणुबॉम्ब वा हैड्रोजन बॉम्ब टाकण्याचा यत्न करणार नाही. पण महायुद्ध उभे राहिले नाही तरी आम्हाला आमच्या नजिकच्या शत्रूंशी स्थानिक लढायांनी मुकाबला करावा लागणारच आणि या लढायात आमचे नाविकदल, वायुदल, रणगाडे, तोफा, बंदुका, सैनिक यांनाच महत्त्वाचे स्थान आहे. लढाईच्या भागात रसद पोचविणे सुकर होते रेल्वेमुळे. त्यामुळेच आजवर दुर्लक्षिलेली पश्चिम किनारपट्टी आता दुर्लक्षून चालणार नाही कोकणात रेल्वे बांधणे त्रासाचे आणि अधिक खर्चाचे असले तरीही नफा-तोटा-भांडवल-व्याज यांची गणिते

न मांडता हा प्रकल्प आता अग्रक्रमाने पुरा व्हायला हवा. देशाच्या कुठल्याही सीमा असुरक्षित ठेवणे हा राष्ट्रद्रोह ठरेल.'–मी

'सेंटिमेंट्स् बाजूला ठेऊन आपण चर्चा करू या. प्रोफेसरसाहेब, हा मुलख डोंगराळ. चढउताराचा. रेल्वेलाईन एस्. टी. सारखी हे चढउतार चढत-उतरत नाही. प्रत्येक ठिकाणी भराव टाकून हे डिप्स् काढावे लागतील. नद्या-नाल्यावर पूल उभारावे लागतील कारण रेल्वे काही विशिष्ट पद्धतीनेच चढउतार सोसू शकते.'–आजगावकर.

'खंडाळा घाटात दर ३७–३८ फुटाला एक फूट चढ तुम्हा इंजीनियरांनीच बांधून काढला ना? शिवाय २६–२७ बोगद्यांचा प्रपंच वेगळाच. मग तिथे जे शक्य झाले ते कोकणात का शक्य नसावे? खंडाळा घाटासारखे घाट तर या भागात नाहीत.'–मी

'त्या वेळेची गोष्ट सोडा. आता १५० ते २०० फुटाला एक फूट एवढाच चढ आम्ही ठेऊ शकतो. त्यामुळे भराव फार लागेल आणि काही बोगदेही.'–आजगावकर

'श्री. केळुसकरांनी आपल्या मॉडेलमध्ये कशेडी घाटातला एकत्र बोगदा दाखविला आहे. कोकणात रेल्वेमार्ग अनेक बोगद्यातून जावा लागेल ही कल्पना भ्रामक आहे.'

'पण चढउतार किती आहेत?'

'पण ते असले तरी, पुढे मागे पश्चिमकिनारी रेल्वे कोयना-शरावतीच्या विजेवर चालू लागली तर ऑपरेशन कॉस्ट कितीतरी कमी येईल. कारण माझ्या माहितीप्रमाणे, विजेरी इंजिने चढावावर वीज जास्त वापरतात पण उतारावर ती वीज जनरेट करतात'

"मि. आजगावकर मि. प्रोफेसर सीम्स् टु बि वेल इन्फॉर्म्ड्'–श्री. मराठे म्हणाले.

'मराठेसाहेब, मी कोकणातला आहे. पण मी सेंटिमेंट म्हणून या प्रकल्पाकडे पाहात नाही जिथें रबर टायर पोचला तिथे संस्कृती पोचते आणि ज्या भागाने रेल्वेइंजीनाची शिटी ऐकली तिथे विकासाची इशारत मिळाली. इन्फ्रास्ट्रक्चर तयार झाल्यावाचून विकास होईलच कसा? शिवाय मुंबई-मंगळूर ही किनारपट्टी वाहतुकीच्या दृष्टीने मागासलेली असल्याने हा किनारा चोरटी आयात करणाऱ्यांचे माहेरघर बनला आहे, निर्वाहाचे उत्तम साधन उपलब्ध नसल्याने कोकणातली दरिद्री मंडळी या समाजद्रोह्यांचे हस्तक बनत आहेत. हीही आपत्ती मोठीच नाही का? शिवाय आज मंगळूरकडील केरळ-म्हैसूर-मधली मालाची वाहतुक गुंटकलमार्गे मुंबईला होते–हा केवढा द्राविडी प्राणायाम. या कॉस्ट्स् महत्त्वाच्या नाहीत का?'

'तुम्ही या प्रश्नाचा बराच अभ्यास केलेला दिसतो. पण कमर्शियली ही लाईन किफायतशीर होण्याची शक्यता दिसल्याखेरीज ही पश्चिमकिनारी रेल्वे मूळ धरणे कठीण हेही खरेच कोकण रेल्वे व्हावी असे आम्हाला कितीही वाटले तरी वाहतुकीच्या आकडयांनी ते बोलायला हवे'–मराठे

पृष्ठ ४५ वर

# आ ले पा क

■ २४ मार्चच्या 'माणूस'मधील 'सखाराम, दो राहा आणि दैनिके' या लेखात सौ. शकुंतला फडणीस म्हणतात : पुष्कळ कापड कंपन्यांच्या कित्येक जाहीरातीत कापडापेक्षा विवस्त्रतेचीच जाहीरात दिसते. कपड्यांच्या दुनियेत असला नागवेपणा कशासाठी ?

कपड्यांच्या दुनियेतच नागवेपणाला किंमत. न्यूडिस्ट कॉलनीत त्याला कोण विचारतो ?

■ त्याच अंकात 'कलकत्ता मेल' या सदरात सौ. तारा पंडितांनी एका परिसंवादाचे वृत्त दिले आहे. त्यात एक विद्यार्थी म्हणतो : कॉलेजचे अध्यापक आपली कर्तव्ये बरोबर बजावीत नाहीत म्हणूनच आम्हा विद्यार्थ्यांना सध्या शोचनीय दशा अनुभवावी लागत आहे. त्यामुळे विद्यापीठ म्हणजे केवळ गारगोट्यांचा एक समूह झाला आहे.

आमच्या महाराष्ट्रात तर साक्षात 'गारगोटी विद्यापीठ' या नावाचे एक विद्यापीठ आहे !

■ वरील परिसंवादाचे वृत्त देऊन अखेर सौ. पंडित उद्‌गारतात : इतर लोक आता आमचे डोळे उघडून देत आहेत; पण आम्ही स्वत: आपले डोळे केव्हा उघडणार कोण जाणे !

मी जाणे : आम्ही आपले डोळे सगळीकड अंधार झाल्यावर उघडणार!

■ १ एप्रिलच्या 'सोबत'मधील एक लेख : मनगटशाहीचे म्हणणे तरी काय आहे ?

मनगटशाहीला 'म्हणणे' असते ?

■ चौपन्नाव्या मराठी नाट्यसंमेलनाचे उद्‌घाटक महाराष्ट्राचे अर्थमंत्री मधुकरराव चौधरी म्हणाले : संगीत आणि नाटक यांचा सबंध काय आहे हे मी सांगायला पाहिजे असे नाही.

असे कसे ? असल्या गोष्टी मंत्र्याने सांगितल्याशिवाय आमचे समाधान कसे व्हायचे ?

■ वर्तमानपत्रातील एका लेखात म्हटले आहे : आज आपणास असे दिसते की, सामान्य नागरिक हा सतत असंतुष्ट, वैफल्यग्रस्त आणि संतप्त अशा चमत्कारिक अवस्थेत कोठेतरी भरकटत चालला आहे.

यात विशेष ते काय : ही तर सामान्य माणसाची वर्णनात्मक व्याख्याच आहे.

■ एक बातमी : मॉस्को– ता. २३ मार्च; रशियन शास्त्रज्ञांनी आपल्या प्रयोगशाळेत कृत्रिम सूर्य तयार करण्यात

यश मिळवले आहे.

ज्या रशियाने कृत्रिम समाज तयार केला त्याने कृत्रिम सूर्य तयार केला यात नवल ते काय ?

■ पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष भुत्तो एका भाषणात म्हणाले : भारताइतकी वाईट परिस्थिती जगात इतर कोणत्याही देशात आढळत नाही. भारतातील कोटयावधी लोक रस्त्यावर झोपतात.

तरी त्यांना शांत झोप लागते. तेव्हा परिस्थिती भुत्तो म्हणतात तितकी काही वाईट नसणार !

■ बांधकाम आणि दळणवळण खात्यावरील चर्चेत कळवणचे अपक्ष आमदार निवृत्ती भोरकडे म्हणाले : नाशिक जिल्ह्यातील मालेगाव-सटाणा रस्त्याच्या स्थितीवरून लोक त्याला ‘ डिलिव्हरी रोड ’ म्हणतात. कारण या रस्त्यावरून जाणाऱ्या गाडीत एखादी गर्भवती असेल तर तिला दवाखान्यापर्यंत जाण्याची गरजच पडत नाही; ती गाडीतच प्रसूत होते.

इतकेच नव्हे तर एकाच्या जागी तिला जुळे होते, असेही घडत असेल !

■ विधानसभेत केशवराव धोंडगे म्हणाले : आमदार निवासात आम्हाला दोन-दोन महिने एकटयाने राहावे लागते आणि इकडे आमच्या खोलीत चार-चार उशा आहेत. करायच्या काय या चार-चार उशा ?

आमदार निवासात वेळीअवेळी येणाऱ्या पाहुण्यांची गैरसोय होऊ नये असा छुपा हेतू त्यामागे असावा.

■ काँग्रेसचे एक पुढारी म्हणतात : काहीही करून शिक्षणक्षेत्रातून गाढवांना हाकला.

पण तेथून हाकलल्यावर त्यांना अन्य कोठल्या ‘ क्षेत्रा ’त पाठवायचे हा प्रश्न उरतोच.

■ विजय तेंडुलकरांना मारहाण केल्याबद्दल मुंबई हिंदुसभेच्या उपाध्यक्षाने आपल्याला भररस्त्यावर मारहाणीची धमकी दिली अशी तक्रार कर्तारसिंग थत्ते यांनी केली आहे.

कर्तारसिंग थत्त्यांना ‘ लोकसत्ते ’-सारखी कचेरी असती तर अशी धमकी देण्याची पाळी त्या उपाध्यक्षावर आली नसती.

■ रजनी पटेलांच्या मते मुंबई महापालिका निवडणुकीत काँग्रेसपक्षाचा पराभव झाला असला तरी कार्यकर्त्यांचे नीतिधैर्य खचलेले नाही.

आता काळच असा येतो आहे की, विजयानेच काँग्रेस पक्षाचे नीतिधैर्य खचण्याची शक्यता आहे.

■ नवोदित अभिनेत्री रीना रॉय ‘ महाराष्ट्र टाईम्स ’मधील मुलाखतीत म्हणते : मला नाव मिळवायचे आहे. मोठ्ठी नटी म्हणून लौकिक संपादायचा आहे. पैसा मिळेल; पण माझ्या दृष्टीने पैशाला महत्त्व आहे दुय्यमच !

पैशालाच प्रधान महत्त्व देणारे कोणीच कसे बरे नाही या सिनेसृष्टीत?

■ ७ एप्रिल १९७३ च्या 'माणूस'-मधील मटक्याची सामाजिक मीमांसा करणाऱ्या आपल्या लेखात निळू दामले म्हणतात : नाहीतरी रतनचा मटका आणि सरकारची लॉटरी यात गुणात्मक फरक काहीच नाही.

असेल हो. दामल्यांचा निळू आणि फुल्यांचा निळू यात काहीच फरक नाही असे कसे होईल ?

■ त्याच लेखात पुढे म्हटले आहे : बटाटयाची किंमत सफरचंदाच्या किंमतीला जाऊन भिडते आहे.

त्यामुळे उपाहारगृहातून आता बटाटेवडयासारखा सफरचंदवडा मिळणार आहे.

■ स. का. पाटील म्हणतात : महापालिकेत राजकारण नसावे या तत्त्वाचा मी गेली काही वर्षे पुरस्कार करीत आलो आहे.

महापालिकेतच काय पण एकूण जीवनातच राजकारण नसावे असे पाटलांनी म्हटले तर तेही आता समजण्यासारखे आहे.

■ नॅशनल बुक ट्रस्टने केलेल्या पाहणीत असे आढळून आले की भारतात पुरुषांपेक्षा स्त्रिया पुस्तके अधिक वाचतात.

भारतीय स्त्री-पुरुषांच्या आम्ही केलेल्या पहाणीत असे आढळून आले की वाचन आणि अक्कल यांचा अन्योन्यसंबंध असतोच असे नाही.

■ पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष झुल्फिकार अली भुत्तो एका भाषणात म्हणाले : अनुकूल वातावरण निर्माण होईल असे वाटल्यावरून मी शेख मुजीब यांची बिनशर्त सुटका केली; परंतु तसे काही घडलेच नाही. जो मनुष्य शब्द पाळीत नाही त्याच्यावर मी विश्वास ठेवू शकत नाही.

आम्ही ठेवू शकतो ! ●

## राज्यपुरस्कार : एक नाकारणे

या वर्षीचा राज्य साहित्य पुरस्कार-वितरण समारंभ गुढीपाडव्याच्या शुभ दिवशी यथासांग पार पडला. ज्यांना पारितोषिके मिळाली त्यांचे चार दिवस मजेत जातील. ज्यांना ती मिळाली नाहीत त्यांचेही चार दिवस तसे वाईट जाणार नाहीत; कारण त्यांना आपल्या बोलण्यात वशिलेबाजीचे नित्यरुचकर आख्यान लावता येईल. पारितोषिक मिळूनही ज्यांनी ते नाकारले त्या रत्नाकर मतकरींबद्दल काय बोलावे ? त्यांच्या करारी, बाणेदार, न्यायनिष्ठुर कृतीमुळे त्यांना बऱ्यापैकी प्रसिद्धी मिळायला हरकत नाही. (तसे खरोखरच झाले तर मतकरींचेही काही दिवस खुशीत जातील, असा आमचा संशय आहे.)

रत्नाकर मतकरींनी पारितोषिक का

नाकारले? या प्रश्नाची अनेक उदाहरणे आम्हाला ऐकायला मिळाली. ती सारी येथे सांगून आपल्या कल्पनाशक्तींचा अनादर करणे बरे दिसणार नाही. आमच्या अल्पमतीप्रमाणे मात्र, समारंभपूर्वक पारितोषिकाचा अव्हेर करताना रत्नाकर मतकरींनी त्यामुळे मिळणाऱ्या प्रसिद्धीचा विचार हिशोबीपणाने केला असावा. एरवी कोणीही मराठी साहित्यिक, मिळू घातलेले पैसे असे सुखासुखी वाऱ्यावर सोडील काय?

आम्हाला (आमच्याच अल्पमतीप्रमाणे) असे वाटले याचे साधे कारण असे आहे की, प्रसिद्धी ही गोष्ट गेल्या काही दिवसात दुर्मिळ होऊन बसली आहे: विशेषत: नाटककारांची प्रसिद्धी. म्हणजे प्रसिद्धी पार नाहिशी झाली आहे असे नव्हे; तर आमचे विजय तेंडूलकर तिचे या क्षेत्रीचे एकमेव मक्तेदार होऊन राहिले आहेत. विजय तेंडुलकरांच्या प्रसिद्धीचा आमच्यासारख्या निर्मळ मनाच्या माणसालासुद्धा हेवा वाटतो; मग तमाम साहित्यिकांना त्यातही हौशी वा व्यावसायिक नाटककारांना, तो वाटला तर ते युक्तच होय.

एरवी, रत्नाकर मतकरींनी पारितोषिक नाकारण्याचे जे कारण सांगितले त्यात वावगे काही नाही. प्रौढ गटात इतर वाङ्मयप्रकारांसाठी पंधराशे रुपयांची पारितोषिके असताना फक्त एकांकिकेला वा एकांकिकासंग्रहाला पाचशे रुपयांचे पारितोषिक योजणे ही त्या वाङ्मयप्रकाराची अप्रतिष्ठा होय. मतकरींना चीड आली ती या अप्रतिष्ठेची: पारितोषिक नाकारून या अप्रतिष्ठेची जाणीव त्यांनी सर्वांना करून दिली.

पण त्यामुळे, रकमेपेक्षा भावनेचे मोल अधिक मानणाऱ्या सरकारला, उपस्थित चाहत्यांना आणि मला केवढे तरी वाईट वाटले त्याचे काय? मला वाईट वाटले याला सर्वस्वी खासगी कारण आहे. गुढीपाडव्याच्या आधी चार-पाच दिवस रत्नाकर मतकरींची भेट झाली होती. त्यावेळी पारितोषिक नाकारण्याचा विचार त्यांनी बोलून दाखवला होता. तेव्हा मी आपला त्यांना पाचशे रुपयांचे पारितोषिक स्वीकारून मग निषेध करण्याचा मध्यमवर्गीय आणि मध्यममार्गीय उपदेश केला होता. पण रत्नाकर मतकरी भलतेच निःस्पृह त्यांनी आमचा उपदेश मानला नाही; आणि पाचशे रुपयांवर पाणी सोडले.

मग मला एक नामी कल्पना सुचली: मतकरींनी पदरचे एक हजार रुपये पारितोषिकाच्या पाचशे रुपयांच्या रकमेत घालून पंधराशे रुपयांचे पारितोषिक घ्यायचे आणि वर अन्यायाचा शाब्दिक निषेध करायचा! याने काय साधले असते? सगळे साधले असते: सरकारची भावना फारशी दुखावली नसती; अन्यायाला जाहीर वाचा फुटली असती; योग्य ती प्रसिद्धी मिळालीच असती; पाचशे रुपये हातचे निसटले नसते; आणि मुख्य म्हणजे मामला एवढा उगाचच गंभीर झाला नसता.

कारण असा मामला गंभीर झाला की तो हास्यास्पदही होतो; हे कसे?

# कलकत्ता मेल

सौ. तारा पंडित

## दुष्काळ तिथे, प्रतिक्रिया इथे

ऑफिसचं कॅन्टीन. चारपाच मित्र टेबलाशी बसलेले. गप्पा सुरू आहेत. प्रत्येकाच्या समोर मातीच्या 'भांड'-मध्ये पंधरा पैसेवालं चहा नामक पेय. ह्याच चहाचे घुटके घेत अनेक वेळा त्यांच्यात चर्चा चालते; राजकारणापासून कुचाळक्यापर्यंत सर्व विषय हाताळले जातात. वरचेवर भेटणारे हे मित्र अगदीच रद्दी नाहीत. विचार करणारे आहेत. कोणी कवी आहे, कोणी गायक आहे. कोणी चित्रकार तर कोणी लेखक. ह्यांच्यापैकी एक महाराष्ट्रीयन व इतर सारे बंगाली आहेत.

त्यादिवशी अशाच त्यांच्या गप्पा चालल्या होत्या. पण मराठी माणूस जरा गप्प होता. अंतर्मुख होऊन विचार करीत होता. कुणीतरी छेडलं–'अरे, तू चूप का? कसला विचार करतो आहेस?'

अन् त्याला वाचा फुटली. म्हणाला–'मित्रांनो, मी महाराष्ट्रीय माणूस. महाराष्ट्र मला केव्हाही आपला वाटणारच. अलीकडे तिकडची वर्तमानपत्रं, साप्ताहिकं, मासिकं सार्‍यामधून मला तेथील दुष्काळाचं भीषण चित्र दिसतं नि मी उदास होतो. आंघोळ करताना वाटतं आपले बांधव पाण्याच्या थेंबासाठी वणवण भटकताहेत, आपल्याला दोन बादल्या पाणी अंगावर ओतण्याचा अधिकार नाही. जेवताना पानातली पोळी महाराष्ट्राच्या नकाशासारखी दिसते. वाटतं–तिथं कित्येक बालकं उपाशी असतील, कितीतरी जीव दोन घास मिळावेत म्हणून खडी फोडत असतील, आपण पोटभर जेवतो हे बरं आहे का?...'

ह्या भाषणाला एकाने ब्रेक लावला–'मग काय दोन बादल्या पाणी अन् ताटभर भात तिथे पाठवायचा विचार आहे का तुझा, स्वप्नाळू मित्रा?'

'तसं तर शक्य नाही. पण मे महिन्यात सुटी काढून दुष्काळी कामं करायला जायचा विचार आहे.'

'अरे, पण तू तिथे जाऊन काय करणार? त्यांच्या अर्धपोटी जेवणात तू वाटेकरी होणार आहेस?'–आणखी एकाने पृच्छा केली.

हा म्हणाला–'तसं नाही. तिथे पुष्कळ लोक दुष्काळग्रस्तांना मदत म्हणून काम करणार आहेत. मीही करीन.'

'हे बघ, तू इथेच राहा. तुला जाण्याची गरज नाही. तुझ्या एकट्याच्या कामाने दुष्काळ संपणारा नाही. उगाच विचार करू नकोस.'

'पण तिकडे ते लोक भुकेने मरतील अन् मी–'

'मरू दे त्यांना. त्यांचं नशीब.'

'नशीब?'–मराठी माणूस थक्क झाला.

दुसरा पक्का कम्युनिस्ट विचारसरणीचा एकजण म्हणाला–'अरे, पण तुला वाटतं का तिथे अन्नधान्य नाही म्हणून? धान्याची कोठारं भरली आहेत. ही सारी उपाशी माणसं स्वयंस्फूर्तीने त्यावर हल्ला करतील अन् आपली भाकरी आपणच मिळवतील. तू मात्र इथे बसून चिंता करतो आहेस व्यर्थ. ते शाहणे असतील तर त्यांनी तसंच करावं.'

मराठी माणसाला आणखी आश्चर्य वाटलं.

यावर ताण केली इतका वेळ चूप बसलेल्या मित्राने, म्हणाला–'अरे सामान्य माणसांच्या भावना समान असतात. सामान्यांची उपासमार होऊ लागली म्हणजे तुझ्यामाझ्यासारखे धावून जातात–घासातला घास त्यांना देतात अन् ही गंमत हसत हसत ते लोक बघतात जे स्वत:ला कसलीही झळ लागू देत नाहीत. जोवर परस्पर काम भागतंय् तोवर ते मलबार हिलवरून खाली उतरणार नाहीत. उलट खुनशीपणाने हसतील नि अगदीच नाइलाज होईल तेव्हा जड पावलं टाकीत हळूहळू खाली येतील आणि तुम्ही हरल्यानंतर त्यांची मदत सुरू होईल, आणि सारं श्रेय देखील तेच घेतील, मला वाटतं आपण असा हा मदतीचा हात पुढे करतो हीच आपली चूक आहे. ह्यामुळे आलिशान जीवन जगणारांची आणखीच पोळी पिकते. यावेळी मला वाटतं त्यांना अद्दल घडविल्यासाठी तरी सामान्यांनी मुळीच दुष्काळग्रस्तांना मदत करू नये. त्यांचा आक्रोश वरपर्यंत ऐकू जातो का व त्या आक्रोशाने शून्य हृदयांना पाझर फुटतो का तेच एकदा पाहिलं पाहिजे."

सर्वजण थक्क झाले. मराठी माणूस तर गोठूनच गेला. हे सारे आश्चर्यांचे धक्के खाऊन तो घरी परतला. रात्रभर त्याला झोप आली नाही. विचाराने त्याचं डोकं सुन्न झालं. ☐

## शब्द आणि अर्थ

काही चार महाराष्ट्रीय मंडळींनी मिळून आपल्या बंगाली मित्राचा काही विशिष्ट यशाबद्दल गौरव करायचा असं ठरवलं. सर्वजण जमले. एका गृहस्थांनी छोटंसं भाषण केलं. 'आज आपल्या मित्राच्या सत्कार समारंभासाठी आपण जमलो आहोत. हा प्रसंग साजरा करताना आम्हाला विशेष आनंद होत आहे...'

पण बंगाली बाबूचा चेहरा मात्र पडलेला. मग ते म्हणाले–'आपण माझा इतक्या लवकर सत्कार कराल असं वाटलं नव्हतं. मला आणखी काही दिवस जगण्याची इच्छा आहे. कारण सत्कार समारंभ हा शेवटी–अंत्ययात्रेच्या वेळीच करायचा असतो.

तेव्हापासून 'सत्कार' या शब्दाचा वापर आम्ही सांभाळूनच करीत असतो. ☐

एक महाराष्ट्रीय नव्याने इथे आले. घरात सामान लावीत होते. नोकर बंगाली होता. लाकडी खोके वर माळ्यावर टाकावे ह्या विचाराने ते स्टूलावर चढले. नोकराला म्हणाले–' उधरका खोका ले आव तो. ' नोकर गेला नि बाहेर खेळत असलेल्या एका मुलाला त्याने पकडून आणले. साहेब म्हणाले– हे काय ? खोका कुठे आहे ?'

' हा काय तर खोका '

' अरे, लाकडाचा खोका आण म्हटलं मी तुला. ह्या मुलाला कशाला आणलंस ?'

' फिर ऐसा क्यो नही कहते की लकडीका बक्सा लाव. आपने खोका कहा तो हम खोका ले आये. '

तेव्हा त्या गृहस्थांना कळलं की खोका म्हणजे मुलगा, खोका नव्हे ! ¤

दादा आणि दादू ह्यां दोन शब्दात फार फरक आहे. अ-बंगाली माणसाला सगळे बंगाली शब्द एकदमच माहीत होत नसतात. हळूहळू तो शिकत असतो. एका गृहस्थांना दादा आणि दादू मधील फरक माहीत नव्हता. त्यांना वाटलं : दादा 'लाच लाडानं, आपले-पणानं ' दादू ' म्हणत असावेत.

झालं काय की एकदा सदर गृहस्थ ट्राममध्ये चढले, एका सीटवर एक म्हातारा माणूस एकटाच बसला होता. त्यांच्याशेजारी आपण बसू शकतो असं पाहून हे गृहस्थ त्याला मुद्दाम बंगालीत म्हणाले–' जरासे सरकून बसा बरं दादू' तो म्हातारा सरकला खरा पण त्याच्या कपाळावर आठ्या उमटल्या. आपलं काय चुकलं हे ह्या अ-बंगाली माणसाला कळेचना. तो बसल्यानंतर म्हातारा म्हणाला–' तुमच्या मुलाने मला दादू म्हणणं ठीक आहे. पण तुम्ही मला दादू म्हणावं इतका काही म्हातारा झालो नाही मी. '

' म्हणजे ?'

मग म्हातारबुवांनी खुलासा केला–

' दादा म्हणजे वडील बंधू आणि दादू म्हणजे आजोबा. '


• • •


# आणि ड्रॅगन जागा झाला

लेखक : अरुण साधू

किंमत . चवदा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे



---

पितामह भीष्मांनी शरपंजरी पडल्या पडल्या शांतीपर्वात युधिष्ठिराला राजधर्माचा नी धर्मनीतीचा उपदेश केला होता. तो काळच असा होता की वृद्ध तरुणांना मार्गदर्शन करीत. पण आता काळ बदलला आहे. वृद्धांना म्हातारचळ लागला असून तरुणांनीच त्यांना उपदेश करावयाची घटिका समीप आली आहे.

अनिल बर्वे

---



माझ्या मरणोन्मुख मित्रा,

दिवस सरत्या अंधारात—आभाळ भरून आलं असताना, मुद्दाम तुला भेटायला आलो आहे. गुदमरलेलं मन मोकळं करायला. तुला किती दिवस मी या दादरच्या रेल्वेपुलावर पाहतो आहे. 'भजन करावो रामाचेऽऽरामाचे, सार्थक होईल जन्माचेऽऽजन्माचे' हा अभंग तू खपाटीला गेलेल्या पोटावर हात मारून केविलवाणेपणे म्हणत आला आहेस. तुला पाहून पुढे जाता जाता मी गुणगुणत होतो 'दूरदेशी राहिलेले दोन त्याचे झोपडे—बापुडा अन् आज येथे पायवाटेला पडे! तरी पण या संपत्तीने ओथांडणाऱ्या नगरीत तुझं खपाटीला गेलेलं पोट मला कधी भरलेलं दिसलं नाही आणि आज तू मरणोन्मुख होऊन पडला आहेस—

कुणा तज्ज्ञ डॉक्टरने तुला पाहिले, तर तो म्हणेल 'तू केवळ एक रात्रीचा सोबती आहेस पण मला माहितीय की माणसाचा जीव मोठा चवट असतो, तो जाता जात नाही. मी छातीठोकपणे सांगतो की, 'तू अजून दहा-बारा रात्री निश्चित जगशील.'

मला माहितीय, तू अगदी गलीतगात्र झाला आहेस. तुझी इंद्रीये शिणली आहेत. जीवनज्योत मालवत आहे. भुकेने तुझी बुबूळं थीजली आहेत. दृष्टी अंधुक झाली आहे. श्रवणेंद्रिये निकामी होत चालली आहेत आणि तुझे ओठच केवळ थरथरत आहेत. काय ओरडायचय तुला?

भूकऽऽ भूकऽऽ हेच ना? मग मुळीच ओरडू नकोस. या देशातील माणसे हेच ओरडत आहेत. पण त्याचं ओरडणं कधी कुणाच्या कानी पडत नाही. तू देखील उगीच ओरडून जिवाला शिणवू नकोस. असाच निपचित पडून रहा. मृत्यूनंतर आम्ही सर्व तुला फुले वाहू!

मी जवळ येताच तू असा शोकाकुल का झाला आहेस? भयभीत का झाला आहेस? हत् वेडया! अरे, मी काही पोलीस नाही तुला फूटपाथवरून हाकलायला. मुंबईचा हा टीचभर फूटपाथ एवढंच तुझं छोटसं स्वप्न? ना मग घाबरतोस कशाला? हा सारा देशच तुझा आहे? मी पांढरपेशा म्हणून बावरलास? खरं रे खरं. आजपर्यंत आम्ही पांढरपेशे तुझ्याजवळ कधी आलोच नाही. पण लक्षात ठेव आता मात्र आम्ही तुझ्या जवळ येणार. आम्हाला यायलाच पाहिजे. जर आलो नाही तर आज तुझी जी गत झाली आहे तीच उद्या आमची होणार आहे.

माझ्या मरणोन्मुखमित्रा,

तुला पतंजलीची योगसूत्रे माहीत आहेत का? नाहीत? नसू देत. तू आता एक दीर्घ श्वास! घे आणि इंद्रियावर विजय मिळव. ज्याने इंद्रियावर विजय मिळवला त्या महावीराच्या देशाचा वारसदार आहेस तू. इंद्रियांवर विजय मिळविणे तुला सहजशक्य आहे. दीर्घ श्वास घेतलास? शाबास! आता तू कानात प्राण ओतून माझं बोलणं ऐक—

माझ्या मरणोन्मुख मित्रा,

आजपर्यंत तू याचना करीत आला आहेस. आज मी तुझ्यापाशी याचना करतो आहे. मी जे काय बोलतो ते तू ऐकून घेण्याची. माझ्या मित्रा तुझीमाझी ही जरी पहिलीच भेट असली तरी आपली ओळख मात्र फार दाट आहे. तुला या आधी मी अनेकदा पाहिलं आहे, रेल्वेस्टेशनांवर–पवित्र तिर्थक्षेत्रावर–खेड्यापाड्यातून–झोपडपट्टातून–जिथं जिथं मी गेलो आहे तिथं तिथ तू मला दिसला आहेस. तू तर या देशाचा तीन चतुर्थांशाहून अधिक मोठा भाग आहेस. मग मी तुला कसा ओळखत नसेन बरे?

हे खरे की, आजपर्यंत जाणून बुजून मी तुला ओळख देत नव्हतो. कारण माझ्या पांढऱ्या कॉलरला ते मानवत नव्हते. तीन-चार आकडी पगार मला मिळत होता. विद्येचा अहंकार माझ्या जवळ होता. पण आज मीच जेव्हा बेकारीच्या, उपासमारीच्या, भडकत्या, महागाईच्या असहाय्य जीवन कलहाच्या आणि अशाश्वत जीवनाच्या वणव्यात होरपळून निघतो आहे, तेव्हा ठीगळ लावून लावून टीकवलेली ही पांढरी कॉलरच माझा गळफास होऊ बघते आहे. मला कोणाचा तरी आधार पाहिजे. हे जाडेजुडे ग्रंथ उंच हवेल्या नी घरघरणारे कारखाने मला आधार देऊ शकणार नाहीत. माझा–आमचा सर्वांचाच आधार आता तूच आहेस. तू या देशाचा जनता जनार्दन आहेस!

माझ्या मरणोन्मुख मित्रा,

मी काही कुणा विद्यापीठातला वाचाळ वाचस्पती नाही, म्हणूनच शब्दांच्या जंजाळात मी तुला अडकवणार नाही. भोवतालच्या परिस्थितीने संतापलेला आणि गोंधळलेला मी एक पांढरपेशा तरुण आहे. मला स्वतःची कैफीयत ऐकवायची आहे. पण आपले थोर साहित्यिक 'वयात आलेली नाटकं' लिहिताहेत. विद्वजड विचारवंत सौंदर्य नी साहित्याची समीक्षा करताहेत. बुद्धियोगी नव्या युगाचा घोशा लावताहेत. पुढारी मंडळी निवडणुकात गुंतली आहेत. नेते पत्रके काढताहेत. आईबाप संसाराच्या गाड्याला जुंपलेले आहेत. नि राज्यकर्ते एका हातात संपत्ती नी दुसऱ्या हातात सत्ता घेऊन माझ्या छाताडावर उभे आहेत. कोणाला ऐकवणार मी माझी कैफीयत? माझ्या मरणोन्मुख मित्रा–आता तूच ऐक. माझ्या विचारातच सुसूत्रता नाही, मग बोलण्यात कुठून येणार? तरी पण ऐक आणि अर्थ लावून घे. कारण मी जे बोलणार आहे ते आंतरिक वेदनांनी आणि गळ्याशपथ सांगतो, अगदी प्रामाणिकपणे बोलणार आहे.

माझ्या मरणोन्मुख मित्रा,

मृत्यूनंतर जर तुला स्वर्ग लाभला आणि स्वर्गात जर ईश्वर असला तर त्या जन्मदात्या ईश्वराला माझी प्रार्थना सांग–

"हे प्रभो, मला मुक्ती नको–मोक्ष नको जन्ममृत्यूच्या चौऱ्यांशी लक्ष योनींच्या फेऱ्यातून जायला मी तयार

आहे. पण प्रभो इतकी तळमळून तुझ्या चरणी विनंती करतो की या भारत वर्षात पुन्हा म्हणून मला माणसाच्या जन्माला घालू नकोस.

हे प्रभो, मला वन्यपशु केलेस तरी चालेल. इथले सरकार कायद्याने माझे संरक्षण करील. मला सर्पाच्या जातीत घातलेस तरी चालेल, दर नागपंचमीला मला दूध-लाह्या मिळतील. मला किडयामुंग्यांच्या जन्माला घातलेस तरी चालेल, धर्मभीरू मारवाडी जैन, मला साखर घालतील. मला गाईगुराच्या जन्माला घातलेस तरी चालेल, माझी हत्या होऊ नये म्हणून येथले 'संस्कृतीरक्षक राष्ट्रवादी' आंदोलने करतील. मला कबुतराच्या जन्माला घातलेस तरी चालेल, शांतता परिषदातून मला उडवण्यात येईल. जैन मंदिरासमोर दाणे टिपायला मिळतील.

हे प्रभो, मला वनस्पतीच्या जन्माला टाकलेस तरी चालेल. केवडयाची पात झालो तर तरुणी मला केसात माळतील. वटवृक्षाची साल झालो तर सुवासिनी माझ्याभोवती फेरा घालतील.

प्रभो, या देशाला राष्ट्रीय पक्षी आहे. राष्ट्रीय प्राणी आहे राष्ट्रीय ध्वज आहे. त्या सर्वांना इथं स्थान आहे. फक्त माणसालाच नाही. म्हणून हे प्रभो तुझ्या चरणी विनंती अर्ज करतो की, मला या देशात पुन्हा म्हणून माणसाच्या जन्माला घालू नकोस. इथं उपेक्षा-अवहेलना- लाथा आणि गोळया याशिवाय माझ्या वाटयाला काही येणार नाही.

माझ्या मरणोन्मुख मित्रा,

जीवनदात्या प्रभोला एवढी माझी विनंती. ऐकवल्यावर तू तडक चित्रगुप्ताच्या पापपुण्य कचेरीत जा. त्याला मग तू ब्राह्मण व इतर स्पृश्यजातींच्या पापपुण्याचा अकाउंट विचार. माझ्या मरणोन्मुख मित्रा. इथल्या दलित समाजाच्या कमरेला आम्ही केरसुण्या बांधल्या—रस्ते विटाळू नयेत म्हणून. इथल्या दलितांच्या गळयात आम्ही मडकी बांधली त्यांनी भुईवर थुंकू नये म्हणून. त्यांच्या सावलीलाही आम्ही पाप समजलो. युगानयुगे त्यांना पाणवठयापासून दूर ठेवले. वस्तीबाहेर हाकलले. अजूनही आम्ही त्यांना म्हारडेमांगडे म्हणून हिणावतो. अजूनही एकाही गावचा पाणवठा दलितांना आम्ही खुला केलेला नाही. स्पृश्यबाईवर मुसलमान गुंडाने बलात्कार केला तर कत्तलची रात्र घडवून निष्पाप बायाबापडयांना-पोराबाळांनाही मुसलमान असण्याच्या पापाबद्दल आम्ही ठार करतो. पण स्पृश्यांनी दलीत समाजातल्या बायांना नागव्या करून धींड काढल्यावरही आम्ही झापड मिटून बसतो. आम्ही दलितांवर होत असलेल्या अन्यायाची आकडेवारी सादर करून, भारत सरकारच्या पेरुमल कमिटीने आमच्या सुधारणावादाचे धिंडवडे काढल्यावरही निर्लज्जपणे आम्ही— 'जातीय दंगली लांडेच कसे घडवतात' याच्यावर पुस्तिका काढतो. अन् अजूनही आम्ही तितकेच हिडीस-क्रूर आणि विकृत आहोत, जेवढे पूर्वी होतो.

प्रवेश फी नाही : **युनिक पॉप्युलॅरिटी स्पर्धा** : बक्षीस मिळवा

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

पहिले बक्षीस : एक वेस्पा स्कूटर किंवा ऑलविन रेफ्रिजरेटर. दुसरे बक्षीस : एक टेपरेकॉर्डर किंवा ॲटोमॅटिक कॅमेरा किंवा रेडिओग्रॅम. तिसरे बक्षीस : (१००) जपानप्रमाणे तयार केलेले ३ बँडचे टोयो ट्रॅन्झिस्टर्स किंमत २७५/- चौथे बक्षीस : (१०) जपानप्रमाणे तयार केलेले ३ बँडचे टोयो ज्यूनिअर ट्रॅन्झिस्टर्स किंमत २५०/-

Entrance Fee : NO ENTRY FEE, This is only a Populariry contest
LAST Closing Date : 18-5-73, RESULT Date : 20-5-73.

Specimen for help total 94
Using Figures 16 to 31

| | | | |
|---|---|---|---|
| 20 | 23 | 26 | 25 |
| 27 | 24 | 21 | 22 |
| 29 | 30 | 19 | 16 |
| 18 | 17 | 28 | 31 |

स्पर्धेकरिता नियम : (१) साध्या कागदाचा वापर करा. (२) दुरुस्त केलेल्या, खाडाखोड केलेल्या प्रवेशप्रत्रिका स्वीकारल्या जाणार नाहीत. (३) प्रमोटर्संचा निर्णय अंतिम आणि कायद्याने बंधनकारक राहील. ही या स्पर्धेची महत्त्वाची अट आहे. (४) बिनचूकता अधिकृत सीलबंद उत्तराशी ताडून पाहून ठरवली जाईल. कोणतीही बक्षिसे रोख पैशात दिली जाणार नाहीत. (५) पहिले बक्षीस (एकच) : अधिकृत उत्तराशी तंतोतंत जुळणाऱ्या प्रवेशपत्रिकेला दिले जाईल. (६) दुसरे बक्षीस (पाच) : आडव्या वरच्या तीन रांगांशी तंतोतंत जुळणाऱ्या प्रवेशपत्रिकांना मिळेल. (७) तिसरे बक्षीस (शंभर) : अशा प्रवेशपत्रिकांना मिळेल की ज्यांची कोणतीही रांग किंवा कोणतीही संख्या कुठेही अधिकृत उत्तराशी जुळेल. (८) चौथे बक्षीस अशा दहा जणांना दिले जाईल की ज्यांची प्रवेशपत्रिका प्रमोटर्संना समाधानकारक वाटेल. (९) बक्षीसपात्र ठरणारांना त्यांनी मिळवलेल्या बक्षिसाबाबत पोस्टेज, पॅकिंग आणि लायसेन्स फी द्यावी लागेल. (१०) तिसरे आणि चौथे बक्षीस मिळवणारांना वरखर्चाशिवाय ट्रॅन्झिस्टरची निम्मी किंमत द्यावी लागेल आणि ते आमच्या नियमाप्रमाणे आणि अटींप्रमाणे बांधील राहतील. (११) निकाल जाहीर केल्यानंतर लवकरच विजेत्याला लायसेन्स फी वगैरे भरण्यासाठी पत्र पाठविण्यात येईल. (१२) उत्तरासाठी ४५ पैशांचे तिकीट पाठवा. (१३) एक कुटुंब फ़क्त एकच प्रवेशपत्रिका पाठवू शकते. (१४) तुमचा पत्ता हिंदीत किंवा इंग्रजीत लिहा. (१५) हे कात्रण किंवा नियमावली तुमच्या मार्गदर्शनासाठी किंवा संदर्भासाठी पुढे उपयोगी पडावी म्हणून ठेवा.

DIRECTOR, CONTEST DEPARTMENT

**JAPAN AGENCIES ( MWP–98 )**

**P. O. BOX NO. 1194, DELHI-6**

कारण अजूनही आमच्यातला कोणी आचार्य वर्णाश्रम व्यवस्थेचा पुरस्कार करितो आणि त्याची आम्हाला शरम वाटत नाही.

माझ्या मरणोन्मुख मित्रा,

आम्ही दलितांना लाथा हाणल्या हा आमचा उद्दामपणा झाला आणि त्यांनी त्या सहन केल्या हा त्यांचा नामर्दपणा झाला. स्वतःच्या नामर्दपणाचे फळ ते भोगत आहेत – आणि त्यांनी ते भोगलेच पाहिजे. माझे तर असे स्पष्ट मत आहे की, जोपर्यंत दलितांच्यातला पुरुषार्थ जागा होत नाही आणि जोपर्यंत ते स्पृश्यांची गचांडी धरत नाहीत तोपर्यंत स्पृश्यांनी त्यांना अशाच लाथा हाणाव्यात. कारण जोपर्यंत जुलमाने डोळ्यांत अंगार फुलायच्या ऐवजी केवळ आसवेच येतात. तोपर्यंत माणूस स्वतंत्र होऊ शकत नाही. ते असो.

–तर माझ्या मरणोन्मुख मित्रा. दलितांना पायदळी तुडविण्याचा हा जो पाजीपणा आमच्या बापजाद्यांनी केला त्याचं प्रायश्चित्त मी घेतल्याशिवाय त्यांना स्वर्गप्राप्ती होणार नाही. तेव्हा चित्रगुप्ताला तू विनंती कर – को केवळ ब्राह्मण जातीचीच नव्हे तर साऱ्या स्पृश्यसमाजाची पापे अनिल बर्वे नामक तरुण स्वतःच्या माथी स्वीकारायला तयार आहे. ही पापे मी स्वीकारल्यावर इथल्या दलितांनी मला पंढरीच्या विठोबाच्या गाभाऱ्यापासून गावाबाहेरच्या म्हारवाड्यापर्यंत फरफटत नेले आणि आसूडाने फोडून रक्ता-वर ठोकले तरी चालेल—

"कारण ही जमीन एकदा रक्ताने न्हाऊ दे. त्याशिवाय या भूमीतली पापे धुतली जाणार नाहीत. तिर्थक्षेत्राचं तेज पुन्हा विलसणार नाही."

माझ्या मरणोन्मुख मित्रा,

चित्रगुप्ताकडला अकाउंट क्लीअर झाल्यानंतर तू बेधडक कैलासपती तीन डोळ्यांच्या शंकराकडे जा आणि त्याची गचांडी धरून त्याला विचार– "हे लफंग्या, तुझ्या सृजनशीलतेवर विश्वास ठेवून आमच्या येथल्या साध्वी पतिव्रतांनीही तुझ्या लिंगाची पूजा केली. असे असता या भूमीत केवळ निवडूंगाचे फाटे आणि बाभळीचे काटेच का फुटावेत? तेव्हा शंभो शंकरा इथल्या भूमीला तू त्वरीत सुजलाम सुफलाम कर नसता आम्हा मर्त्यमानवांना तुझ्या कैलास पर्वतावर प्रातर्विधी उरकावा लागेल." एवढे कडाडून झाल्यावर त्या शिवशंकराला तू विचार "हे भल्या ईश्वरा तू मूळचा द्राविडी रुद्र. आक्रमक जेत्या आर्यांनी तुला शिव बनवून जरासा मानसन्मान देताच – सत्ताधाऱ्यांना विकल्या जाणाऱ्या भारतातल्या भाडोत्री विद्वानांप्रमाणे तू असा बदललास कसासाठी? असे वागून तू स्वतःच्या नावलौकीकाला काळीमा फासू नकोस." शंकराला एवढा हितोपदेश केल्यावर–

माझ्या मरणोन्मुख मित्रा,

तू शेषशायी पडलेल्या तंदूलतनु भगवान विष्णूकडे धाव घे. त्या भगवान

विष्णूच्या बेंबीतून कमळ उगवलेले असून त्या कमळात सृष्टीकर्ता ब्रह्मदेव बसला आहे. मग तू खिशातला रामपुरी काढून विष्णूच्या बेंबीपासून कमळदेठ तोडून ब्रह्माला अलग कर. ब्रह्मासारखा सृष्टीकरता जोपर्यंत विष्णूसारख्या बदमाश धनाढ्याच्या आंकीत आहे तोपर्यंत पृथ्वीतलावरील अनाचार संपुष्टात यायचा नाही. तेव्हा ते एक सत्कर्म केल्यावर तू शेषशायी विष्णूस गालीप्रदान सुरू कर. त्याला म्हणावं — "काय रे बेटया विष्ण्या, ब्राह्मणच तेवढे तुझ्या लक्ष्मीपासून पैदा करून इतरांना तू काय रखेल्यापासून पैदा केलेस काय? तसे जर नव्हे तर भागवत पुराणात 'मी केवळ ब्राह्मणांचेच रक्षण करितो' असे तू काय म्हणून म्हंटलेस?. आणि लेका पृथ्वीवरील मानव अन्नावाचून टाचा घाशीत असता तू हिऱ्यामाणक्यांनी सजून बसणे तुझ्या देवपणाला शोभते काय?"

माझ्या मरणोन्मुख मित्रा,

अशारीतीने विष्णूला भोसडल्यावर तू त्याचे सूदर्शन चक्र हिसकावून घे नी पंढरीच्या विठोबावर चालून जा. त्याला विचार.

"हे मतीमंद मठ्ठ विठ्या, तुझा बाप सानेगुरुजी अस्पृश्यांना दरवाजे खुले व्हावेत म्हणून आमरण उपोषणाला बसेतोवर तू या बडव्यांची दादागिरी का चालून दिलीस? विठ्या तू साक्षात परमेश्वर 'कर कटेवरी घेऊनी युगे अठ्ठावीसी विटेवरी' या इथे समक्ष उभा असताना मुंबईच्या गणंग मंत्रिमंडळाला नाडकर्णी कमिशन कशासाठी नेमावे लागले. अठ्ठावीस युगे रखुमाईच्या गळयात गळा घालून बसणे तुझ्या देवपणीच्या इभ्रतीला शोभते काय? का तू सुद्धा असंगाशी संग होऊन आमच्या पुढाऱ्यांप्रमाणेच बेशरम नी निर्लज्ज झाला आहेस?" अशारीतीने विठोबाला झाडल्यावर ते सुदर्शन त्याच्या टाळक्यावर आपट आणि तू पुन्हा स्वर्गलोकी गमन कर.

माझ्या मरणोन्मुख मित्रा,

स्वर्गलोकी गेल्यावर तू तेथल्या पुण्यात्म्यांना विचार—'हे पुण्यात्म्यांनो ईश्वराने सृष्टी घडवली ती देखील मोठ्या कारस्थानीपणाने. स्वतःचेच रूप असलेल्या मर्त्यमानवांवर सदासर्व काल निरकुंश सत्ता गाजवण्यासाठी ईश्वराने देवयोनीपासून मानवयोनीची फारकत करून—स्वतःच्या तेजापासून मानवजातीस वंचीत करून सदाचे गुलाम केले. एखाद्या कंजूष व्यापाऱ्याप्रमाणे सोने, रूपे, चांदी, तांबे, लोह आदी सारे धन पृथ्वीच्या पोटात गाडून ठेवून मनुष्यजातीला त्याने कफल्लक केले. मानवाने वारसा हक्काने स्वतःच्या सत्तेत वाटा मागावयास येऊ नये म्हणून त्याला गुरुत्वाकर्षणाच्या भिंतीआड कैद केले. तेव्हा हे पुण्यात्म्यांनो ईश्वराचा हा जुलमी बाणि एकतंत्री कारभार संपुष्टात आणण्यासाठी देवयानी आणि मानवयोनी यातील फारकत नष्ट करणे जरूर आहे.

हे पुण्यात्म्यांनो, सध्याचे युग हे समतावादाचे आणि वंशद्वेषविरोधी आहे तेव्हा तुम्ही देवयोनी आणि मानवयोनीतील फरक नष्ट करण्याचा उपाय सूचवा. महाभारत काळात कुणा तपस्वी दुर्वासाने ईश्वराचा अहंकार धुळीस मिळवून देवयोनी आणि मानवयोनीचा मिलाफ घडवून आणला होता. ते गुपीत कोणते ते सांगा. म्हणजे ज्याप्रमाणे म्हैसूर सरकारने आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध आमीषे दाखवली आहेत त्याप्रमाणे आंतरयोनीत विवाहांना प्रोत्साहांना देण्यासाठी ईश्वराला लालूच दाखवून या सृष्टीत समता आणता येईल. जरा ईश्वर साऱ्या विश्वाचा सत्ताधारी असला तरी षड्रीपूंच्या घाग्यात तोही जखडला आहे. अप्सरांच्या आणि अमृतकुंभाच्या लालचीला बळी पडून तो समतावादास तयार होईल. या उप्पर ईश्वराने स्वतःचा वांशिक अहंकार सोडला नाही तर, तू दैत्यांसहीत सर्व कनिष्ठ देवतांची म्हणजे भैरोबा, म्हाळकायी आदी गावदेवतांच्या संघटना उभारून वंशश्रेष्ठवादी उच्चभ्रू देवांविरुद्ध बंड उभार. ज्याप्रमाणे मूळावर घाव घातला की फांद्या आपोआप खाली येतात, त्याप्रमाणे स्वर्गात समता स्थापन झाल्यावर भूतलावरही आपोआप समता निर्माण होईल. ते असो.

माझ्या मरणोन्मुख मित्रा,

दरम्यान तुझ्या आवाहनास पुण्यात्म्यांनी योग्यप्रतिसाद देऊन देवयोनी नी मानवयोनीत समानता निर्माण करण्याचा तपस्वी दुर्वासाचा फार्म्यूला तुला दिलाच तर तो विनाविलंब भूतलावरील माझ्या पत्त्यावर रजिस्टर ए. डी. ने पाठव आणि महत्त्वाचे म्हणजे—

अत्यंतक्षोभाने मी हे जे काही तुझ्यापाशी बोललो आहे ते तू गुप्त ठेव. कारण, सदाशिव पेठेत राहून लकडीपूल न ओलांडता साऱ्या भारतवर्षाच्या संस्कृतीची धुरा वाहणाऱ्या पेशवाई संस्कृती रक्षकांच्या कानावर माझे हे बोल पडले तर ते एकच आकांड-तांडव करतील. माझ्या घरावर निषेध मोर्चे आणतील माझे हात कलम करण्याच्या घोषणा करतील आणि 'पाच टक्के' जनतेच्या भावनांना दुखावण्याबद्दल हे सरकार माझेवर खटला भरते होईल आणि सारा दलीतसमाज त्यावेळी माझ्या संरक्षणासाठी धावत न येता, सरकारने फेकलेल्या भिकेच्या तुकड्यावर तुटून पडला असेल नी दलीतनेते जिल्हा परीषदापासून पार्लमेंटापर्यंत कुठे कशा जागा मिळवता येतील यातच तर्रऽऽ होऊन पडला असेल आणि मला एकटे पडावे लागेल. तेव्हा मी हे जे बोललो आहे ते तू तुझ्यापाशीच गुप्त ठेव.

माझ्या मरणोन्मुख मित्रा,

पितामह भिष्मांनी शरंजरी पडल्या पडल्या शांतीपर्वात युधिष्ठीराला राजधर्माचा धर्मनितीचा उपदेश केला होता. तो कालच असा होता की, वृद्ध तरुणांना मार्गदर्शन करीत. पण आता काळ बदलला आहे. वृद्धांना म्हातारचळ लागला असून तरुणांनीच त्यांना उपदेश

करावयाची घटीका समीप आली आहे. म्हणूनच माझ्या मित्रा, पितामहांच्या वयाचा तू अस्थिपंजरी पडला असून मी तुला प्राप्तपरिस्थितीविषयी काही परखड बोल यापुढे ऐकवणार आहे.

माझ्या मरणोन्मुख मित्रा,

आता मध्यरात्र झाली असून या नगरीतल्या उंची हॉटेलातून नर्तीकांच्या पदंन्यासात आणि मद्यासहीत शाही-खान्यात पुरता रंग भरला आहे. याच वेळी धारावीच्या आणि इतर झोपडयात माणसं दुःखाच्या ग्लानीला हातभट्टीचा कैफ चढवून निश्चेट पडली आहेत. आपल्या या थोर देशाची ही परंपरा आहे. तेव्हा तूही आता निश्चेट पडून राहा. मीही आता निघून जातो, कारण निशाचरासारखे रात्री हिंडून सत्यपरिस्थिती मी हुडकत असतो.

माझ्या मरणोन्मुख मित्रा,

प्रकाश ही या नगरीतील विकृती असून अंधार हीच प्रकृती आहे. तेव्हा अंधारात येथली वस्तुस्थिती जेवढी स्पष्ट दिसते तेवढी उजेडात नाही. तेव्हा परिस्थितीच्या अवलोकनासाठी या अपरात्री फिरून येऊन मी तुला रात्री पुन्हा भेटेन

माझ्या मित्रा जाता जाता मी तुला एक विधीलिखीत सांगून जातो ते सदैव स्मरणात ठेव. जोपर्यंत तुझी गात्रं न गात्रं या निभीड अंधकाराविरुद्ध पेटून उठणार नाहीत तोपर्यंत ही काळोखी रात्र सरणार नाही—तांबड फुटणार नही !

● ● ●


# पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

ब. मो. पुरंदरे
यांचा
नवा
कथा संग्रह

किमत : सात रुपये

राजहंस प्रकाशन



१९४२ च्या कांडातील

# चिमूरच्या स्मरणीय महिला

बाबूराव भटगरे

दि. १२-९-१९४२ बुलेटीनमध्ये नागपूरच्या डॉ. काशिकरांच्या पत्नीची रोमहर्षक व अभिमानास्पद अशी एक घटना आली आहे. शस्त्र-शक्तीने आत्मशक्तीपुढे हार खाल्ली.

ही घटना नजरेसमोर आली असता चिमूर–कांडात चिमूरच्या अशा काही धैर्यशाली स्मरणीय महिला सामोऱ्या झाल्या असतील काय असा एक प्रश्न उभा राहतो.

१५ ऑगस्ट १९४२ ला निघालेली भव्य मिरवणूक व तीत केल्या जाणाऱ्या गगनभेदी गर्जना चिमूर ठाण्याचा सब-इन्स्पेक्टर हरिराम शर्मा आपल्या उघड्या डोळ्यांनी बघत होता नि कानांनी ऐकत होता. त्याच्या राजीनाम्याची मागणी होत होती. हा सत्प्रवृत्तीचा माणूस स्वतःला संत तुकडोजींचा शिष्य म्हणवीत होता. रावणाकडील बिभीषण होता. स्वतः महाराजांच्या भेटीस गेला. चालू परिस्थितीतून काही मार्ग निघू शकेल काय, याचा अंदाज घ्यावा हा त्या मागचा उद्देश होता. त्याने राजीनामा देण्याचे कबूल केले. इतकेच नव्हे तर पोलीस-स्टेशनवर तिरंगा चढविण्यालासुद्धा संमती दिली. त्याने तेवढी वेळ निभावून नेली. त्यापुढे तो काही करू शकला नाही.

सर्कल इन्स्पेक्टर जरासंधाने १६ ऑगस्टला पुढाऱ्यांची धरपकड केली. त्यामुळे लोक अधिक प्रक्षुब्ध झाले. त्यांना सोडल्याने लोक आटोक्यात येतील हा सल्ला हरिरामने जरासंधाला दिला; परंतु तो त्याला पसंत पडला नाही. त्यात त्याचा स्वाभिमान दुखवला जात होता, प्रतिष्ठा कमी होत होती आणि ही एकच व्यक्ती चिमूरच्या नाशालाच नव्हे तर विनाशाला कारणीभूत ठरली. हरिरामने जरासंधाला समजाविण्याचा प्रयत्न केला. जमावासमोर न जाण्याचा सल्ला दिला पण व्यर्थ. त्याच्या डोक्यावर काठ्या पडल्या. पोलीस ठाण्याचा निकाल लागल्यावर सर्कल डाकबंगल्याकडे निघाला. नागोबाच्या देवळाजवळ त्याच्यावर दगडफेक सुरू झाली. जरासंधाने गोळीबाराचा हुकूम दिला. त्यात तीनचार माणसे जखमी झाली. तरी पण तो जमाव मोडून काढण्यास तो असमर्थ ठरला. हरिरामने फिरून त्याला चेतावणी दिली, ‘तुम्ही डाकबंगल्यावर गेल्यास लोक तुमच्यावर हल्ला करतील व कदाचित तुम्हालाही सोनवणी, डुंगाजीप्रमाणे आगीत टाकतील.’ हेही त्याला पटले नाही. तो वरोड्याच्या रस्त्याने निघाला. जमाव फिरून पोलिसांशी भिडला. फिरून गोळीबार झाला आणि गोळ्या संपल्या. ही गोष्ट जमावाच्या लक्षात आली. जमावाने हल्ला चढविला. हरिरामने आपल्या डोक्यावरील पोलीसटोपी हवेत उडवली व ‘महात्मा गांधी की जय’ अशी जोरात घोषणा करून तो जमावात येऊन मिसळला. (प्रधानप्रसादनेसुद्धा त्याचेच अनुकरण केले.) पण जमाव त्याच्यावर तुटून पडला. तेवढ्यात महादेव तेली बंडे हरिरामच्या डोक्यावर हात ठेवून म्हणाला, ‘अरे, त्याला मारता कशाला? तो तर आपल्यात मिसळला आहे. महात्मा गांधी की जय म्हणतो आहे’ महात्मा गांधींमुळे त्याला अभय मिळाले. त्यांना काँग्रेस कार्या-

ल्यात आणण्यात आले. तिथून हरिराम-शरण व त्याच्या पत्नीला गणपती साबरच्या घरी आश्रय देण्यात आला व दिलीपसिंहांच्या घरी प्रधानप्रसादला आश्रय मिळाला. परंतु 'चिमूरचा स्वातंत्र्यसंग्राम म्हणतो, 'तुकाराम चन्ने यांच्या हॉटेलात हरिराम शर्मा यांना संरक्षण देऊन ठेवण्यात आले होते. म्हणून पोलीसठाण्याची लंका होताच त्यांच्या धर्मपत्नीस त्यांच्याकडे सुरक्षित पोहचते करण्यात आले. उभयतांची भेट झाली आणि नंतर त्यांच्या इच्छे-प्रमाणे त्या उभयतांना दिलीपसिंह वैद्य यांच्याकडे सुखरूप पोहचवून देण्यात आले.' सदरहु माहिती ही लेखकाला मिळालेली ऐकीव माहिती असल्यामुळे विश्वसनीय नाही.

दि. १७ ला मिलिटरी येणार या संभाव्य संकटाचा सामना देण्याच्या तया-रीत चिमूरवासी लागले. पाहतापाहता सात-आठ हजाराचा जमाव बालाजी मंदिरासमोरील पटांगणात ग्रामीण हत्यारांसह उपस्थित झाला. होती ही परिस्थिती लक्षात घेणे जरूर आहे.

अखेर मिलिटरीची गाडी चिमूरला आली. गावात १४४ कलम लागू करण्यात आले. त्यांच्यासोबत चांद्याचे डेप्युटी कमिशनर सुब्रह्मणीयम होते. त्यांनी गावातील १०–१२ प्रमुख व्यक्तींना अटक करून नागोबाच्या देवळासमोरील मोटारींच्या घेऱ्यात, संगिनीच्या पहाऱ्यात तपासणी चालू केली. रात्र होऊ लागली. अशा परि-स्थितीत हरिरामशरणच्या पत्नीने जिल्हाध्यक्षांना प्रार्थना केली, 'फक्त १०–१५ लोकांना पकडल्यामुळेच हे कांड झाले आणि आतासुद्धा धरपकड चालूच ठेवाल तर काय परिणाम होईल हे सांगता येत नाही. सर्व लोक लढण्याच्या तयारीने लपून बसले आहेत. रात्रीच्या अंधारात ते सर्व धावून आले तर आमच्याबरोबर तुम्हालासुद्धा प्राण वाचवावा लागेल, तरी क्षमा करा.' डी. सी. लासुद्धा या संभाव्य धोक्याची शंका होतीच. त्याला राम-शरणच्या पत्नीची गोष्ट पटली आणि गाव न सोडण्याची ताकीद देऊन नेत्यांना सोडून दिले व स्वत: मिलिटरीसह परत गेला. या दूरदर्शी स्त्रीने चिमूरवरील संकट काही काळ दूर सारले यात शंका नाही.

१६ ऑगस्ट नागपंचमी गावात संचारबंदी करण्यात आली. ठिक-ठिकाणी पोलीसचौक्या बसविण्यात आल्या. सणानिमित्त दुकानात सामान घेण्याकरिता जाणाऱ्यावर नसती आपत्ती येत होती. अशीच आपत्ती राजुबाई भोपे या प्रतिष्ठित महिलेवर आली. जरासंधाने तिचा अपमान केला. ही गोष्ट राजुबाई विसरणे शक्य नव्हती.

दि. २० ला संपूर्ण चिमुरला लष्क-राने जर्जर केले. असा एकही अत्याचार शिल्लक राहिला नाही जो मिल्ट्रीने केला नाही "चिमूर आणि आष्टी येथील सरकारी पाशवी कृत्ये" या मथळ्या खाली दि. ६–९–४२ चे नं. १८ व दि. १४–९–४२ चे नं. २६ च्या बुलेटीन-मधून सविस्तर देण्यात आले आहे.

" पोलीस–अधिकाऱ्यांच्या अरेरावीने खवळून जाऊन काही लोकांनी तेथील पोलिसांना आणि अधिकाऱ्यांना मारून टाकले. या प्रकाराचा सूड म्हणून २००–३०० गोरे आणि हरिजन लष्कर त्या गावावर चालून गले. गावाचे विभाग पाडून प्रत्येक विभागावर ४०–५० च्या तुकडयांनी सशस्त्र धाड घालण्यात आली. या तुकडयांनी काय केले ? प्रत्येक घरात जाऊन पुरुषांना झोडपून काढले. जेवढे लुटणे शक्य होते तेवढे लुटले आणि स्त्रियावर बलात्कार केले. १०–१२ वर्षांच्या कोवळया मुलीपासून तो ६० वर्षांच्या म्हाताऱ्या बायापर्यंत सरास सर्वांवर निर्दयपणे अत्याचार करण्यात आले. त्यातून गर्भवती स्त्रियासुद्धा सुटल्या नाहीत. या अत्याचारात कित्येक स्त्रिया मरण पावल्या आहेत. एका घरंदाज लखपतीची १२ वर्षांची मुलगी बलात्काराला बळी पडून मेली. हे सर्व झाल्यावर सरकारी दंडाची रक्कम वसूल करण्यासाठी लाठी, गोळी, संगीन या सर्वांचा बेछुटपणे उपयोग करण्यात आला " अशाही परिस्थितीत काही महिला तथा पुरुषांनी काही स्त्रियांना घर संरक्षण दिले.

बाबुराव बेगडे यांची पत्नी शांताबाई, दादीबाई बेगडे, राजुबाई भोपे, भागेरथी राचलवार, गीतानाईक, रूक्मिणी नाईक, सुंदरा नेऊलकर वगैरे धैर्यवान स्त्रियांनी या परिस्थितीचा साहसपूर्वक प्रतिकार करण्याचा निर्धार केला. सुब्रह्मणीयम डी. सी. चांद्यावरून येत च सायंकाळी परत जात. त्यामुळे त्यांना या अत्याचाराची कल्पना नसे. शेवटी या महिलांनी गस्त घालणाऱ्या शिपायांच्या पहाऱ्यातून त्यांच्या संगिनींना व धमकावण्यांना न जुमानता न भिता डाकबंगल्यावर जाऊन डी. सी. ला सर्व प्रकार निवेदन केला; इतकेच नव्हे तर या कृत्यांचा जाब विचारला. तुमच्या घरी तुम्हाला आयाबहिणी नाहीत काय ? आपण गावाचा बंदोबस्त करण्यास आले वा धूम माजविण्यास, अत्याचार करण्यास आले ? आपल्या शिपायांनी कसकसे अत्याचार चालविले आहेत याची कल्पना आपल्यास आहे काय ? अशा रोख ठोक सवालाला डी. सी. ने उत्तर दिले तेही आपल्याच तोऱ्यात " तुमचे नवरे, भाऊ आणि मुलं यांनीच आपल्या वर्तनाने लष्कराला आमंत्रण दिले. त्याची फळं तुम्हाला भोगावी लागतील. " तरीपण या महिलांच्या म्हणण्याचा परिणाम झाला व डी. सी. ने मिल्ट्रीवर ताबडतोब बंधन घातले. 'दडपशाही पर्वास' फक्त दादीबाईचा उल्लेख मिळतो तर 'चिमूरचा स्वातंत्र्य संग्राम' यात दादीबाई बेगडे व राजुबाई भोपेचा उल्लेख मिळतो. तरीपण या प्रकरणात संबंधीत महिला खरोखरीच प्रशंसेला पात्र आहेत.

१६ आगस्ट १९४२. मिरवणूक बालाजी मंदिराजवळ एकत्र आली. सर्कलने एस. डी. ओ. डुंगाजी व नायब तहसिलदार सोनवणे यांना आणण्याकरिता पोलीस-लॉरी डाकबंगल्याकडे पाठविली. ती जमावाने अडविली. तिच्यावर हल्ला केला. तशातही

ड्रायव्हरने गाडी पळविली. त्याने दोघां-नाही परिस्थितीची जाणीव देऊन जीव वाचविण्यास निघून जाण्यास सांगितले.

याच वेळेला संत तुकडोजी महाराजांची मोटर देवळाजवळ येऊन पोहोचली. जमावाने त्यांना विनविले, " अशा परिस्थितीत आम्हाला सोडून जाऊ नका. आमचे नेते बंदिस्त झाले आहेत. नेतृत्व-हीन चिमूराचे काय होईल हे सांगता येत नाही.आम्हाला फक्त आपलाच तेवढा आधार आहे.' महाराजांनी आपल्या धीरगंभीर वाणीने सांत्वन केले, " घाबरावयाचे कारण नाही. मला जाणे जरूर आहे " शक्य तो शांतीने काम घ्या. " एवढे सांगून निघून गेले.

यापूर्वी १४ आगस्ट १९४२, शुक्रवार चिमूरचा बाजार. भजनापूर्वी महाराजांनी सांगितले, " भजनाचा अर्थ व्यवहारात आणल्याशिवाय त्याला काही महत्त्व नाही. श्रीकृष्णाने युद्धात सांगितलेल्या गीतेची पूजा फुलांनी होत नाही तर आपल्या कर्मकुसुमांनी त्याकरिता कर्तव्याच्या मैदानात शिरकमलांची माला चढवावी लागते. आपल्या सर्वांचा आज एकच धर्म आहे, आपण सर्वांनी एक होऊन देशाची काळजी केली पाहिजे. आज भारतात न कोणी हिंदू आले न कोणी मुसलमान. आज आपण सर्व गुलाम आहोत. मग गुलामाचा धर्म काय आहे? आमचे सर्व नेते जेलमध्ये बंद केले आहेत. तुम्ही सर्व नेते आहात त्याकरिता परिस्थितीचा विचारकरून संयमाने देशाची जिम्मेदारी सांभाळली पाहिजे. ' करा वा मरा ' हा ? महात्माजींचा संदेश नजरेसमोर ठेवून तुम्ही आपले भाग्य आपल्या हाताने घडविले पाहिजे. नेत्यांच्या संदेशाचे पालन करून देशाची इज्जत वाढविणे, भवितव्य उज्वल करणे हेच आज सर्वांचे कर्तव्य आहे. कोण काय करू शकतो इकडे भारतमातेचे डोळे लागले आहेत. "

'अब काहेको धूम मचाते हो, दुखवाकर भारत सारे। आते है नाथ हमारे।

पत्थर सारे बाँब बनेंगे,
भक्त बनेगी सेना।
झॉड-झडूले शस्त्र बनेंगे,
नाव लगेगी किनारे।

भजन ऐकून आबालवृद्धांना विरश्रीचे स्फुरण चढले ते रोमांचित झाले, प्रतिकारार्थ सज्ज झाले. महाराजांनी स्वातंत्र संजिवनीचा संचार केला नि ऐन वेळेवर चिमूरवासियांना भव्य धारेत सोडून गेले आणि......

ते चित्र–जीवन ही एक शक्ति आहे. ती राजनैतिक स्वरूप धारण करीत असते. गुरुतेगबहादुराच्या बलिदानाच्या पच्छात गुरुगोविंदसिंहाने (१७३२–६५) स्वातंत्र्य सग्रामाच्या आंदोलनास जंगी स्वरूप देण्याचा निश्चय केला त्या वेळेस त्यांचे शब्द आहेत. शब्दच नव्हे तर आव्हान होते.


चिडियोसे मै बाज लडाऊं।
तब नाम गोविंद पाउं॥

(जेव्हा मी चिमण्याकडून बाजपक्षाला मारीन तेव्हाच गोविंदसिंह नाव धारण करीन.) गुरु गोविंद निव्वळ शाब्दिक आव्हान देऊन थांबले नाहीत तर त्यांनी

शिखांत आत्मिक बल उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला. सर्वप्रथम त्यांनी तरवारीची पूजा केली आणि वीर रसप्रधान गीतांची रचना केली. चमकौ साहेबाच्या लढाईत जेव्हा शीख निरुत्साह झाले तेव्हा आपल्या वडील पुत्रास—१६ वर्षांच्या अजितसिंहाला आज्ञा केली, 'तरवार घे आणि रणक्षेत्रात जा' आज्ञा ऐकताच तो शत्रूवर तुटून पडला आणि कित्यकांना मारून स्वत: कामी आला. तेव्हा जोझारसिंहाला तीच आज्ञा झाली. तेव्हा जोझारसिंह म्हणाला, तहान लागली आहे पाणी पिऊ द्या "पित्याने आज्ञा दिली," "तुझ्याभावाजवळ रुधिराच्या नद्या वहात आहेत तहान भागवून घे." जोझारसिंह सुद्धा शत्रूंचा संहार करताना मारला गेला. गुरुगोविंदाच्या लहान मुलांना नबाबाने किल्ल्याच्या भिंतीत चुनले मग गुरूव तेवढे अलग कसे राहतील."

एवढ मात्र खरे. चिमूवासियांना विपत्तावस्थेत सोडून महाराज निघून गेले. डाकबंगल्यावर दोघांना परिस्थितीची कल्पना देऊन स्वत:च्या मोटारीत चलण्यास सांगितले. विधिलिखित टळणारे नव्हते. "आम्ही परिस्थिती आटोक्यात आणूच त्याकरिता तर इथे आलो आहे." असे उत्तर मिळाले. महाराज निघून गेले नि त्या दोघांचा अहकार विफल झाला.

जमाव घोषणा करीत डाकबंगल्या-



वर आला. तेव्हा दोघेही व्हरांड्यात आले. त्यांनी जमावाला शांत होण्यास सांगितले. प्रक्षुब्ध जमावाने गिट्टीचा मारा सुरू केला. दोघांनी आत जाऊन दरवाजे बंद केले. खिडकीतून त्यांना राजीनामे देऊन देशाची सेवा करण्याची मागणी होऊ लागली. आतून उत्तर मिळाले "होईल ते करून घ्या." व पाठोपाठ धारदार वस्तू बाहेर आली. जमावाचा संयम सुटला व दोन्ही साहेब ठार झाले.

पुढे बऱ्याच लोकांना अटक झाली. पैकी २४ लोकांना फाशीच्या शिक्षा झाल्या. त्यात शेवटी सात लोक शिल्लक राहिले. या सप्त चिरंजिवांना फासावरून सोडविण्यास फाशी निवारक समिती कार्याला लागली. न्यायाची मती कुंठीत झाल्यावर दयेचे अर्ज जाऊ लागले. त्यात चिमूर दंगलीत प्राणास मुकलेले एस. डी. ओ. डुगाजी यांच्या मातोश्री कुंवरबाई यांनीसुद्धा ता. २७ डिसेंबर १९४४ ला ना. गव्हर्नर व व्हाईसराय, यांच्याकडे विस्तृत अर्ज पाठवून चिमूरआष्टीच्या फाशी झालेल्या आरोपींना दया दाखविण्याबद्दल विनंती केली आहे, त्यात शेवटी त्या म्हणतात, "दंगलीतील गुन्ह्याला बळी पडलेल्याच्या आईने आपल्याला केलेली प्रार्थना वाया जाणार नाही. आणि आपण फाशीची शिक्षा झालेल्यांना दया दाखवाल अशी मला आशा आहे. माझ्या दिवंगत पुत्राच्या आत्म्यालाही आपल्या या दयेच्या कृतीने संतोष वाटेल असा मला विश्वास वाटतो."

तसेच चिमूर कांडात बळी पडलेले नायब तहसिलदार ए. के. सुनवाणी यांच्या पत्नी ग्लेडीज इग्निर सुनवणी यांनीसुद्धा अर्ज पाठविला. त्यात त्या लिहितात. "पतीच्या मृत्युमुळे माझी जी हानी झाली आहे. तिचे दुःख मी सतत अनुभवीत आहे. तथापि फाशीची शिक्षा झालेल्यांना फाशी दिल्याने मला किंवा माझ्या पतीच्या आत्म्याला शांती मिळणार नाही. कारण माझ्या पतीच्या मृत्युमुळे मला ज्या वेदना होत आहेत, त्याच माझ्या भगिनींना होतील अशी मला खात्री वाटते. म्हणून माझी नम्र प्रार्थना आहे की, माझ्या भगिनीच्या पतींना फाशीची शिक्षा देणे योग्य होणार नाही; तरी त्यांना आपण प्राणदान देण्याची कृपा करावी."

धन्य ती माता नि धन्य ती पत्नी जी स्वतःचे दुःख दूर सारून राष्ट्रकार्यार्थ धावून आली. भारतमाता आपल्या या कन्यांना प्रसन्न चित्ताने आशीर्वाद दिल्याशिवाय राहिली नसेल.

● ● ●

पुस्तके

# जुलूस

केशव मेश्राम

प्रकाशन व्यवसायात कविता या वाङ्मयप्रकाराचे काहीही स्थान असले, तरी कवीजनात ते अजोड आहे, यात शंकाच नाही. आणि आजकालच्या तरुण कवितेचा रंग हा दिवसेंदिवस बदलतो आहे. व्यक्तिगत जाणीवा आणि समष्टीच्या व्यथा-वेदना यांच्यात एक तरल व आर्त भावबंध आजच्या कविमनाने निर्माण केलेला दिसतो. म्हणूनच कोणत्याही तरुण कवीच्या कवितांचा आस्वाद घेत असताना, सगळ्या जगभरच्या आंदोलनाचे, साद पडसाद त्यातून उमटतांना आढतात. 'जुलूस' हा संग्रह, म्हणजेच कवी फ. मुं. शिंदेही याला अपवाद नाहीत.

स्वतःच्या घडणीबाबत कवीला विपर्यस्त अनुभव येतो, भोवतालातील प्रचलित आदर्श बेगडी वाटू लागतात. एक वर्ग दुसऱ्या वर्गाला केरकचऱ्याप्रमाणे वागवतो. सगळीकडे असा 'अस्पृश्य गंध' कोंदलेला असताना परिचित शब्दरंगांची भिंगे कवीमनाला भुरळ पाडण्यास तोकडी पडतात.

भावमूल्यांसहीत अवघ्याच मूल्यांना गळती लागते. त्यांची गळचेपी होत जाते. तसतसे फ. मुं. शिंदे टणक बनत गेलेले दिसतात. "पोटाशिवाय उघडयावर वाढणारे दैन्याचे गर्भ" त्यांना अंतर्मुख करतात. आयुष्य उजाड व विधवा वाटू लागते. या "विधवा आयुष्यातला मजकूर खोडण्यापेक्षा" तो नव्या पद्धतीने लावण्याचा त्याला छंद जडतो. कारण दुःख माणसाच्या ओटीपोटातून आलेले असते. त्याचा "दुःखाचा जन्म तर मुळीच बेवारशी नसतो" ह्या समजूतदारपणातूनच कवी एक नवे भाष्य करतो तो म्हणतो, हे वारसदार दुःख, "अश्रूंच्या हातांनी कवटाळायला पाहिजे."

शिंदे यांची कविता समजायला फार सोपी वाटते. पण तिच्यातच सूचकतेचे अनेक पदर दडलेले आहेत. त्यांच्या संवादपद्धतीच्या कवितेला कणखर भविष्य असल्याच्या खुणा त्यांच्या कितीतरी कवितांत विखुरलेल्या दिसतात. फक्त त्रेचाळीस कवितांचा ह्या छोटा संग्रह त्यातली क्रमांक सदतीसची कविता अशी खूप अर्थपूर्ण आहे. जेव्हा ते म्हणतात—"मनापुरते काही संवाद काही ओळी,

माझ्यासाठी, तुझ्यासाठी..." असा हा जो मनःसंवाद आहे तो निरर्थक नाही. सारे व्यर्थ...हताश होऊन कोरडा आक्रोश करणे फ. मुं. शिंदे यांच्या झुंजार व्यक्तित्वाला मान्य नाही. "येणाऱ्या दिवसाकडे हाकेचे हात लांबवत" हा कवी निघाला आहे. झाडांच्या अंकुराने प्रकाशाचा वेध घेत निघावे, तसा आणि मनात एक खंबीर लढाऊ ईर्षा आहे.

> "असेच असेल भटकायचे
> अस्ताच्या काठावरून
> तर होऊ या आपणही
> स्वयंप्रकाशी मार्गावर"

हे 'स्वयंप्रकाशीत्व' ग्रहाप्रमाणे नाही, तर सूर्याप्रमाणे दाहक असेल, अशी कवीची मनोमन खात्री आहे. म्हणून तर तो "इतिहासातल्या रक्त आटलेल्या जुन्या बातम्या नव्याने शिकतो" आहे. ह्या दाहक तेजाचे इतरांना विशेषत: मुर्दाड स्वप्नांना काय फलित होईल, तर शिंदे म्हणतात, "तुमच्या प्रतिमांना चितेसारखी जागा नाही." ह्या उत्तप्त मनोवस्थेत कधी आपल्या स्वप्नभूमीलाही वास्तवाच्या भक्कम किनाऱ्यावर तो माशासारखी तळमळत ठेवतो...नियती, प्रेयसी, अगतिकता, आशा, श्रद्धा अशा कितीतरी सूचक शक्यतांशी, कवीचे दोन डोळे भिडतात व शब्द येतात— "मी स्वप्न पाहतो चार डोळ्यांनी रात्रीना लगाम घालून, कधी आभाळभर ओळी लिहितो, कधी काही दिसतच नाही. तू सुद्धा."

जगातल्या प्रत्येक अनुभवाला कवी सामोरा जाण्याची तयारी ठेवतो. ह्या पहिल्या पंचनाम्याच्या वेळी थोडा जीव उदास झाला असेल, पण रस्त्यावरच सारे व्यवहार उरकणारे "जीवाचे पंचनामे खरडतांना" "सारे हळूहळू सोयरे बनतात." प्रत्येक जण असा गांजलेला, उपेक्षित–दुखावलेला. मग साऱ्याच वेदनालिप्त माणसांच्या गर्दीत, कोणी कोणाला सांगावे तरी काय! आणि कोणी कुणाचे ऐकावे तरी कसे? ह्या गुंता कवीलाही बुचकाळ्यात पाडतो आणि 'पंचनामा' बाजूला पडून 'जीवनामा' बनतो. काहीच न वाटल्याची अवस्था प्रश्नचिन्हात जखडून ठेवते. "कोणाजवळ पेश करावेत जीवांचे जीवनामे?" हा प्रश्न कवीही पुनरुच्चारित करतो. सांगणे–ऐकणे–समजावणे या शब्दांना तसा काही अर्थच उरत नाही म्हणून मग हा स्वीकार येतो डोळसपणे.

> "समजण्यापलीकडे भूमिकाच
> उरली नाही
> देऊन टाकले पराभवाला सगळे
> प्रेम" (कविता क्र. ३३)

'इमल्याच्या रसिकाची' कवीला अपेक्षा नव्हतीच. 'जुलूसात आयुष्याचा बळी पडला' तरी तो 'उजेडाच्या स्वागतासाठी सिद्ध आहे. पण या गर्दीत हरवलेल्या कवीचा स्वतःचाच शोधही प्रत्यकारी आहे. क्रमांक एकेचाळीसची सगळी कविता, वकीली करणारी आहे.

"मुदती तापातून उठल्यासारखे.
मन सारखे पराभूत होत असते
क्षीणतेत
आकाश थकलेले दिसते सर्व अवयवां-
सारखे.
कोणा हाताने खुडून टाकले मला.
मी बुडून गेलोय समुद्रात माझ्याच
आतल्या !"

ज्या गांभीर्याने श्री. फ. मुं. शिंदे यांनी हे काव्यलेखनाचे व्रत स्वीकारले आहे त्याची योग्य दखल 'जुलूस'चे प्रस्तावनाकार श्री. दि. के. बेडेकर यांनी घेतली आहे. ते म्हणतात– 'माणसाला इतर माणसाशी संवाद हवा, इतर वस्तुजाताशीही संवाद हवा. सुखसंवाद असो वा शिव्यागाळी असो, पण सांधा हवा...पण आजच्या मुग्धव्यथेमुळे तरुणांना भासत आहे की सारेच अबोल आहे, मृतप्राय आहे.' पण मला बेडेकरांना जाणवते तशी 'संवादाची अशक्यता' जाणवत नाही. तर हा कवी ठळक खुणा पेरताना दिसतो आहे. कविता ही एक गंभीर घटना म्हणून कवीने स्वीकारली आहे. 'जगण्याचे मोल 'कशानेच ठरेना', प्रत्येक सिद्धांत उध्वस्ततेत मातीमोल ठरू लागला. तेव्हा 'कवितेसारखी एकच खूण तेव्हा त्याला विश्वास म्हणून सापडून गेली' आणि या 'सापडण्यावर तोही फिदा आहे. म्हणून संवादाला झुगारणारी पण सरळ रसिकमनाशी 'अग्रीसंवाद' साधणारी आपल्याच ढंगाची कविता शिंदे लिहू शकतात. त्यांच्या प्रतिभेचा लागलेला जो सूर आहे तो तसा खूप बोलका, सामर्थ्यशाली व कणखर आहे. पण अजून त्यांची काव्यक्षेत्रातली मुशाफरी चालू आहे. स्वयंप्रकाशिततेचा शोध घेण्यात ती रममाण झाली आहे. दलीत साहित्य म्हणून जे काही हवेसे वाटते आहे. त्याच्या समर्थ खुणा 'जुलूस' मध्ये आढळून येत आहेत. पण अजून परिपूर्ण अविष्कार झाल्याचे मनस्वी समाधान देण्यास 'जुलूस' कमी पडतो आहे. आपल्या इप्सिताकडे हा कवी ठामपणाने वाटचाल करतो आहे याची नांदी म्हणजे 'जुलूस' होय. ह्या नव्या वाटेवरच्या काही 'खुणा' मात्र मनोज्ञ आहेत आणि त्याबद्दल कवी फ. मुं. शिंदे अभिनंदनास पात्र आहेत. ◻

जुलूस
फ. मुं. शिंदे
अस्मितादर्श प्रकाशन, औरंगाबाद
किंमत ४ रुपये

# तीन पुस्तके

## बदला

'महाराष्ट्राचे महान् कादंबरीकार बाबा कदम' (इति या पुस्तकाची मल-पृष्ठ जाहीरात) यांची ही आणखी एक कादंबरी. कादंबरीतील प्रधान व्यक्ति-रेखा अक्कासाहेब नावाची स्त्री आहे. हे ढंगदार व्यक्तिमत्व हेच या कादं-बरीचे एकमेव बलस्थान आहे. भारता-

तील, विशेषत: महाराष्ट्रातील ग्रामीण पार्श्वभूमीवर उभ्या असलेल्या या कादंबरीला स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्य-पश्चात् आजतागायत असा दीर्घ कालपट मिळालेला आहे. रसरसीत व्यक्तित्वे आणि घटनानाट्याची प्रवाही गुंफण ही कादंबरीची यशाची बाजू. कथेच्या अनुषंगाने, स्वातंत्र्योत्तर काळातील पंचायत पातळीवरील, ध्येयवादाचे अस्तर असलेले राजकारणही कादंबरीतून दर्शन देवून जाते. पण कादंबरीचा एकंदर बाज रहस्यकथेचा आहे. उत्कंठावर्धन, गतिमानता आणि कथानकाची गुंतागुंत ही रहस्यकथांची सामान्य सूत्रे येथे साहजिकच महत्त्व पावलेली दिसतात. एखाद्याला समाधान होणार असेल तर या कादंबरीला 'ग्रामीण' हे विशेषण लावावेही. मराठी चित्रपट जेवढे ग्रामीण असतात तेवढी ग्रामीणता या कादंबरीत निश्चितच आहे. अशी रंजक रहस्यप्रधान कादंबरी स्थलवर्णने व धक्कातंत्र यांचा टेकू घेतघेत पुढे जाते हे काय वेगळे सांगावयास हवे? हरिभाऊ व नाथमाधवांच्या कादंबऱ्यांचे हे नवे रोमँटिक इतिहासदृश रूप लाक्षणिक आहे. कादंबरीचे मुखपृष्ठही रोमँटिकच. कै. दलालांच्या कुंचल्याची आठवण करून देणारे हे तरुणीचे चित्र, खरे म्हणजे चित्रातील तरुणी, बंदुक उचलणारी वाटत नाही, बंदुकीच्या 'स्टँड'ला टेकून पोझ देणारी वाटते! ही तर देवआनंदची प्रेमपुजारिनच! असो. चारचौघांना आवडेल असा हा मालमसाला पण एखाद्याने भाबडेपणाने पंधरा रुपये मोजले तर कदाचित त्याला या कादंबरीने आपल्या पैशाचा 'मोबदला' न देता 'बदला' घेतला असे वाटणे हेच अधिक संभाव्य! ◻

## स्नेहसंमेलन मार्गदर्शिका

सध्याच्या शालेय स्नेहसंमेलनातील साचेबंदपणा, उणीवा व पारंपारिकता दूर होण्याच्या दृष्टीने विचार करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने एक समिती नियुक्त केली होती. या समितीने तयार केलेल्या मसुद्याचे परीक्षण होऊन नंतर याच विषयावर 'जीवन-शिक्षण' मासिकाचा एक स्नेहसंमेलन विशेषांक निघाला होता. त्या अंकाचेच रूपांतर म्हणजे प्रस्तुत पुस्तिका होय. स्नेहसंमेलनाची उद्दिष्टचे व व्याप्ती, आजची स्नेहसंमेलने, आदर्श स्नेहसंमेलने, स्पृहणीय कार्यक्रम व मूल्यमापन या क्रमाने पुस्तिकेत विवेचन केलेले आहे. पुस्तिकेतील निरीक्षणे क्वचित पुनरुक्त असली तरी मार्मिक आहेत. पण पुस्तिकेची भाषा मात्र साचेबंद व ठोकळेबाज आहे. स्नेहसंमेलने सुधारण्यासंबंधीच्या सूचना उपयुक्त आहेत. लोककल्याणकारी राज्याच्या शासनाने 'शाहाणे करूनि सोडावे सकळ जन' ही भूमिका शिक्षकांच्या बाबतीत घेतली तर त्यात फारसे वावगे नाही. पण याच शासनाने, व शासननियुक्त समितीने मूलभूत प्रश्न डावलावेत की काय? उदाहरणार्थ, स्नेहसंमेलनाचे मूळप्रश्न जागेची टंचाई, पैशाची कमतरता आणि कलातज्ज्ञ शिक्षकांचा अभाव हे आहेत. शिकविण्यासाठीच पुरेसे वर्ग नसतात म्हणून वर्गात

मुलांची संख्या साठ ते पासष्ट एवढी कमी ठेवावी लागते (!) मग स्नेहसंमेलनातील कार्यक्रमाच्या तालमीला जागा कोठून आणणार? आधुनिक नाट्यतंत्रातले म्हणजे वेगळ्या भाषेत नेपथ्याची काटछाट असणारे प्रवेश मुलांना भावत नाहीत असा अनुभव आहे. बऱ्याच शाळांना राजाला मुकूट आणणे परवडत नाही! आणि कलातज्ज्ञ शिक्षकांची एकंदर टाइमटेबलमध्ये सोय कोठे लावावयाची? शिवाय तो एकाच कलेतील तज्ज्ञ असला म्हणजे झाले की अनेक कलातज्ज्ञ? यांच्या अभावी अनेक ठिकाणी शिक्षक–शिक्षिकांनाच नृत्यदर्शन की दिग्दर्शन करण्याच्या निमित्ताने वेडी (वाकडी नव्हे) पावले टाकावी लागतात! एकूण काय, काय असावे हे सांगणे ठीक आहे. आहे त्यात मूलभूत बदल कसा घडविता येईल हा खरा प्रश्न. तो येथे टाळलेला आहे. बाकी विवेचन हवेतलेच ठरते. ◻

## अशी ही बिकट वाट

माडीवाले यांचे हे पुस्तक आत्मचरित्रवजा भासले तरी रूढ अर्थाने ते आत्मचरित्र नाही. एका वार्ताहराचे ते व्यावसायिक आत्मचरित्र आहे. व्यवसायाला सुरुवात केल्यापासून तो आजतागायतपर्यंतचा जिवंत इतिहास त्यांनी सावधान मनाने टिपलेला आहे. सुंदर व्यक्तिरेखाटने, अनेक रोमांचकारी प्रसंग, खुसखुशीत विनोद ही या पुस्तकाची खास वैशिष्ट्ये आहेत. व्यवसाय करीत असतानाच माडीवाले यांनी व्यावसायिक नीति आणि व्यापक अशी मानवी नीति या दोन्हीचे भान ठेवलेले आहे. त्यामुळे प्रसंग आणि व्यक्तिमत्वे यांच्या दर्शनातून माणुसकीच्या दर्शनाला महत्त्व आलेले आहे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यपश्चात् अशा दोन कालखंडतील वृत्तपत्रव्यवसायातील विरोध माडीवाले यांनी नेमकेपणे नोंदला आहे व तद्विषयी आपली प्रतिक्रियाही व्यक्त केली आहे. पुस्तकाला पु. ल. देशपांडे यांची नेहमीप्रमाणे खुसखुशीत आणि रोचक अशी प्रस्तावनाही लाभली आहे. पुस्तकाचे रमणीयत्व लक्षात घेता ती प्रस्तावना ही पुस्तकाची added नसली तरी attraction ठरावी. प्रसंग जिवंत उभा करण्याचे माडीवाल्यांचे कौशल्य प्रशंसनीय आहे. गोवा मुक्तिसंग्राम हे वानगीचे उदाहरण. अशी 'ही बिकट वाट' शीर्षकसूत्र पुनः पुन्हा लेखनात येते आणि किरकोळ पुनरुक्तीत भर टाकते, पण एका विनम्र व्यक्तिमत्वाच्या वार्ताहरी आयुष्याचे हे दर्शन वाचकांना वेधक वाटेल यात संशय नाही. एक सुंदर पुस्तक – अवश्य वाचनीय! ◻

—सुहास भालचंद्र बापट

| | | |
|---|---|---|
| बदला | स्नेहसंमेलन मार्गदर्शिका | अशी ही बिकट वाट |
| बाबा कदम | शिक्षणशास्त्रसंस्था, | वि. स. माडीवाले |
| रंजना प्रकाशन, मुंबई | महाराष्ट्र राज्य, पुणे | केसरी प्रकाशन, पुणे |
| मूल्य पंधरा रुपये. | मूल्य नव्वद पैसे. | मूल्य दहा रुपये. |

# कोकण रेल्वे नव्हे पश्चिम किनारी रेल्वे

पृष्ठ १६ वरून

'करेक्ट. तुम्ही कोकण रेल्वे प्रकल्पाचा अभ्यास केला आहे ना? अर्थशास्त्रही जाणता. आहेत तुमच्याजवळ काही आकडे?' आजगावकर

'मी माझे अंदाज सादर केले तर ते स्वप्नरंजन आहे म्हणून त्याकडे दुर्लक्ष होईल. उद्योगपती श्री. एम्. एन्. गोगटे यांनी यासंबंधात केलेली निवेदने आणि पुरविलेले आकडे तर विचारात घ्याल.'

'मराठेसाहेब, कोकणात वाहतूकीचे मार्ग दोन. एक आगबोटीचा आणि दुसरा एस्. टी. चा यापैकी पहिला जलमार्ग एकतर पावसाळ्यात चार महिने तो बंद पडतो. बदरे होरल्यामुळे बोटी बंदरापासून दूर उभ्या राहतात त्यामुळे खर्चिक आणि त्रासाचा वाटणारा शिवाय अनियमित सेवा आणि येताजाता होणारी भरमसाठ दरवाढ ही त्याची वैशिष्टचे. दुसरा मार्ग आता काँक्रिटचा. अगदी सावंतवाडीपर्यंत जाणारा. पण चार इंची काँक्रीट ४।२ वर्षांत फुटून अनेक ठिकाणी डांबरी खडीची ठिगळे लावलेला. हा रस्ता बहुश: दुरुस्ती खाली असतो आणि ड्रायव्हर्सनी शेताडयातून धावतो. हमरस्त्याची ही स्थिती तर त्याला जोडणाऱ्या अंतर्गत रस्त्यांची परिस्थिती किती दयनीय असेल याची कल्पना करा. या देशात योजनाबद्ध आर्थिक विकास होत असल्याच्या आपण गप्पा मारतो, पण पुढल्या शे-पन्नास वर्षांच्या ट्रॅफिकचा अंदाज घेऊन एकही राष्ट्रीय वा राज्यीय हमरस्ता बांधलेला नाही ही वस्तुस्थिती आहे. नजिकच्या व चालू काळाच्या गरजा भागविण्यापुरते पहाण्याची ही इलेक्शनी वृत्ती राष्ट्रविकासाच्या दृष्टीने धोक्याची नाही का? मुख्यमंत्र्यांनी याबाबत विधानसभेला वेळोवेळी पुरविलेली माहिती व आकडेवारी फसवी आहे. जिथे एस्. टी. घातली जाते तिथे रस्ता असतोच असे नाही! त्यामुळे कोकणात रेल्वेची निकड आहे असे प्रतिपादताना–चौथ्या योजनेस निदान आपटा-रत्नागिरी एवढा विभाग तरी बांधावा अशी मागणी करताना, कुलाबा, रत्नागिरी व गोव्यापर्यंतच्या भागाचा प्रत्यक्ष व अपेक्षित विकास व त्यामुळे रेल्वेला मिळणारी मोठ्या प्रमाणावरील वाहतुक यांचे अंदाजी आकडे श्री. गोगटे यांनी सादर केले आहेत. त्यात अलीकडे घेतलेल्या निर्णयाची व उभारू घातलेल्या कारखान्यांची भर घालून निर्माण होणारे हे चित्र पाहा.

वाहतुकीच्या पहाणीच्या दृष्टीने, कोकणभागात निर्माण होणारा माल, इथे उभ्या असलेल्या वा उभ्या होत असलेल्या कारखान्यांना लागणारा कच्चा माल, तयार होणारा पक्का माल, व सर्वसाधारण उपयोगाच्या वस्तूंची वाहतुक या गोष्टी विचारात घ्यायला हव्यात.'

'ट्रॅफिक किती आहे व किती वाढ-

ण्याची शक्यता आहे हे सर्वसाधारपणे सांगता येईल ?' मराठे.

'तसा नक्की हिशेब मांडणे कठीण. पण बी. अॅण्ड सो. डिपार्टमेंट प्रतिवर्षी एखाद्या दिवशी–मुंबई-गोवा हमरस्त्या-वर कुठेतरी, त्या रस्त्यावरून २४ तासात धावणाऱ्या एकंदर ट्रॅफिकची मोजणी करते. त्या आकड्यावरून काही बोध व्हावा. उदाहरणार्थ १९६१–६२ साली २४ तासात धावणारा एकंदर ट्रॅफिक ४ हजार टन होता. १९६९–७० साली तो १०–११ हजार टन आहे. कोकणचा विकास झपाट्याने होत आहे असा अंदाज या आकड्यांवरून वर्तविणे चुकीचे ठरेल. पण वाहतुक वाढती आहे हे मान्य करावे लागेल. आता कुलाबा व रत्नागिरी जिल्ह्यांच्या संपत्तीचे हे काही आकडेच पहा ना.

कुलाबा

| वस्तू | वार्षिक उत्पादन |
|---|---|
| १ : तांदूळ | १ लक्ष टन |
| २ : आंबे | ४००० टन–६६ टक्के निर्यात |
| ३ : भाजीपाला | ४००० टन |
| ४ : साग | २०,००० टन |
| ५ : कोळसा | १०,००० टन |
| ६ : जळाऊ लाकूड | २५,००० टन |
| ७ : मीठ | १ लक्ष ५० हजार टन |
| ८ : बॉक्साइट | ५० लक्ष टन |
| ९ : सुपारी | (मुरुड, रोहे, श्रीवर्धन या भागातील) |
| १० : नारळ | } नक्की आकडे |
| ११ : मासे | } उपलब्ध झाले नाही. |

रत्नागिरी

| | |
|---|---|
| १ : तांदूळ | ७५ हजार टन |
| २ : आंबे | ३५ हजार टन - ६६ टक्के निर्यात |
| ३ : काजूगर | ८ हजार टन–७५ टक्के निर्यात |
| ४ : नारळ | ८५ हजार टन |
| ५ : सावरीचे लाकूड | ४ हजार टन |
| ६ : सुपारी | २५ हजार टन |
| ७ : बांबू | १ हजार टन |
| ८ : मिरी | आकडा उपलब्ध नाही. |
| ९ : जायफळे | " |
| १० : खाण लोह (रेड्डी) | ४ लक्ष ५० हजार टन १००% निर्यात (एकूण साठा ५ कोटी टन) |

| वस्तू | वार्षिक उत्पादन |
| --- | --- |
| ११ : मँगेनीज (अशुद्ध) | आकडा उपलब्ध नाही १००% निर्यात |
| १२ : सिलिका | १० हजार टन (एकंदर साठा २ कोटी ५० लक्ष टन) |
| १३ : इल्मेनाईट | ८ हजार टन (साठा २० लक्ष टन) (३२ टक्के टिटॅनियम निर्यात होते) |
| १४ : क्रोमाईट | ३ हजार टन (साठा ७५ हजार टन) |
| १५ : तांबडो चिकण माती | २ हजार टन (साठा १० लक्ष टन) |
| १६ : मासे | ५० हजार टन (८ हजार टनांवर) (प्रक्रिया केली जाते. ६ हजार टन शार्कलिव्हर ऑईल बाहेर पाठविले जाते) |
| १७ : फळे–अननसे–केळी– | आकडे उपलब्ध नाहीत. (कॅनिंगचे कारखाने निघत आहेत–मोठ्या बागा उभ्या राहात आहेत.) |

या आकडेवारीत गोव्याच्या खनिज, सागरी व जंगली संपत्तीची भर घातली तर कोकणची संपत्ती कमी नाही–हे ध्यानात यावे. रेल्वे आली तर निसर्गाच्या या वरदानाचा होत असलेला निचरा थांबेल. कोकणादारी लक्ष्मी येईल, हे सांगायला कुणी ज्योतिषी नको.

शिवाय प्रतिवर्षी कोकणच्या गरजा भागविण्याकरता रॉकेल, सीमेंट, गॅस, लोखंडी सामान, वनस्पती तूप, तेले, गूळ, साखर, मिरची, डाळी, तंबाखू, चहा, कापड, पेंड, औषधे, कटलरी, इतर अनेक गृहोपयोगी वस्तू बाहेरून मोठ्या प्रमाणावर आणल्या जातात. त्याही जमेस धरल्या तर रेल्वेला बरीच वाहतूक मिळेल असे म्हणता येईल.'

'प्रो. बिवलकर, ही सगळी वाहातुक आज मोटारी करीत आहेत. ती सगळी रेल्वेला मिळेल असे नाही.'— आजगावकर.

'मान्य ना. पण ही वाहातुक वाढणार आहे. माल मोटारींना झेपणार नाही.'

आज कोकणात उद्योग आहेत पण ते लहान प्रमाणावर चालतात. तांदळाच्या गिरण्या, कटलरी सामान, तांब्या-पितळेची भांडी घडविणे, लाकूड-कामाच्या गिरण्या, कातडी उद्योग, काजूगरफोड, थोड्या प्रमाणावर विणकाम, फळे व मासे हवाबंद करणे, विड्या वळणे खाण्याचे तेल व साबण तयार करणे, या गोष्टी छोट्या कारखानदारीतच मोडतात. याशिवाय रंगाचे, कागदाचे, मूर्ती तयार करण्याचे कारखाने आहेत तेही छोटेच.

पण आपट्याला १५ कोटी रुपये

खर्चून 'रसायनी' नामक १५।१६ मूलभूत रसायने तयार करणारा सरकारी कारखाना सुरू झाला आहे. रोहे, चिपळूण येथे औद्योगिक वसाहती उभ्या राहिल्या आहेत. वीज आली आहे. काळप्रकल्पासारखे बंधारे बांधून शेती-बागायतीला आणि उद्योगांना पाणीपुरवठा होऊ शकेल. त्यामुळे उभारल्या जाणाऱ्या कारखान्यांच्या अनुषंगाने अनेक पूरक उद्योग उभे राहतील.'

'कुठले नवे कारखाने उभे राहाताहेत ? काही कल्पना द्याल ?'—मराठे.

'मराठेसाहेब, मला एक शंका येते. तुम्ही माझीच तर परीक्षा पाहात नाही ?'

'तसे नाही. खरेच आम्ही एवढ्या आत्मीयतेने या आर्थिक बाजूचा विचार केलेला नाही. एक तर तो भाग आमच्या कामाच्या अखत्यारीतला नाही; आणि दुसरे म्हणजे तुमची पोटतिडीक आमच्याजवळ नाही!'

'पोट तिडकीपेक्षा या फॅक्ट्स् पाहा ना. संकल्पित बड्या कारखान्यांची ही यादीच पाहा.

| कारखाना | कच्च्या मालाची वाहतुक | वार्षिक उत्पादनक्षमता |
|---|---|---|
| १. रत्नागिरीजवळचा कच्चे लोखंड निर्माण करणारा कारखाना | १. खाणलोह—३ लक्ष ५० हजार टन<br>२. चुनखडी ७५ हृ. टन<br>३. कोक. १ ल. ३० टन<br>४. जळाऊ तेल—२१ हृ. टन.<br>५. क्वार्टझ्—१० हृ. टन. | २ लक्ष टन |
| २. वेंगुर्ले येथे निघणारा प्लेट ग्लासचा कारखाना | १. क्वार्टझ् ३० हृ. टन.<br>२. सोडाअॅश—४ हृ. २ शे. टन.<br>३. चुनखडी—२ हृ. ४ शे. टन.<br>४. डोलोमाईट—२ हृ. ४ शे. टन.<br>५. जळाऊ तेल—१० हृ. टन. | १८ हजार टन. |
| ३ : जयगड येथील अॅल्युमिनियमचा कारखाना | १. बॉक्साईट—२ ल. ७५ हृ. टन<br>२. रसायने— १३ हृ. टन.<br>३. पेट्रोलियम कोक—२४ हृ. टन.<br>४. फरनेस ऑईल—४५ हृ. टन. | ५० हजार टन. पावडर शीट्स् वगैरे |
| ४ : साखर कारखाना चिपळूण | आकडे उपलब्ध नाहीत. | ५० हजार टन. |
| ५ : सूत गिरणी चिपळूण | १. कापूस—२ हृ. टन<br>२. साइझिंगचे सामान—५ शे. टन. | २ हजार टन कापड |

| कारखाना | कच्च्या मालाची वाहतूक | वार्षिक उत्पादनक्षमता |
|---|---|---|
| ६ : फेरोसिलिकन व फेरोक्रोमचा कारखाना रत्नागिरी | १. क्वार्टझ २६ ह. टन.<br>२. पोलादी सामान ह. टन<br>३. कोक–७ ह. टन.<br>४. अशुद्ध क्रोमाईट ८ शे टन.<br>५. कार्बन–इलेक्ट्रिक पेस्ट – १३ शे टन. | फेरोसिलिकन ७ हजार टन.<br>फेरोक्रोम ५ हजार टन |
| ७ : गोव्यातील साखरकारखाना | आकडे उपलब्ध नाहीत | आकडे उपलब्ध नाहीत |
| ८ : लोखंड व पोलाद निर्मितीचा कारखाना गोवा | आकडे उपलब्ध नाहीत | आकडे उपलब्ध नाहीत |

या बहुतेक कारखान्यांच्या योजना अजून निळ्या कागदावर आहेत हे खरे पण रेल्वे आली तर या संकल्पांमुळे वाहातुकीत किती प्रचंड वाढ होऊ शकेल याची वानगी ते नक्कीच देतात. हे नवीन उद्योग वार्षिक १५ ते २० हजार वाघिणी एवढी वाहातुकीची गरज या भागात निर्माण होईल हे सांगतात. रेल्वेमुळे विकासाला गती मिळाली की अशा कितीतरी लहान मोठ्या कारखान्यांची धुराडी आकाश-रेषा भेदून उठतील !

कोकणात एक मोठा निरींद्रिय खतांचा कारखाना निघू शकेल. कॉस्टिक सोडा, क्लोरिन, भाताच्या तुसांचा उपयोग करणारे उद्योग, फलप्रक्रिया व मत्स्यप्रक्रिया उद्योग यानाही कोकणात चांगला भविष्यकाळ आहे. या सर्व गोष्टींचा विचार करता कोकण विभागातून धावणारी पश्चिम किनारी रेल्वे या भागातील भांडवल गुंतवणुकीवर ८ टक्के एवढे व्याज नक्की देईल हा श्री. गोगटे यांचा अंदाज वाईटा खास नाही. वाहातुक पाहाणीत व्याजाचे प्रमाण ६ टक्के असले तरीही रेल्वेप्रकल्प फायदेशीर मानला जातो की.

'पण अंदाज खरा ठरला तर मि. विवलकर. '–आजगावकर

हे कबूल. पण जगातील आलिशान म्हणून मानल्या गेलेल्या अमेरिकन रेल्वेही भांडवल-गुंतवणुकीवर चार, टक्केही व्याज निर्मू शकत नाहीत आणि कोकण रेल्वे इन्फास्ट्रक्चर म्हणून, संरक्षणफळी म्हणून, उभी राहायची आहे. तिथे व्याजाचा हिशेब जरा कमी अधिक झाला तर काय बिघडले ? शिवाय कोकणची उतारू वाहातुक आजही दुर्लक्षणीय नाही. यात्राजत्रांना जाणाऱ्या माणसांची संख्याच वार्षिक ६ लाखावर आहे. शिवाय कोकणातील घरटी एक-दोन माणसे मुंबई-पुण्यात आहेत. त्यांची मुळे कोकणच्या मातीत अजूनही पक्की आहेत. ही मंडळी गणपती, शिमगा, लावणीचा हंगाम

अशा निमित्ताने कोकणात येजा करतात. शिवाय इथे आता शिक्षणाच्या सोई वाढत आहेत. त्यांचाही इकॉनॉमिक इम्पॅक्ट कमी नसतो. अहो आमच्या डॉ. आंबेडकर कॉलेजची वार्षिक उलाढाल १०-१२ लाखांची धरलीत तरी महाड शहराच्या दरडोई उत्पन्नात ५० रुपयांची भर कॉलेजने घातली आहे ! शिवाय थंड हवेची ठिकाणे सागरी क्रीडागृहे, आरोग्यधामे, ऐतिहासिक वास्तू अशी पर्यटनयोग्य ठिकाणे कोकणात अनेक आहेत. त्यांचा विकास चालू आहेच. त्यामुळे कोकणची उतारू वाहातुकही खूपच वाढणार आहे.'

'इट्स्-पास्ट मिडनाईट. मि. बिवलकर. गेले २-२॥ तास कसे गेले तेही समजले नाही. आता आपण उठू या.'-मराठेसाहेब म्हणाले.

'मी आपला फारवेळ घेतला.'

'नो नो-सकाळी लवकर निघायचंय् म्हणून. नाहीतर या साऱ्या गोष्टीत आम्हाला रस आहेच की.'

मी उठलो. उभय-इंजीनियरांशी हस्तांदोलन केले-'गुडनाईट' झाले. श्री. मराठेसाहेबांनी मुंबईत आलात तर जरूर भेटा असेही म्हटले-

मुलाखत छान झाली होती. त्यात लोकेशन सर्व्हेसंबंधीही चर्चा झाली होती. त्यानंतर श्री. गोगटे यांच्याशी संपर्क साधून मी खूप माहिती जमविली आणि दोन लेख 'अमृत'मध्ये प्रसिद्ध केले. ७१ सालच्या जुलै-ऑगस्टमध्ये लेख प्रसिद्ध झाले. ११ सप्टेंबर १९७१ रोजी सकाळी एक गृहस्थ माझ्या दारी उभे राहिले. आदल्यादिवशी येऊन भेटीला येत आहे अशी चिठी ते ठेवून गेले होते. त्यांचे नाव श्री. पानसे. मध्य-रेल्वेतील ते एक कमर्शिअल इन्स्पेक्टर असल्याचे त्यांनी मला सांगितले. त्यांच्या फाईलमध्ये माझ्या 'अमृत'-मधील दोन्ही लेखांचे इंग्रजी भाषांतर होते. त्यात मी दिलेली, ट्रॅफिक पाहा-णीला योग्य असलेली माहिती बरोबर आहे की नाही हे पडताळून पाहाण्याचा आदेश त्याना कमर्शिअल ट्रॅफिक सुपरिंटेण्डटनी दिला होता. ते म्हणाले-

'प्रो. बिवलकर, मी मंगळूरपासून-माहिती जमवीत काल महाडला आलो आहे तुम्ही तुमच्या लेखात दिलेली माहिती ९५ टक्के खरी आहे याची खात्री मी करून घेतली आहे. आप-ल्याला भेटावे, आपण आमच्या कार्यात केलेल्या मोलाच्या मदतीबद्दल आपले अभिनंदन करावे व आपण माहिती कुठून जमविली ते आपल्याला विचारावे म्हणून मी आलो आहे.'

मी त्यांना हव्या त्या संदर्भाची माहिती दिली. उद्योगपती श्री. गोगटे यांना मुंबईला भेटा असे सुचविले. ठर-विलेल्या रेल्वेमार्गाबद्दल दोन तास चर्चा केली पानसे म्हणाले,

'आमच्या कमर्शिअल रिपोर्टात आपल्या नावाचा उल्लेख केला तर तुमची हरकत नाही ना ?'

मी म्हणालो, 'हरकत ? पानसे साहेब, मी ते माझे भाग्य समजेन. माझा थोडासा अभ्यास तुम्हाला उप-योगी पडला. खरंच धन्य वाटले'

'पुण्याला आलात की माझ्याकडे या मी शिवाजीनगरला राहतो'. 'होय' म्हणत मी त्याना निरोप दिला. नसते मोठेपण सहज पदरात पडले म्हणून माझ्या चेहऱ्यावर हास्य फुलले होते!

## पंतप्रधानांची घोषणा

त्यांचा सर्व्हे रिपोर्ट रेल्वे बोर्डाला ७१ च्या डिसेंबरच्या दरम्यान सादर झालाही असावा. पण दिल्लीची लोकसभेची निवडणूक, विधानसभेच्या निवडणुका—या धुमधडाक्यात कोकण रेल्वेला नेहमीप्रमाणे मुहूर्तच मिळाल्यासारखा नव्हता. कोकणाबाबत महाराष्ट्रशासनाला आकस आहे की काय असे वाटावे असे शासनाचे धोरण दिसत होते. दिल्लीपर्यंत कोकणचा आवाजच पोचत नव्हता. पुन्हा या पहाण्या कबुतरी खुराड्यात पडणार असे वाटत असता—देशभर आणि विशेषत: महाराष्ट्रात न भूतो असा दुष्काळ पडला. कोकणाला नामदार अंतुले यांच्यासारखा मंत्रीही मिळाला आणि सुदैवाने दळणवळण खातेही त्यांच्या हाती आले. त्यामुळे 'दुष्काळी कामात तरी कोकण-रेल्वेचा समावेश करा' ही मागणी पुढे आली. वसंतराव, यशवंतराव, पैसाहेब यांनी ती उचलून धरली—आणि कोकण रेल्वेची गाडी काहीशी मार्गी लागली हे सिद्ध झाले पंतप्रधानांच्या औरंगाबादच्या घोषणेने.

कामाच्या सुरवातीला विलंब झाला असला, ५ फेब्रुवारीचा मुहूर्त टळला असला तरी कोकणची गाडी आता थांबायची नाही असे वाटते आहे. पण परवा अचानक रेल्वेमंत्री बदलले. नवे रेल्वेमंत्री श्री. ललितनारायण मिश्रा यांनी पश्चिमकिनारी रेल्वेप्रमाणेच इतर राज्यातील मागण्या विचारात घ्याव्या लागतील असे विधान केल्यामुळे पुन्हा पाल चुकचुकतेच आहे.

रेल्वेसंबंधी इतर काही व्यक्तींबरोबर चर्चा करताना आणखी एक मुद्दा पुढे आला. मुंबईचे वाढते कारखाने, वाढती वस्ती, यामुळे स्वच्छ पाणी, सांडपाण्याची व्यवस्था, वाहतुक यावर विलक्षण ताण पडत आहे. कारखान्यांची धुराडी हवा दूषित करीत आहेत. यावर उपाय जुळे मुंबई शहर वसविणे हा नसून, मुंबईच्या दक्षिणेचा भाग वीज, पाणी, वाहतूक (रेल्वे) यांनी विकासित करून, मुंबईचे कारखाने व लोकवस्ती नियोजित पद्धतीने कोकणात हलविणे हा आहे. कारखान्यांचे असे विकेंद्रीकरण संरक्षणदृष्ट्या व आरोग्यदृष्ट्याही योग्य ठरणार आहे. मुरुड, दाभोळ, रत्नागिरी, गोवा ही बंदरे विकासित झाली, बारमाही चालू झाली, रेल्वेने आंतर्देशाशी जोडली गेली की मुंबईवरचा ताण कितीतरी कमी होईल. पुणे, मिरज, बेळगाव, लोंढा, गोवा ही लाईन ब्रॉडगेज झाली व रत्नागिरी व कोल्हापूरही रेल्वेने जोडले गेले की, बंदरात उतरणारा माल आंतर्देशात पोहोचविणे व आंतर्देशातील माल निर्यातीकरता बंदरापर्यंत पोचविणे सुलभ पडेल. हा विचार महत्वाचा खरा. पण महाराष्ट्रशासनाने जुळी मुंबई उभी करण्याचा आता चंगच बांधलेला दिसतो त्यामुळे त्या निर्णयावर याचा

परिणाम होणे कठीण.

प्रत्येक पुढाऱ्याला रेल्वेमार्ग आपल्या गावावरून जावा असे वाटत आहे. त्यामुळे रेक्कनायझन्स् सर्व्हेने ठरविलेल्या अलायनमेण्टला फाटे फोडण्याचे प्रयत्न अजूनही चालू आहेत व चालू रहातीलही; पण आज ठरविलेले अलायनमेण्ट असे—

आपटा, पेण, नागोठणे, रोहा, कोलाड, इंदापूर, माजगाव, गोरेगाव, वीर-दसगाव, कर्जाडी (नागाव), नातुकडी, खेड, ऐनी, चिपळूण सावर्डे, आसुर्डे, अरवली, संगमेश्वर (धामणीजवळ) उगडी (रत्नागिरी—भूमिपूजनाची जागा) साथरे, साखरपा, शिरवली, भांबे, राजापूर, खारेपाटण, कोकिसरे, कणकवली, कुडाळ, मालगाव बांदा, पेडणे, अरनोडा, डिचोली, साखळी, फोंडा पेडगाव, बल्ली, बारसेन, हलगे, कारवार, अंकोला, कुमठा, होनावर, माणकी, मैथिनी, भटकळ, बैंदूर, बसरूर, उडपी, सुटाकल, मंगळूर जंक्शन.

आपटे ते मंगळूर अंतर ८७० किलोमीटर. एकूण स्टेशनांची संख्या ६३. काही छोटी स्टेशने मी वरील यादीत गाळली आहेत.

कोकण रेल्वे झाली म्हणजे कोकणचे प्रश्न चुटकीसरशी सुटतील असे मानणे भाबडेपणाचे ठरेल. रेल्वेचा एकेक टप्पा जसजसा पुरा होईल तसतसा तो परिपूर्ण करून तेवढ्या रेल्वेमार्गाचा वापर विकासार्थ त्वरित व्हावा अशी कामांची आखणी हवी. स्टेशनांना जोडणारे रस्ते तयार व्हावेत. रेल्वेकरता इंजिने व वाघिणी यांची त्वरित तरतूद व्हायला हवी. रेल्वेकरता जमिनमालकांनी आपल्या जमिनी त्वरित उपलब्ध करून द्यायला हव्यात. निर्माण होणारी रोजगारी कोकणी लोकांनी राबवायला हवी आणि शिवाय अनेक गोष्टींची पैदास नियोजित पद्धतीने करण्याकरता चंग बांधून सिद्ध व्हायला हवे. नाहीतर मुंबई-मंगळूर रेल्वे कोकणातून धडधडत जाईल—म्हैसूर—केरळाची सोय पाहील आणि कोकणी आळशांवर गंगा येऊनही ते कोरडेच राहायचे. रेल्वे येऊनही आम्ही दरिद्रीच राहिलो तर जग आम्हाला कर्मदरिद्री म्हणेल !

● ●

## मध्यंतर

अल्काझींची नवी निर्मिती

# काबुकी शैलीतील हिंदी 'इबारगी'

पुष्पा भावे

दिल्लीच्या 'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा'ची नवी निर्मिती हा भारतातील नाट्यजगतात नेहमीच कुतूहलाचा व चर्चेचा विषय असतो; आणि मुंबईकरांच्या काहीशा असूयेचा विषय असतो. एकेकाळी मुंबईतील, प्रायोगिक चळवळीचे केंद्रस्थान असणारे इब्राहिम अल्काझी दिल्लीकर झाले याविषयीचे मुंबईकरांच्या मनातले वैषम्य आजही नाहीसे झालेले नाही. अर्थात अल्काझींच्या कर्तृत्वाला योग्य संधी मिळाली आणि 'नॅशनल स्कूल'ला नाट्याची संवेदनाक्षम जाण असणारा कुशल अयोजक मिळाला हे निर्विवाद सत्य जाणून मुंबईतील नाट्यप्रेमी प्रेक्षकांनी स्वतःची समजूत घातली आहे म्हणूनच दोन-तीन वर्षांनी अल्काझींचे नाट्यप्रयोग पहाण्याची संधी आली की मुंबईकर ती संधी सहसा सोडत नाहीत.

अल्काझींच्या संस्थेचे संपूर्ण नाव 'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा अँड एशियन थिएटर इन्स्टीटयूट' असे आहे. यातील आशियाई रंगभूमीचे स्वरूप अल्काझींनी प्रयत्नपूर्वक जोपासले आहे. अल्काझींची या संस्थेचे संचालक म्हणून निवड झाली, त्यावेळी अनेकांनी अल्काझींचा भारतीय रंगभूमीशी संपर्क नाही अशी तक्रार केली होती परंतु अल्काझींनी मात्र ग्रीक शेक्सपिरिअन रंगभूमी-समवेत अनेक भारतीय नाट्यशैलीचे प्रयोग सतत केलेले दिसतात. भारतीय मुक्तनाट्याच्या जवळ जाणारी पद्धत म्हणून ब्रेख्तच्या नाटकांच्या निर्मितीवर दिलेला भर, 'भवई' पद्धतीचे 'जस्मा ओडन', 'अंधायुग', 'तुघलक'. 'आषाढ का एक दिन' अशी भारतीय सांस्कृतिक परंपरेतून निर्माण झालेल्या नाट्यसंहितांची निवड, यातून अल्काझींचा आपल्या विद्यार्थ्यांनी केवळ पाश्चात्य रंगभूमीचे पंडित होऊ नये असा कटाक्ष जाणवतो नव्या नाट्यशैलीचे अन्वेषण करणारी दिग्दर्शकांची, नटांची पुढील पिढी परंपरेच्या सकस अनुभवातून निर्माण व्हावी ही कल्पनाच फार चाणाक्ष आहे.

हे वेगवेगळ्या नाट्यशैलीचे प्रयोग ग्रंथ वाचून करणे गोष्ट वेगळी आणि

प्रत्यक्ष त्या विशिष्ट रंगभूमीवर वाढलेल्या एखाद्या दिग्दर्शकाच्या समवेत निर्मिती करणे वेगळे. ब्रेख्तच्या सहाय्यक दिग्दर्शकाबरोबर ब्रेख्तच्या नाटकांची निर्मिती करणारे कलावंत नकळतपणे ब्रेख्तच्या रंगभूमीचा साक्षात प्रत्यय घेत असणार. या वर्षी जपानी रंगभूमीवरील 'काबुकी' शैलीतील 'इबारगी' हा नाटचप्रयोगही 'नॅशनल स्कूल'च्या विद्यार्थ्यांनी प्रा. सोजो सातो या सुप्रसिद्ध जपानी तज्ज्ञाच्या मार्गदर्शनाखाली केला. प्रा. सातो यांनी सुप्रसिद्ध काबुकी कलावताच्या हाताखाली या परंपरागत कलेचे अध्ययन केलेले असून ते आधुनिक सौंदर्यशास्त्राचेही तज्ञ आहेत. दिल्लीच्या विद्यार्थ्यांच्या या हिंदी काबुकीचे त्यांनी केवळ दिग्दर्शन केले नाही तर काबुकी' दृष्टिकोण त्यांना समजावून सांगितला. प्रा. अल्काझींनी प्रयोगापूर्वी जे चार शब्द सांगितले त्यात 'इबारगी'च्या संहितालेखनाविषयी जे उल्लेख केले ते अत्यंत महत्त्वाचे होते. जपानी शब्दांचे हिंदी भाषांतर करून 'काबुकी'ची संहिता निर्माण होणार नाही हे जाणून जपानी शब्दांचे ध्वनी ऐकून मग हिंदी शब्दयोजना केली गेली हा संदर्भ 'काबुकी' नाटचशैलीविषयी बरेच काही सांगून जातो.

'काबुकी नाटचशैलीमध्ये नटाने उच्चारलेल्या शब्दांच्या अर्थापेक्षा त्याच्या ध्वनीला फार महत्त्व असते. किंबहुना नटाचा आवाज काबुकी निर्मितीत एखाद्या वाद्याप्रमाणेच वापरला जातो. अन्तोनित आर्त्रां या रंगभूमी' विषयी लिहितो–'These mental signs have an exact meaning that only strikes one intuitively, but violently enough to make any translations into logical, discursive language useless.' म्हणूनच सातो यांनी जपानी पद्धतीने संवाद म्हणून दाखवल्यावर जैन यांनी त्यास हिंदी पर्याय शोधले. आर्त्रां तर जपानी संवाद उच्चारणाला अवकाशातील चित्रलिपी मानतो. आर्त्रांने मांडलेल्या 'An Affective Athleticism' या कल्पनेत नटाच्या श्वासाचा केलेला विचार काबुकी नटाच्या उच्चारण पद्धतीने प्रभावित झालेला आहे. काबुकी शैलीचे, 'नो' शैलीचे ऋण आधुनिक पाश्चात्य प्रायोगिक रंगभूमीने नेहमी मान्य केले आहे. छायाचित्रणात्मक वस्तुस्थितिनिदर्शक रंगभूमीपासून दूर जाण्यास, रंगभूमीची स्वतःची भाषा शोधण्यास पौर्वात्य रंगभूमीने पाश्चात्य रंगभूमीला मदत केली आहे असे मानले जाते. प्रत्यक्ष जपानी रंगभूमीवर आज परंपरागत शैलीतून अधिक समर्थ अशी नवी शैली निर्माण करण्याचे यत्न चालू आहेत. मिशिमाची आधुनिक नो नाटके वाचताना ही परंपरागत शैली किती अविष्कारक्षम होऊ शकते याचा प्रत्यय येतो

काबुकी नाटचशैलीला काही वेळा नृत्यनाटच असे संबोधिले जात असले तरी त्याचा अर्थ संपूर्ण नाटक नृत्यमाध्यमातून केले जाते असे नाही. परंतु

नटाचा प्रत्येक आविर्भाव डौलदार असावयास हवा, त्या प्रत्येक आविर्भावाला प्रतीकात्मक अर्थ असावा आणि रंगमंचावरील हालचाली लयबद्ध असाव्यात, या कल्पना नृत्याला जवळ जाणाऱ्या आहेत. तसेच काबुकी नटांच्या हातापायांच्या हेतुत: कृत्रिम केलेल्या हालचाली नृत्याप्रमाणेच अवकाश-रेखनाचा प्रयत्न करतात व तो करीत असतानाच मानवी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करतात. काबुकी नटाची रंगभूषा 'यक्षगाना'तील नटाप्रमाणे जाड थराची असते. फक्त फरक इतकाच की, काबुकी नट पांढरी रंगभूषा वापरतात तर 'यक्षगाना'त पाच प्रकारची रंगभूषा वापरली जाते. कथकली नर्तकाप्रमाणेच डोळ्यांची रंगभूषा ठसठशीत करून काबुकी नटाला नेत्रपल्लवीची वेगळी भाषाच दिली जाते.

अल्काझींनी सादर केलेले 'इबारगी' हे काबुकी नाटक 'Pine wood panel' पद्धतीचे होते. संपूर्ण रंगमंच लाकडाच्या फिक्कट निवळ रंगाचा होता मागील बाजूला हिरव्या, काळ्या रंगांनी देवदार वृक्षाची चित्रे काढली होती आणि डाव्या बाजूला तिरंगी सॅटिनचा पडदा होता. रंगमंचाच्या मध्यावरून प्रेक्षागृहात उतरणारी 'हनामिची' (पुष्पमार्ग) होती.

काबुकी रंगभूमीवर वापरली जाणारी कथानके प्राय: दंतकथांसारखी असतात. 'इबारगी' या नाटकाच्या प्रारंभी सुना या नायकाचा सेवक येऊन प्रेक्षकांना सांगतो की, त्याच्या मालकाने राशोमान प्रवेशद्वाराजवळ इबारगी राक्षसाचा हात कापला आहे. सर्वत्र त्याच्या शौर्याचे कौतुक होत आहे; परंतु अबे नो सेमयी या तत्त्ववेत्त्याने मात्र त्यास सात

## मॅजेस्टिकचा वासंतिक उपक्रम

गिरगावातील मॅजेस्टिक बुकस्टॉलने मुलांच्या उन्हाळ्याच्या सुट्टीनिमित्त 'बालवाङ्मया'तील छोट्यामोठ्या निवडक पुस्तकांचे संच सवलतीने देण्याचा उपक्रम आरंभला आहे एकूण चार संच बनवण्यात आले असून वेगवेगळ्या संचात अनेक नामवंत लेखकांची पुस्तके समाविष्ट केलेली आहेत. या लेखकात भा. रा. भागवत, लीलावती भागवत, मालतीबाई दांडेकर, प्रभाकर अत्रे, पंढरीनाथ रेगे, वि स. फडके, शि. शं. कार्लेकर, सोमनाथ समेळ, यशवंत रांजणकर, श्रीकृष्ण पोवळे, अ. रा. भालादार आदी मंडळी असून परीकथा, लोककथा अदभुत-कथा, क्रीडा, छंद, सर्कस, युद्धविषयक डावपेच अशा विविध विषयांवरील छोटी-मोठी पुस्तके आहेत. आगबोटीची व मोटरगाड्यांची कुळकथा, 'दोन ध्रुवावर विजय', 'हिमालयाच्या परिसरात' अशासारखी मोठी पुस्तकेही आहेत. एका संचात छोटी तीस-एक पुस्तकेही आहेत. प्रत्येक संच १५ रुपये किंमतीचा असून तो सवलतीने फक्त १० रुपयात दिला जात आहे. एकंदरीत, मुलांना या उन्हाळ्याच्या सुट्टीत स्वस्त पुस्तके खरेदी करून वाचण्याची नामी संधी आलेली आहे.

दिवस अनुष्ठान करायला सांगितले आहे. इबारगी आपला हात परत न्यायला येईल, अशी त्याची अटकळ आहे. सातव्या दिवशी प्रवेशद्वारापाशी सुनाची मावशी येते. परंतु सुना तिला परत पाठवतो. ती म्हातारी मावशी परत जायला वळते तेव्हा त्याला वाईट वाटते; तो तिला परत बोलावतो; आपल्या शौर्याची कथा सांगतो; तिच्या विनवणीवरून तिला इबारगीचा हात दाखवतो. तो हात पाहता पाहता ती आपले खरे रूप [प्रेक्षकांकडे पाठ फिरवून रंगमंचावरच तिच्या चेहऱ्यात बदल केला जातो.] प्रगट करते–राक्षस होते. सुना राक्षसाचा पाठलाग करतो. दोघांचे युद्ध होते. राक्षस ढगात (प्रत्यक्ष हनामित्रीवरून) नाहीसा होतो. या नाटकाला मुळातील जपानी ध्वनिमुद्रित संगीत वापरले आहे. जोडीला लाकडी ठोकळ्यांच्या आवाजाचा परिणामकारक उपयोग केला होता.

सुनाची भूमिका ओम पुरी यांनी व मावशीची रोहिणी ओक यांनी काबुकी शैलीशी समरस होऊन केली. आपल्या वेशभूषेचा विस्तार सांभाळणे, वेश-भूषेच्या आधारे काही आविर्भावांना आत्यंतिक स्वरूप देणे हे ओमपुरी यांनी विशेष साधले. रोहिणी ओक यांनी एक हात नसल्याची व राक्षसाच्या हाता-विषयीच्या कुतुहलाची कल्पना प्रेक्षकांना फार सूचकतेने दिली. आतोवाके (विजया गुप्ता) आणि माशिबा (रोहिणी ओक) यांचे नृत्य मात्र शिकाऊ वाटले. काबुकी शैलीतील स्त्रियांनी पाय घसरवत केवळ बोटे वर उचलण्याच्या कल्पनेपेक्षा त्यांचा पदन्यास अधिक ठाम वाटला. रोहिणी ओक रंगमंचावर वावरताना पदन्यास काबुकीपद्धतीचा करीत होत्या. नृत्यात काही वेळा हे भान सटकले.

रोशन अल्काझींचे वेशभूषेचे आकार व रंग अप्रतिम होते.

पारंपरिक नेपथ्याचा निव्वळ लाकडी रंग, बाजूला भडक सॅटिनचा पडदा व रंगीबेरंगी वेशभूषा यामुळे काबुकी शैलीचा आभास हुबेहूब वठला होता. वेशभूषा सावरणारे सहाय्यक काळ्या कपड्यात होते.

प्रत्येक पात्राने आपला आवाज खोल बेंबीपासून निर्माण करावा या काबुकी नियमाचेही काटेकोर पालन करण्याचा यत्न नटवर्ग करीत होता. त्यामुळे निवेदकांचा मंत्रोच्चारसदृश आवाज, लाकडी ठोकळ्यांचा आवाज आणि नटाचा आवाज व ध्वनिमुद्रित संगीत यांचा वाद्यमेळ योग्य जमला होता.

बाजूचा पडदा वर नेण्याची–क्षणात उचलला जाण्याची पद्धती सहाय्यकांना जमली होती. परंतु पात्रांच्या स्वभाव-दर्शनासाठी त्याचा केला जाणारा वापर पुरेसा नेमका नव्हता.

एक काबुकी शैलीतील अव्यंग प्रयोग पहाण्याचे सुख मुंबईकरांना लाभले. हा नाट्यप्रयोग पहात असताना काबुकी आणि 'यक्षगाना'चे नाते जाणवत होते. विशेषतः सुना–इबारगी युद्ध पाहताना. त्यामुळे अल्काझींची पुढील निर्मिती 'यक्षगान' स्वरूपाची आहे यात आश्चर्य ते काय ? ● ● ●

# नाट्यसमीक्षक

# माधव मनोहर

एका विशिष्ट नाट्यप्रयोगाविषयी एखादा स्तंभ लिहिणारे वर्तमानपत्री नाट्यसमीक्षक मराठी रंगभूमीच्या आरंभकालापासून आतापर्यंत अनेक झाले. नाटकाची संहिता प्रकाशित झाल्यावर प्राध्यापकी पद्धतीने नाट्यसमीक्षा करणारेही मराठी साहित्यात अनेक झाले. परंतु संपूर्ण नाट्यव्यवहाराशी संपर्क असणारा रसिक चिकित्सक या नात्याने माधवरावांनी गेल्या वीस वर्षांत मराठी नाट्यवर्तुळात जे स्थान प्राप्त करून घेतले आहे ते अनन्यसाधारण आहे. म्हणूनच यंदा नव्याने सुरू केलेला वि. स. खांडेकर पुरस्कार माधव मनोहरांना मिळाला, त्यावेळी सर्वांना आनंद झाला. खरे म्हणजे यापूर्वीच अनेक हौशी कलावंतांनी व नाट्यव्यावसायिकांनी त्यांच्याशी जे आपुलकीचे नाते निर्माण केले होते, त्यातून हा पुरस्कार त्यांना मिळाल्यासारखाच होता. या पुरस्काराच्या निमित्ताने नाट्यसमीक्षेचे कोणते स्वरूप माधवरावांनी रूढ केले त्याचा परामर्श घ्यावा, नाट्यसमीक्षकाची कोणती प्रतिमा त्यांनी उभी केली त्याचा शोध घ्यावा आणि माधवरावांच्या नाट्यसमीक्षेने दाखवलेल्या वाटेने मराठी नाट्यसमीक्षेला पुढे जाता येईल का, या प्रश्नांचा थोडक्यात विचार करावा असे मी ठरवले आहे.

माधव मनोहर विशेष लोकप्रिय झाले ते 'सोबत'मधील 'पंचम' या सदरामुळे, हे खरे असले तरी 'पंचम' लिहिण्यापूर्वी अनेक वर्षे नाट्याविषयीच्या आंतरिक ओढीने ते नाट्यवर्तुळाशी डोळस संपर्क ठेवून होते. साहित्याचे अभ्यासक व अध्यापक या नात्याने मराठी व इंग्रजी साहित्यांचा त्यांचा व्यासंग दांडगा होता आणि त्याचबरोबर अल्काझींच्या हाताखाली घेतलेले नाट्यशिक्षण, पाश्चात्य रंगभूमीविषयीचे वाचन, प्रायोगिक रंगमंचावरील धडपड्या लोकांशी असलेला स्नेह यामधून रंगभूमीच्या स्वतः सिद्ध

मूल्यांची त्यांना जाणीव झाली होती. प्रायोगिक रंगभूमीसाठी काही रूपांतरे करण्याचाही त्यांनी यत्न केला होता. नाट्यासंबंधी लेखन, परिसंवाद, चर्चा या साऱ्यांशी माधवरावांचा अविभाज्य संबंध होता. यातून माधवरावांचा मराठी व पाश्चात्य नाट्यसृष्टीचा व्यासंग व्यक्त होत होताच; परंतु त्याबरोबर मराठीतील व्यक्तिपूजेला बाजूला सारणारा सडेतोड युक्तिवादही होता.

'मुंबई मराठी साहित्य संघा'च्या 'नाटक' या नियतकालिकातून 'मराठी नाटक थिटे का?' ही लेखमाला लिहून माधवरावांनी आपल्याला जे सांगायचे आहे ते स्पष्टपणे मांडले. मराठी नाटक थिटे आहे, जागतिक निकषांपुढे ते केविलवाणे ठरते, हे स्पष्टपणे मांडून माधवरावांनी आपली नाट्यविषयक गृहितकृत्येच सांगितली आहेत. १९५९ सालीसुद्धा मराठी नाटकाविषयी, खाडिलकर, कोल्हटकर, गडकरी यांच्यासारख्या मान्यवर नाटककारां-विषयी अशी विधाने करणे अवघडच होते. नाटक हे सर्वप्रथम नाटक असले पाहिजे या निष्ठेने माधवरावांनी मराठी नाटकाच्या तथाकथित थोरवीची फेर-तपासणी केली होती. नव्याने उभ्या रहाणाऱ्या प्रायोगिक रंगमंचाच्या नाटकाविषयीच्या कल्पना अधिक नितळ व्हाव्यात असाही हेतू माधवरावांच्या मनात असेल.

'मराठी नाटक थिटे का?' या लेखमालेतच माधवरावांच्या नाट्य-समीक्षेचे गुणदोषांकित स्वरूप काहीसे स्पष्ट होते. मराठी नाटकाला स्वतःसिद्ध श्रेयस्कर स्वरूप नाही असा मूळ मुद्दा मांडणारे माधवराव, नाटक हे एक स्वतंत्र माध्यम आहे, म्हणून त्यातील श्रेयस्कराच्या कल्पना वेगळ्या आहेत, हे स्पष्ट करीत नाहीत. ते प्रश्न विचारतात—'मराठी नाटक वास्तव अर्थाने खरोखर वाङ्मय तरी आहे काय?' त्यामुळे त्यांना महत्त्वाच्या प्रश्नांची जाण असूनही प्रतिपाद्य विषया-वर नेमका प्रहार करणारे बांधेसूद विवेचन ते करू शकत नाहीत. प्रस्तुत लेखमालेत त्यांनी शोकात्मिकेविषयीचा भरतमुनीचा दंडक, नाटक करमणुकी-साठी ही कल्पना, या दोन गोष्टींचा मराठी नाट्यलेखनावर झालेला अनिष्ट संस्कार नेमका टिपला आहे. शेक्स-पिअरचा प्रभाव झुगारून संस्कृत नाटकाकडे वळल्यामुळे मराठी नाटकाचे स्वरूप तोकडे राहिले. हाही निर्णय पटण्याजोगा आहे. कलानिर्मिती ही काही मराठी नाटकाची आदिप्रेरणा नव्हे हा निःसंदिग्ध निष्कर्षही स्वागतार्ह होता. मराठी नाटककारांना शाश्वताचे आवाहन नसते, ते प्रचलिताने भारले जातात, मराठी नाट्यानुभव सूक्ष्म व संमिश्र नाही, ही विधाने आजही सत्य आहेत. गैरलागू संगीतामुळे नाटक हरवले, या मनोहरांच्या भूमिकेमुळे ही लेखमाला प्रसिद्ध होऊ लागताच जुन्यांच्या अभिमान्यांकडून त्यांना विरोध झाला. दुर्दैव असे की मनोहरांनी आपल्या तात्त्विक विवेचनाचा ओघ

विस्कळित करून या विरोधकांना उत्तरे देण्याचा यत्न केला. हा वावदूकपणा माधवरावांच्या इतरही लिखाणात जाणवतो. परंतु प्रबंधस्वरूप लेखमालेमध्ये तो त्यांच्यावरच अन्याय करणारा ठरतो. तरीही नाटकाविषयी, मराठी नाटकाविषयी आपल्याला जे म्हणायचे ते स्पष्टपणे मांडून त्या भूमिकेवर नाट्यसमीक्षक म्हणून उभे राहायचे ही माधवरावांची कल्पनाच त्यांच्या छंदाचे गांभीर्य सूचित करते.

'केसरी' व 'सोबत' या नियतकालिकातून त्यांनी जे लिखाण केले त्यात मराठी नाट्यसृष्टीचे संपूर्ण चित्र दिसते असे म्हटले तरी ती अतिशयोक्ती होणार नाही. नाटकाच्या जाहीराती कशा केल्या जातात, इथपासून प्रत्यक्ष प्रयोगापर्यंत, प्रयोगानंतर समीक्षकांवर येणाऱ्या दडपणापर्यंत सर्व काही माधवरावांच्या चर्चेचे लक्ष्य होऊ शकते. 'शिवाजी मंदिर'सारख्या नाट्यगृहातील अडचणी, प्रसाद सावकार आणि एस्. पुरुषोत्तम यांच्यातील वाद, दोन सेन्सॉर बोर्ड कशासाठी अशा विविध विषयांवर ते 'पंचम'मधून लिहीत असत. त्यांनी आपल्या सदराचे विषय जसे मर्यादित ठेवले नाहीत तशी सदराची रचनाही परंपरागत नाट्यसमीक्षेपेक्षा वेगळी ठेवली. त्यांच्या सदराला व्यक्तिमत्त्व होते. हे साधेसुधे व्यक्तिमत्त्व नव्हते; रसिक, व्यासंगी, दिलखुलास असे व्यक्तिमत्त्व होते. पुढे पुढे 'पंचम'च्या आत्मचरित्रात्मक पद्धतीची चेष्टा होऊ लागली हे खरे असले तरी मूळात वाचकांशी संवाद साधणे हे याच पद्धतीमुळे माधवरावांना शक्य झाले हे विसरता येत' नाही. माधवरावांच्या व्यक्तिमत्त्वातील विसंगती त्यांच्या सदराचा स्वभाव झाल्या. माधवरावांची भाषाशैली काटेकोर विधानांना साजेशी, काहीशी जड अशी होती; परंतु एखाद्या नाटकाची काटेकोर चर्चा करण्याचा यत्न त्यांनी क्वचित्च केलेला दिसतो. 'संस्मरणीय म्हणून अविस्मरणीय', एवंमतविशिष्ट, एवंख्यातिविशिष्ट, अलंकारमंथर, परंपराप्राप्त नगण्य, सज्जड, तद्दन भिकार हे शब्दप्रयोग या माधवरांच्या भाषालकबी त्यांच्या 'पंचम'च्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचा भाग बनल्या होत्या. तरी या लकबींनी त्यांच्या विवेचनाला मदत केली असे दिसत नाही.

'पंचम'मधील कथानकाचा सारांश देण्याची पद्धती माधवरावांसारख्या आधुनिकाकडून अपेक्षित नव्हती. परंतु माधवराव इतक्या बारकाव्याने कथानक स्पष्ट करतात की त्यातील नाट्यानुभवाची चर्चा करण्याचे राहून जाते. तसेच प्रयोगाचे नेमके महत्त्व न सांगता ते अनेकदा तपशीलात रमून जातात. तर एखाद्यावेळी एखाद्या सामान्य कलावंतासाठी ते खूप शब्द खर्ची घालतात. उदा : 'पण या नटीचे (पद्मा चव्हाण) रंगभूमीवरील नुसते दर्शन (पर्यायाने प्रदर्शनही) असे लोभसवाणे आणि आव्हानशील असते की (केवळ पुरुषच नव्हे, तर खरोखरच) कोणत्याही प्रेक्षकाची दृष्टी तिच्या मादक

देहविशेषावर निरंतर खिळून रहावी. (हा देहविशेष मांसबहुल असल्यामुळे तसा सुंदरही निखालस नाही.) 'मादक सौंदर्याचा अॅटमबॉम्ब' म्हणून तिची जाहीरात करणाऱ्या एजंटांनी तिला न्याय तर दिला नाहीच पण तिची घोर बदनामी केली आहे, असे मला वाटते. कारण या जाहीरातीमुळे फर्सून लोक गर्दी करतात, ते पद्मा चव्हाणचे 'मादक सौंदर्य' बघण्यासाठी. ती पण बिचारी आपल्या जाहीरातीला जागून शक्य तो आपल्या बेढब अंगविशेषांचे अर्धावृत्त, अनावृत्त प्रदर्शन करतेही ! पण ही जाहीरात खरोखरच तिच्या अभिनय-गुणांवर अन्याय करणारी आहे. आकृतितः सुंदर नसणाऱ्या स्त्रित्वाची ही प्रतिमा पौरुषाला आवाहन करणारी आणि आव्हान देणारी तर आहेच पण तिच्या व्यक्तित्वात स्त्रीस्वभावदर्शक अभिनयाचे असंख्य बारकावे भिनलेले आहेत. तिने नुसती वरची एक भिवई उडवली किंवा करंगळी नाचवली, तरी तो विभावविशेष विवस्त्र सुंदर स्त्री-देहाच्या दर्शनापेक्षाही अधिक उन्माद-कारक ठरावा. खरोखरच पद्मा चव्हाण ही अभिनयकुशल नटी आहे. जे प्रकृतीत मुळातच अंगी नाही, त्याचा प्रत्ययकारक असा सुंदर आभास ती साक्षात् व्यक्त करू शकते. शृंगारवाचक मुक्त भावविभाव इतक्या चातुर्याने प्रकट करणारी अन्य कोणी नटी मराठी रंग-मंचावर विद्यमान आहे किंवा काय याविषयी मला शंका आहे...आपल्या अभिनयविशेषाच्या संबंधात ती निःसंशय बुद्धिमान आहे.' ('सोबत' २१ मे ६७) पद्मा चव्हाणसारख्या बसक्या आवाजाच्या, सदोष उच्चार असणाऱ्या, पिठाच्या गोळ्यासारखा असंवेदनाश्रम चेहरा असणाऱ्या, नाटकी आविर्भाव करणाऱ्या नटीविषयी एवढे पाल्हाळ माधवराव का लावतात हे आपल्याला उमजत नाही. सुनिला प्रधान या नटी-विषयीची त्यांची स्तुती व विजया मेहताशी केलेली तुलनाही अशीच अवास्तव वाटते. सदर लिहिणाऱ्या व्यक्तीचे ग्रह-पूर्वग्रह आपण गृहीत धरतो म्हणून वरील उदाहरणे डोळ्या-आड केली तर त्याउलट काही अभिजात अभिनयाला माधवराव दाद देत नाहीत असेही दिसते. डॉ. लागूंच्या अभिनया-विषयी लिहिताना केवळ त्यांच्या शब्दो-च्चाराच्या शैलीकडे लक्ष देऊन ते म्हणजे माधव मनोहर इतर घटकांकडे दुर्लक्ष करताना दिसतात. 'गुरुमहाराज गुरु' या नाट्यप्रयोगाची माझी स्मृती अशी की गुरुनाथ ड्रायव्हर आणि कफनीमुळे आंतरिक तेजाने फुललेला गुरू यातील फरक डॉ. लागू आपल्या चेहऱ्याच्या स्नायूंच्या नियमनाने असा दर्शवीत की त्यामुळे गुरूच्या चेहऱ्यावर तेज फाकल्याचा भास व्हावा. याउलट माधवराव लिहितात की गुरुनाथचे काम डॉ. लागूंनी ठीक केले तरी गुरुच्या भूमिकेत ते नाटकी, भोंदू वाटत होते. हेही मतभेद आहेत असे म्हणून आपण सोडून देऊ.

'मराठी नाटक पिटे का?' या लेखमालेत, प्रचलितात रमणाऱ्या मराठी

नाटककारांना दूषणे देणारे माधवराव सुरेश खऱ्यांच्या नाटकातील प्रचलिताविषयी आक्षेप न घेता त्याची स्तुती करतात, ‘ मला उत्तर हवंय ’चा स्वभाव ‘ निखळ ट्रॅजेडी ’चा (शब्द त्यांचा) आहे असे म्हणतात. तेव्हा आश्चर्य वाटते. त्याहूनही आश्चर्य वाटते माधवरावांच्या नाट्यसमीक्षेत अवतरणाऱ्या चमकदार वाक्ये सुभाषिते आदींच्या उदाहरणांचे. कारण हेच माधवराव भाषाशैलीचे सौंदर्य नाट्यानुभवातून निर्माण झाले पाहिजे असे पूर्वी मानीत असत. एकेकाळी इंग्रजी नाट्यवाङ्मयाच्या व्यासंगामुळे अनेक समीक्षकांपेक्षा वेगळे वाटणारे माधवराव ‘अ. ना. भा.’च्या ‘Waiting for godot’चे समीक्षण करताना बेकेटच्या नाट्यशैलीविषयी वा नाट्यानुभाविषयी उदासीन राहतात तेव्हा निश्चित वाईट वाटते. हे आणि असे अनेक दोष ‘ पंचम ’ या सदरात असले तरी संपूर्ण नाट्यव्यवहाराविषयीचे माधवरावांचे स्वारस्य, नाट्याचा व्यासंग व विलक्षण समरसता यामुळे ते सदर नसले तर आठवडा सुना जात असे. अर्थात माधवरावांची शिस्त अशी होती की ते सदर नाही असे फारसे होत नसे.

माधवरावांच्या नाट्यसमीक्षेमध्ये विश्लेषणापेक्षा वर्णन व माहितीचे संकलन अधिक असे. तरीही त्यांनी नाट्यसमीक्षकाच्या व्यक्तिमत्त्वाचा जो आदर्श निर्माण केला तो फार मोठा आहे. नाटकाच्या सर्व घटकांशी सतत संपर्क असणे सडेतोड लिखाण करूनही मनात शत्रुत्व न बाळगणे, नाटकाची प्रतिष्ठा जपणे, व्यासंग करीत राहणे असे अनेक गुण त्यांचे ठायी होते—आहेतही. परंतु या सर्वांत मोठा गुण म्हणजे समीक्षकाची प्रतिष्ठा जतन करणे. आचार्य अत्र्यांपुढे माधवराव वाकले नाहीत, परंतु ‘ त्या ’ वादानंतर आलेल्या ‘डॉ. लागू’च्या परीक्षणात त्यांनी एकही विधान आकसाने केले नाही. विजय तेंडुलकर वा अन्य मराठी लेखक यांच्याशी भाषांतरावरून अनेक वाद होऊनही माधवरावांनी मनात कधी कटुता ठेवली नाही. हा दिलखुलासपणा सतत मनाने तरुण असणे हा माधवरावांच्या लौकिक व्यक्तिमत्त्वाचा विशेष गुण आहे तसाच त्यांच्या समीक्षकी व्यक्तिमत्त्वाचाही।

नाटक या आविष्कारमाध्यमाचा करमणुकनिरपेक्ष विचार करणे, नटाच्या संपूर्ण कारकीर्दीचा अन्वय मनात ठेवणे, नेपथ्यादी पूरक घटकांचा विचार समतोल ठेवणे, नाट्यव्यवहारातील इष्टानिष्टतेवर कडक नजर ठेवणे इत्यादी अनेक सूचना त्यांनी पुढील नाट्यसमीक्षकांना दिल्या आहेत. ‘ सोबत ’ साप्ताहिकाचे स्वरूप, दिलेल्या सदराचा विस्तार यामुळे माधवरावांच्या विश्लेषणाला मर्यादा पडल्या असण्याची शक्यता आहे. आता सदरातून मुक्त झाल्यावर ते नाट्यविषयक तात्त्विक लेखन करतील अशी आशा आहे. खांडेकर-पुरस्काराचा प्रथम मान माधव मनोहरांना मिळावा असे त्यांचे मराठी नाट्यसृष्टीतील स्थान आहेच. किंबहुना आज थोडेबहुत लिहिणारे नाट्यसमीक्षक जे शिकले अथवा जे शिकले नाहीत ते सारे मनोहरांचे आहे. या उदारमनस्क रसिक समीक्षकाला ही (समीक्षा) निवृत्ती सुखदायी ठरो।

— पुष्पा भावे

## महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

पृष्ठ २ वरून

प्रयत्न केले. त्यांच्या ऋणाचे गाठोडे खांद्यावर घेऊनच कर्मवीरांनी हयातभर समाजसेवेच्या खडतर प्रदेशात प्रवास केला.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे विद्यार्थीजीवन देखील आदर्श विचारांनी भारले गेले होते. एक हुशार, जिज्ञासु व विनयशील विद्यार्थी म्हणून ते आपल्या गुरुजनांच्या प्रेमास व कौतुकास पात्र ठरले होते. त्याकाळी बहुजन समाजातील फारच कमी मुले शाळेत जात असत. शिक्षणाच्या सोई बहुसमाजातील मुला-मुलींना अद्याप अधिक प्रमाणात उपलब्ध झालेल्या नव्हत्या. अशा प्रतिकूल काळात एका सामान्य मराठा कुटुंबातील हा मुलगा शिक्षणासाठी धडपड करीत होता. पुढे फर्ग्युसन कॉलेजमध्ये (१८९२–१८९८) शिक्षण घेत असताना अनेक विषयांवरील ग्रंथांचे त्यांनी वाचन केले. कुठल्याही विषयाच्या मूळापर्यंत जाऊन त्याचे विवेचन व विश्लेषण करणारे बुद्धिसामर्थ्य त्यांनी मिळविले होते. राष्ट्रवादी विचारांनी देखील त्यांच्या मनावर परिणाम केला होता. शिवाय चिंतनशीलता हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे एक प्रमुख लक्षण होते. अध्यात्मिक जीवनाचा मागोवा घेण्यासाठी चिंतनशीलतेने त्यांना फार मोठी मदत केली. कर्मवीर शिंदे हे अध्यात्मवादी तत्त्वचिंतक होते. म्हणूनच प्रार्थना समाजाच्या तत्त्वज्ञानाने त्यांना आकर्षित केले होते. धार्मिक व आध्यात्मिक समतेच्या प्रस्थापनेसाठी भागवत धर्माचा प्रसार करणाऱ्या संतांच्या मालिकेत देखील शोभून दिसण्यासारखे जीवन त्यांनी घडविले होते. वास्तविक ते भागवतधर्माच्या वातावरणात वाढले होते.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा वैचारिक प्रवास तसा फार मोठा आहे. युलिसिसच्या जिद्दीने व ध्येयवादाने त्यांनी ज्ञानसागरात पर्यटन केले. शाळेत शिकत असतानाच आगरकरांच्या 'सुधारका'ने त्यांना भारले होते. कॉलेजमध्ये आल्यानंतर जॉन स्टुअर्ट मिल व हरबर्ट स्पेन्सर यांच्या विचारांनी ते फार प्रभावित झाले होते. त्यांचा उपयुक्ततावाद, व्यक्तित्ववाद व अज्ञेयवादी विचारांनी कर्मवीरांना जवळ जवळ नास्तिकच बनवले होते. एक प्रकारची वैचारिक बंडखोरी त्यांच्यात निर्माण झाली होती. पण नास्तिकतेच्या वाळवंटात मृगजळाशिवाय दुसरे काहीच दिसणार नाही व हाती लागणार नाही याचा त्यांना प्रत्यय आला. याच कालावधित त्यांना मॅक्स मुल्लरचे विचार ऐकायला मिळाले. मॅक्स मुल्लरच्या प्रभावी विचारांनी पुन्हा त्यांना आस्तिकवादाच्या कवेत आणले. ब्राह्मो समाजाने त्यांना शेवटी एकेश्वरवादी बनविले व जीवनाकडे पाहण्याची सम्यक दृष्टी दिली. सर्वधर्मसमभावाचा वारसा त्यांना आपल्या आईवडिलांकडून आधीच मिळाला होता. ब्राह्मो समाजाने

त्यांच्या सर्वधर्मसमभाववृत्तीला अधिक व्यापकता व अर्थसंपन्नता प्राप्त करून दिली. १९०१ साली ते इंग्लंडला धर्मशास्त्रांचा अभ्यास करण्यासाठी गेले. विविध धर्मांचा व धर्मसंप्रदायांचा तौलनिक अभ्यास त्यांनी केला. त्या अभ्यासाने त्यांच्या सर्वधर्मसमभाववृत्तीला समन्वयवादी दृष्टी दिली.

राजाराम मोहन रॉय यांचे जीवन तर महर्षी शिंद्यांना एखाद्या महाकाव्यासारखे गूढ, उदात्त व मोहक वाटले. राममोहन रॉय यांच्या जीवनापासून मिळालेल्या प्रेरणेला त्यांनी तीर्थ मानले. म्हणूनच त्यांनी आयुष्यभर प्रार्थनासमाजाची कावड आपल्या खांद्यावर भक्तिभावाने घेतली. 'ब्राह्मसमाज हे राममोहन रॉय यांचे एक मानसिक संगमरवरी स्वप्न होय' असे महर्षींनी आपल्या आत्मकथेत लिहिले आहे. त्या स्वप्नाला शिल्परूप देण्यासाठी त्यांनी आपली सृजनशक्ती पणाला लावली.

प्रार्थना समाजाचे प्रवचनकार या नात्याने कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनी सबंध देशात प्रवास केला. त्या निमित्ताने त्यांनी भारतीय समाजजीवनाचे अगदी बारकाईने आवलोकन व अध्ययन केले. धार्मिक व सामाजिक विषमतेवर आधारलेल्या, रूढी व परंपरांच्या ओझ्याखाली गुदमरलेल्या, जातिभेदाने विघटित झालेल्या आणि शतकानुशतके अस्पृश्यतेच्या अस्तित्वाने शापित व कलंकित झालेल्या हिंदुसमाजाच्या अंतरंगाचा त्यांनी शोध घेतला. वास्तविक गेल्या दोन-अडीच हजार वर्षांचा भारतीय इतिहास हा वर्णभेदाचा व वर्णसंघर्षाचा इतिहास आहे. सत्यशोधकाच्या भूमिकेतून या इतिहासाचा कर्मवीर शिंदे यांनी अभ्यास केला. या पुरातन हिंदू समाजाची विशाल मानवी मूल्यावर पुनर्बांधणी केल्याशिवाय त्याला भवितव्य नाही असे त्यांना वाटले.

कर्मवीर शिंद्यांनी राष्ट्राच्या सर्वांगीण सुधारणेचा पुरस्कार केला, राष्ट्रीय चळवळीपासून आलिप्त न राहताही त्यांनी समाज सुधारणेला अधिक प्राधान्य दिले. विशेषत: शेतकऱ्यांची उन्नती, स्त्री-शिक्षण व अस्पृश्यता निर्मूलन या प्रश्नाकडे त्यांनी अधिक लक्ष दिले. दारिद्र्याच्या चिखलात रुतून बसलेल्या शेतकरी समाजाला चांगले दिवस यावे म्हणून त्यांनी चिंता वाहिली. महाराष्ट्रातला शेतकरीवर्ग हा फार दुर्लक्षित असल्यामुळे आपली शेतीदेखील दुर्लक्षित आहे, ही वस्तुस्थिती त्यांनी लोकांच्या नजरेस आणून दिली. शेतकरीवर्ग पुढे आल्याशिवाय शेतीलाही भवितव्य नाही व देशालाही नाही असे त्यांना वाटत होते. 'बळीराजा उभा राहील तरच स्वराज्याची आशा' असे त्यांनी एका शेतकरी परिषदेत उद्गार काढले होते.

स्त्रियांच्या उन्नतीसाठीही आण्णासाहेब शिंद्यांनी खूप परिश्रम घेतले. अहिल्याश्रमाची स्थापना स्त्रियांच्या उन्नतीसाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांचाच एक भाग होता. स्त्रीशिक्षणाबरोबर त्यांनी सामाजिक प्रतिष्ठेला मुकलेल्या

दुर्दैवी स्त्रियांना पुन्हा सभ्य समाजात आणण्याचे कार्य केले. देवदासी व मुरळीची प्रथा बंद करण्याच्या कार्यात तर त्यांना स्वतःचा जीव धोक्यात घालावा लागला होता.

महर्षी अण्णासाहेब शिंदे यांच्या जीवनातील सगळ्यात महत्त्वाचे कार्य म्हणजे अस्पृश्यता निवारण ! ह्या कार्यासाठी त्यांनी आपल्या आयुष्यातील पंधरा-वीस वर्षांचा काल खर्च केला. अस्पृश्यतेच्या प्रश्नाचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता. अस्पृश्यतेचा उगम, स्वरूप व व्याप्ती यांची कारण मीमांसा यांनी 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' (१९३३) या आपल्या मौलिक ग्रंथात केली आहे. दलितोद्धारासाठी महात्मा फुल्यांनी उचललेल्या क्रांतीकारक पावलांची त्यांना जाणीव होती. अस्पृश्यता निर्मूलनासाठी त्यांनी आपल्या जिवाचे रान केले. १९०१ च्या शिरगणतीनुसार एक षष्ठांश भारत अस्पृश्य व बहिष्कृत आहे असे त्यांना आढळून आले. हे लोक प्रत्यक्ष 'सामाजिक तुरुंगातच' आहेत या वस्तुस्थितीची जाणीव त्यांनी संबंध देशाला करून दिली. त्यांचा हा तुरुंगवास नष्ट करून अस्पृश्यांना सामाजिक स्वातंत्र्य व समता दिल्याशिवाय देशाला भवितव्य नाही असे त्यांचे ठाम मत होते.

अस्पृश्यता निर्मूलनाचे कार्य साधेसुधे खासच नव्हते. ते एक फार मोठे आव्हान होते व आहे. पण सामान्य माणसेदेखील श्रद्धेच्या बळावर असामान्य कार्य करून दाखवू शकतात असा कर्मवीरांचा विश्वास होता. वास्तविक श्रद्धेच्या बळावरच त्यांनी ह्या प्रश्नाचे आव्हान स्वीकारले. १९०६ साली त्यांनी 'डिप्रेस्ड क्लास मिशन' नावाची संस्था काढली. या संस्थेच्या ठिकठिकाणी शाखा काढल्या. अस्पृश्यांच्या वस्तीत ते राहू लागले. राष्ट्रीय चळवळीच्या अग्रभागी असलेल्या नेत्यांचे लक्ष त्यांनी या प्रश्नाकडे वेधले. हा प्रश्न राष्ट्रीय स्वरूपाचा आहे अशी त्यांची धारणा होती. अनेकदा त्यांच्या पदरी निराशा पडली. पण 'एकला चलो रे' या संकल्पाने त्यांनी आपले काम चालू ठेवले. १९१७ साली कलकत्ता येथे अॅनी बेझंटच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या काँग्रेस अधिवेशनात अस्पृश्यता निवारणाचा ठराव पास झाला. त्या मागे महर्षींची दहा-अकरा वर्षांची तपश्चर्या उभी होती. त्यांच्याच प्रयत्नाने १९१८ साली मुंबई येथे अखील भारतीय अस्पृश्यता निवारण परिषद भरवण्यात आली होती. त्या परिषदेचे अध्यक्ष महाराज सयाजीराव गायकवाड हे होते. सयाजीराव गायकवाड व वि. रा. शिंदे हे आधुनिक काळातील 'महान कलिपुरुष' आहेत, या शब्दात द्वारका पीठाच्या शंकराचार्यांनी त्यांचा निषेध केला होता.

याच काळात महाराष्ट्रात ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद जोरात चालू होता. सत्यशोधक समाज हा ब्राह्मणेतरांच्या अधिकारांसाठी संघटितपणे संघर्ष करीत होता, या संघर्षातून महाराष्ट्रात जातीयवादी सत्तेच्या राजकारणाला

मलपृष्ठ २ वर

महर्षी वि. रा. शिंदे : पृ. ६४ वरून

सुरुवात झाली. कर्मवीर शिंदे यांनी स्वतःला या वादापासून व जातीयवादी राजकारणापासून अलिप्त ठेवले. जातीय सलोखा राखण्याची मुख्य जबाबदारी ब्राह्मण व मराठा या समाजांवर आहे असे त्यांचे म्हणणे होते. या दोन्ही समाजाचे गुणदोष त्यांनी निर्भयपणे दाखवले. मराठ्यांनी 'हिशेबीपणा' प्राप्त करावा व ब्राह्मणांनी 'संकुचितपणा' सोडावा व या दोन्ही समाजांनी दलितांना जवळ करावे, आपल्यात सामावून घ्यावे, असा त्यांचा आग्रह होता. 'ब्राह्मणांनी सर्व समाजाला, मराठ्यांनी इतर ब्राह्मणेतरांस व अस्पृश्यांस आपल्या जवळचे सर्व अधिकार देऊन त्यांच्या हितार्थ झटावे यातच महाराष्ट्राचे कल्याण आहे,' अशा प्रकारचा सल्ला त्यांनी दिला. ब्राह्मणेतर पक्षात ते सामील झाले नाहीत. 'मी केवळ मराठ्यांसाठी नाही—सर्वांसाठी आहे,' असे ते म्हणत असत.

१९१८ नंतर महाराष्ट्रात आंबेडकरांच्या रूपाने दलित समाजाला एक ज्वलंत व प्रभावशाली नेतृत्व मिळाले. डॉ. आंबेडकरांनी दलितांना राजकीय क्षेत्रात वेगळे व स्वतंत्र स्थान मिळवून देण्यासाठी लढा पुकारला. महर्षी शिंदे यांना आंबेडकरांची भूमिका मान्य नव्हती. विधिमंडळात अस्पृश्यांचे प्रतिनिधी कोणत्या प्रकारे निवडावेत या प्रश्नासंबंधी ह्या दोघांच्या भूमिका परस्पर विरोधी होत्या, अस्पृश्यांचे स्वतंत्र राखीव मतदार संघ असू नयेत अशी भूमिका कर्मवीरांनी घेतली. आंबेडकरांनी त्यांच्या ह्या भूमिकेला कडाडून विरोध केला. कर्मवीर शिंद्यांची भूमिका गांधीजींच्या या प्रश्नाविषयीच्या भूमिकेशी जुळणारी होती. १९२४ नंतर 'डिप्रेस्ड क्लास मिशन' या संस्थेशी त्यांनी संबंध तोडला. १९३० साली असहकाराच्या चळवळीत त्यांनी भाग घेतला व सहा महिन्यांचा कारावास भोगला. त्यानंतर त्यांनी धकाधकीच्या सार्वजनिक जीवनात विशेष भाग घेतला नाही.

महर्षी शिंदे हे संतही होते आणि सुधारकही. साधुत्व व मूर्तिभंजकत्व ह्या दोन्हींच्या परस्पर विरोधी प्रेरणा त्यांच्या विचारांत व कार्यांत आढळतात. महर्षी शिंदे यांच्यासारख्या व्यक्तीचे जीवनकार्य म्हणजे एक प्रकारची धर्म व संस्कृतीची तारण बँकच असते. त्यांनी आपले सर्व आयुष्य निराश्रित व उपेक्षित लोकांच्या सेवेत समर्पित केले होते. अस्पृश्यांसाठी तर त्यांनी अतोनात कष्ट उपसले. त्यांचे जीवन म्हणजे एक अमृत वृक्ष ! हा वृक्ष नेहमी दीन व दुःखी लोकांना मायेची सावली देण्यासाठी उन्हात व वादळात उभा राहिला. वाऱ्या-वादळाने त्याला निष्पर्ण करण्याचाही प्रयत्न केला. पण तो तसाच स्थितप्रज्ञासारखा निश्चल व ध्यानस्त उभा राहिला. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे उपकार समाजाला विसरता येत नाहीत. ●

[ १२ एप्रिल १९७३
महर्षी शिंदे यांचा जन्मशताब्दी दिन ]

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संथेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर